

# हाकारा



# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

मार्गदर्शक : प्रा. गं. बा. सरदार

## कार्यकारी मंडळ

अध्यक्ष : जनार्दन वळवी
उपाध्यक्ष : शरद कुळकर्णी
चिटणीस : रा. के. मुटाटकर
सहचिटणीस : लक्ष्मण कुळकर्णी
खजिनदार : बाबुल पठाण
सभासद : विजय भानू
गोविंद गारे
सुधीर जोग
छायाताई सुरतवंती
सुरेखा दळवी
एकनाथ बावनकर

---

## यांच्या सहकार्याबद्दल परिषद आभारी आहे !

* महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.
* शिक्षण व युवक कल्याण मंत्रालय, भारत सरकार.
* भारतीय सामाजिकशास्त्र अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र.
* आदिवासी विकास संचालनालय, महाराष्ट्र शासन.
* बनविकास महामंडळ, महाराष्ट्र.
* कम्युनिटी एड अब्रॉड, ऑस्ट्रेलिया.

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता।

# हाकारा



महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

## अनुक्रमणिका


१. संपादकीय २

२. आदिवासीमधील सांस्कृतिक बदल आणि संघर्ष ४
डॉ. गोविंद गारे

३. आदिवासींचा विकास आणि नवी आव्हाने ८
डॉ. श. गो. देवगावकर

४. सुशिक्षित आदिवासींसमोरील समस्या १२
दिनानाथ मनोहर

५. अनु. जमातींसाठी घटनात्मक तरतुदी १५

६. महादेव कोळी मुलांच्या कुपोषणाचे प्रमाण व कारणे १६
प्रा. वि. श्री कुलकर्णी

७. पावला पावलाने पुढे जाऊ २०
रा. वि. भुस्कुटे

८. आदिवासी विद्यार्थी संघर्षाच्या उंबरठ्यावर २३
ॲड. विजय साठे

९. बेदरकार वृक्षतोड थांबवा २७
रा. वि. भुस्कुटे

१०. मुरबाड शहापुरमधील आदिवासी जागा होत आहे. ३०
बारकु निरगुडा

११. पुस्तक परिक्षण :
भारतातील गुलाम श्रमिक ३५

१२. अनुसूचित क्षेत्र ( महाराष्ट्र ) आदेश ३८



वर्ष आठवे : अंक दुसरा
एप्रिल-जून १९८७
परिषद / हाकारा संयुक्त
आजीव २०० रुपये
वार्षिक २० रुपये
सुटा अंक किंमत : ५ रुपये
पत्रव्यवहाराचा पत्ता :
रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४/३, आनंदपार्क, औंध
पुणे ४११ ००७.

संपादक
रामचंद्र मुटाटकर

सहसंपादक
लता बापट
रमाकांत पाटील

मुखपृष्ठ
डॉ. विजय भानू

प्रकाशक :
रा. के. मुटाटकर, सचिव,
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे,
यांनी
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे,
यांच्यासाठी
कल्पना मुद्रणालय
४६१/४, सदाशिव पेठ,
टिळक रोड,
पुणे ४११ ०३०
येथे छापून प्रसिद्ध केले.

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे.

## संपादकीय

आदिवासींच्या सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक तसेच शैक्षणिक जीवनावरचे लिखाण ‘हाकारा’मधून प्रसिद्ध होत असते. परंतु ‘हाकारा’चा उद्देश केवळ त्यांच्या संस्कृतीची ओळख करून देणे इतकाच मर्यादित नाही तर त्यांच्या समस्या आणि त्यांना करावे लागणारे संघर्ष यांना वाचा फोडणे हा सुद्धा आहे. या दृष्टीने या अंकात ‘आदिवासींच्या समस्या’ यावर विशेष भर दिला आहे. आदिवासींना विकासोन्मुख करण्याचे काम सरकार आणि स्वयंसेवी संस्था/संघटना करीत आहेत. त्यांचे हे काम कितीही स्तुत्य, उल्लेखनीय असले तरी या विकासकार्यामुळेही आदिवासींपुढे काही समस्या निर्माण होतात. ‘हाकारा’चा हा अंक आदिवासींमध्ये होणारे सांस्कृतिक बदल, त्यांना करावे लागणारे संघर्ष, त्यांच्यापुढील समस्या आणि या सयस्यांवर तोडगा काय असावा यासंबंधीच्या विचारविनिमयासाठी उपयुक्त ठरावा.

शासनाचे धोरण व प्रयत्न, सेवाभावी सामाजिक संस्था/संघटनांचे कार्य तसेच बाजाराच्या निमित्ताने आदिवासींचा बिगर आदिवासींशी येणारा संपर्क यामुळे आदिवासींमध्ये सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय पातळीवर बदल होत आहे. आज त्याला अनेक हक्क प्राप्त झाले आहेत. तो स्वतंत्र भारताचा जबाबदार नागरिक म्हणून ओळखला जातो. असे असले तरी आज तो असंतुष्ट आहे. याचे एक कारण हिन्दू धर्माची कर्मठता हे असले तरी आजही हा आदिवासी आपल्या जुन्या मूल्यांना कवटाळून बसल्याचे दिसते. याशिवाय शहरी जीवनाबद्दल अनाकर्षण आणि प्रगत व सुशिक्षित समाजाकडून त्यांचे होणारे शोषण हेसुद्धा यास कारणीभूत आहे. यामुळेच तो शिक्षण, राजकारण, सुबत्ता यापासून वंचित राहतो. त्याची ही वंचितता आणि असंतुष्टता त्याच्या संघर्षाला कारणीभूत आहेत. आदिवासींमधील बेकारीचा प्रश्न योग्य रितीने सोडविला गेला तरच आदिवासींतील व इतरांतील सामाजिक संघर्ष नष्ट होऊन आदिवासी या देशातील समाजाशी एकरूप होऊन जातील असे प्रतिपादन डॉ. गोविंद गारे यांनी केले आहे.

डॉ. श. गो. देवगांवकर यांनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासी विकासासंबंधी झालेल्या प्रयत्नांचा आढावा घेऊन या विकासकार्यामुळे कोणत्या समस्या निर्माण झाल्या आहेत याचे विवेचन केले आहे. आज आदिवासी जागृत होत आहे. त्याच्या हक्कांबद्दल तो जागृत आहेच पण त्याच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्धही तो दाद मागत आहे. सरकार आणि समाजसेवकांकडून त्याच्या काही अपेक्षा आहेत. या अपेक्षांची परिपूर्ती करणे हे आज सरकारपुढे महत्त्वाचे आव्हान आहे. हे आव्हान सरकारने विकासकार्यात येणाऱ्या अडचणी, तक्रारी व सूचना तत्परतेने विचारात घेऊन त्यासाठी योग्य ती पावले उचलून स्वीकारले पाहिजे अशी अपेक्षा डॉ. देवगांवकर यांनी व्यक्त केली आहे.

आज शिक्षण ही केवळ थोरामोठ्यांचीच मक्तेदारी राहिलेली नाही. अगदी तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षणाचा प्रचार व प्रसार होत आहे. यात सरकारचा महत्त्वाचा वाटा आहे. सरकारी अनुदान आणि सवलती तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत जाण्याच्या मार्गात बरेच अडथळे येतात. अनेकदा अधिकाऱ्यांच्या बेपर्वाईमुळे विद्यार्थ्यांपर्यंत या सवलती पोहचत नाहीत किंवा विलंब लागतो आणि मग विद्यार्थ्यांना आपल्या अध्ययनाचा वेळ मागण्यांसाठी घालवावा लागतो. त्यातच विद्यार्थ्यांचे मानसिक व शारीरिक श्रम व्यर्थ जातात. ॲड. विजय साठे यांनी आदिवासी विद्यार्थ्यांच्या या दु:खाला वाचा फोडली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात मागासवर्गीयांना पुढे आणण्यासाठी, त्यांचा विकास घडवून आणण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या गेल्या. त्यांच्यातील अज्ञान व अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न केला गेला. या प्रयत्नांमधून त्यांचे अज्ञान जरी दूर होत असले तरी त्यांच्यापुढे आज अनेक समस्या आहेत. सुशिक्षित आदिवासींसमोरील समस्यांचे स्वरूप व त्यावरील उपाययोजना याची चर्चा दिनानाथ मनोहर यांनी केली आहे.

आदिवासींपुढे असणाऱ्या अनेक समस्यांपैकी त्यांच्यामध्ये असणारे कुपोषण हीसुद्धा एक महत्त्वाची समस्या आहे. प्रा. बि. श्री. कुलकर्णी यांनी महादेव कोळी मुलांमधील कुपोषणाचा अभ्यास करून या कुपोषणामागची कारणे काय असू शकतील याची मानवशास्त्रीय दृष्टीकोनांतून मीमांसा केली आहे.

बेसुमार जंगलतोड हा आजच्या काळातील महत्त्वाचा प्रश्न आहे. यामुळे पर्यावरणाचे संतुलन ढळत चालले आहे. जंगलाचे महत्त्व लोकांना पटलेही आहे पण सरकारी अधिकारी या जंगलतोडीच्या बाबतीत कसे उदासीन आहेत हे सांगून जंगलतोडीविरुद्ध सुरू असलेल्या स्थानिक पातळीवरील चळवळीचे स्वरूप रा. बि. मुस्कुटे यांनी स्पष्ट केले आहे.

बारकू निरगुडा या कार्यकर्त्याने आदिवासीला स्वतःची जाणीव कशी होत आहे, एकतेचे महत्त्व कसे पटले आहे व अशी जाणीव करून देण्यास संघटना कशी मदत करते यासंबधीचे आपले अनुभव मांडले आहेत.

'भारतातील गुलाम श्रमिक' या पुस्तकाच्या परीक्षणात बांधील मजूर पद्धतीचा इतिहास व आजही तिचे अस्तित्व भारतात का आहे याचे विवेचन केले आहे.

या अंकावरील आपली मते व प्रतिक्रिया वाचक व कार्यकर्त्यांनी जरूर कळवाव्यात. त्यांना 'हाकारा'-मधून योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल.

# आवाहन

आपण परिषदेचे सन्मान्य सभासद आहात. या वर्षाची वर्गणी लवकरच पाठवावी अशा विचारातही असाल. काही सभासदांची गेल्या दोन-तीन वर्षांची वर्गणी राहिली आहे आम्ही आपले काम अधिक सोपे केले आहे. या अंकासोबतच परिषदेचा पत्ता लिहीलेला मनीऑर्डर फॉर्म पाठविला आहे. त्यावर आपले नाव व पूर्ण पत्ता लिहून आपली वर्गणी मनीऑर्डरने कृपया लवकरात लवकर पाठवा, यामुळे हाकारा 'चे अंक नियमित पाठविणे सोयीचे होईल.

# आदिवासींमधील सांस्कृतिक बदल आणि संघर्ष

डॉ. गोविंद गारे

संस्कृती म्हणजे काय ? संस्कृती या शब्दाचा अर्थ शब्द-कोषाप्रमाणे असा आहे : ' आपण जोपासना केल्यामुळे जो छानदारपणा ( म्हणजे रिफाइनमेंट ) आला आहे तो. ' दुसरा अर्थ : ' सुधारणेचा एक प्रकार. ' मानवशास्त्रज्ञ ज्या ज्या वेळी ' आदिवासीं 'वर लिहितात, त्या वेळी त्यांचा भर संस्कृतीवर असतो. आदिवासी बांधवांची एक निराळी पण फार जुनी अशी संस्कृती आहे. पण जसजशी ही मंडळी बाहेरच्या जगाच्या संपर्कात येतात तसतशी त्यांची ही संस्कृती देशाच्या संस्कृतीत विलीन होत असते हे निर्विवाद होय. आज ही बहुतेक मंडळी समाजापासून दूर अशा राना-डोंगरात रहात आहेत. त्यांची स्वतःची गावेच्या गावे वसलेली आहेत. पण आता ह्या राना–डोंगरांतही रस्ते व दळणवळणाची इतर साधने उपलब्ध होऊ लागली आहेत. त्यायोगे बाहेरच्या समाजाबरोबर ह्या लोकांचा संबंध वाढत आहे. तसेच बाहेरचा समाजही काही ना काही निमित्ताने आदिवासी भागात वावरू लागला आहे. त्याचा परिणाम म्हणजे दोघांच्याही जीवनावर एकमेकांच्या संपर्काने परिणाम घडत आहे. देशात सर्वत्र भौतिक शास्त्राच्या प्रगतीमुळे एक बदल घडून येत आहे. ' अवकाश युग ' किंवा ' अणुशक्ती युग ' सुरू झाले आहे, असे आपण आता बोलत असतो. पृथ्वीपासून ५०० मैल उंचीवरून मनुष्य अवकाशात चालू शकतो. एखादे अवकाशयान पृथ्वीपासून २॥–३ लाख मैलांवर असणाऱ्या चंद्राभोवती फिरू शकते व तेथून संदेश व छायाचित्रे पाठवू शकते. किंवा एखादा हायड्रोजन बॉंब सगळे जग एका सेकंदात नष्ट करू शकतो. ह्या ज्या गोष्टी घडून येतात त्यांना आपण शास्त्राचा विकास म्हणतो. हा विकास जंगलातील आदिवासीपर्यंत जाऊन पोहचला नसला तरी त्यांना ह्याबद्दलची माहिती अनेक मार्गांनी होऊ लागली आहे. आज ना उद्या हे शोध त्यांच्यापर्यंत जाऊन पोहोचतील. अवकाशयानातील माणसे लवकरच आदिवासीमधून घेतली जातील. तसेच अण्वस्त्रे किंवा हायड्रोजन बॉंब तयार करण्यातही त्यांचा हात राहील. कदाचित् ह्या शक्तीचा उपयोग त्यांचेकडून विधायक कार्या-करिता होऊन सर्व जीवनच बदलेल.

येथे हे विसरता कामा नये की, २१ वर्षांवरील प्रत्येक आदिवासी प्रौढाला- स्त्रीला व पुरुषाला स्वतंत्र भारताच्या घटनेप्रमाणे मत प्राप्त झाले आहे. मागच्या अनेक निवड-णुकांत त्यांनी आपला हक्क बजाविला आहे. इतकेच नव्हे तर लोकसंख्येच्या प्रमाणात लोकसभेवर, राज्य कायदे-मंडळावर त्यांनी आपले आदिवासी सभासदही निवडून दिले आहेत. त्यायोगे मंत्रिमंडळातही त्यांचा मंत्री, उपमंत्री म्हणून समावेश झाला आहे. ही मंत्रिमंडळेच अवकाश-यानातून कोणाला पाठवायचे, अण्वस्त्रे कोणी बनवायची, त्यांचा उपयोग कधी व कसा करावयाचा वगैरे बाबी ठर-वीत असतात. हे ठरविण्याचा ह्या आदिवासी मंत्र्यांनाही अधिकार आहे.

आफ्रिका खंडातील बहुतेक सर्व आदिवासी स्वतंत्र झाले असून त्यांनी आपली स्वतंत्र अशी राष्ट्रे बनविली आहेत, असे दृश्य आपणास दिसते. तसेच ही राष्ट्रे इतर पुढार-लेल्या राष्ट्रांच्या बरोबरीस लवकर कशी येतील याबद्दल त्यांचे जोराचे प्रयत्नही चालू आहेत. भारतात आदिवासींपैकी नागा व मिझो ह्या जमातींनी भारतापासून फुटून स्वतंत्र राज्य बनण्याकरिता मागची १७–१८ वर्षे भारताबरोबर सशस्त्र लढा दिला आहे. कोणती तरी परकीय सत्ता त्यांच्यामागे होती असे अनुमान काढता येते. पण ह्या पर-कीय प्रेरणेचा परिणाम इतका काळ सशस्त्र बंडात होऊ शकतो ही एक ध्यानात घेण्यासारखी घटना होय. काही वर्षांपूर्वी जगदाळपूरमध्ये जे अनिष्ट प्रकार घडले, ते त्या भागाचे आदिवासी जनतेतील जागृती दर्शवितात. बिहारमध्ये आदिवासींचे निराळे राज्य ( झारखंड ) मिळविण्याकरिता प्रयत्न चालू होते. तर महाराष्ट्र राज्यात कम्युनिस्ट तत्व-ज्ञानास आदिवासी जनतेचा पाठिंबा कमी होत आहे. हे कशाचे द्योतक आहे ? आदिवासी जनतेच्या मनःस्थितीत मोठाच फरक घडून येत आहे ह्याचे हे चिन्ह होय. त्यांची

राजकीय जागृती व त्याचबरोबर झालेला त्यांचा निराशावाद त्यांच्या असंतोषाचे मुख्य कारण होय. त्यांचे दारिद्रय व बेकारी नष्ट करण्याचे खरे प्रयत्न झाल्याखेरीज त्यांचा असंतोष मिटणार नाही हे त्याचे उत्तर आहे.

संस्कृतीमध्ये धर्म ही एक घटना आहे. त्यांचा धर्म प्रकृतिवाद आहे. हे आदिवासी हिंदुधर्मियांबरोबर हजारो वर्षे रहात आले. हिंदू धर्मियांनी त्यांना आपणात मिसळवून घेण्याचा प्रयत्न केव्हाही केला नाही. उलट, त्यांच्यावर प्रभुत्व कसे गाजवावे व त्यांना आपले गुलाम कसे करावे हाच आपला प्रयत्न असे. पण या प्रयत्नात हिंदुधर्मियांना यश आले नाही. कारण आदिवासी मंडळी अगदी दूरच्या जंगलांचा आश्रय घेती झाली. दुसऱ्या धर्मातील लोकांना आपले धर्मात घेण्याची हिंदुधर्मियांत प्रवृत्ती नाही. त्याची कारणे अनेक असू शकतील. पण मुख्य कारण त्यांच्यातील जातीभेद हे असावे. कारण, धर्मांतर केल्यावर कोणास कोणते जातीत घालावयाचे तसेच ती जात अशा माणसाला सामावून घेण्यास तयार होईल काय ? असे गुंतागुंतीचे प्रश्न उद्भवतात. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे आदिवासी जनतेची आपल्या धर्मावरील श्रद्धा ही होय. ह्या श्रद्धेमुळेच आज ते हजारो वर्षे आपले स्वतंत्र जीवन जगत आहेत. त्यांच्या धर्माप्रमाणे त्यांच्या अगदी स्वतंत्र अशा देवता आहेत. ह्या देवता म्हणजे त्यांच्या रोजच्या जीवनावर ज्यायोगे परिणाम होईल अशाच प्राकृतिक पंचमहाभूतांसारख्या होत. त्यांचे म्हणणे असे आहे की, प्रत्येक महाभूतामागे एक अदृश्य अशी शक्ती आहे. तसेच, पूर्वजपूजा हेही त्यांच्या धर्माचे एक वैशिष्ट्य आहे. ह्या पूर्वजांचा प्रत्येक कौटुंबिक कृत्यावर परिणाम होत असतो अशी त्यांची भावना आहे. मरणानंतर पूर्वज भूतपिशाच्चे होतात असा त्यांचा समज आहे. आपल्या दैवताकरिता त्यांनी कधी मंदिरे बांधली नाहीत किंवा त्यांची पूजाही केली नाही. त्यांची पूजा म्हणजे ह्या देवतांना कोंबडा अगर बकरा बळी देणे हीच होय. त्यांचे उपाध्याय म्हणजे त्याचे 'भगत.' ह्या भगतांमार्फत त्यांना कळायचे की, एखादा पूर्वज आपणावर रागवला आहे आणि त्याचा राग घालविण्याकरिता काय करावयाचे, तेही ह्या भगतांकडूनच समजायचे.

जे पुढारलेले आदिवासी आहेत ते लग्न, मरण वगैरे प्रसंगी हिंदु धर्मियांप्रमाणे वागू लागले आहेत. लग्नकार्यात गावची सगळ्यात वडील स्त्री धवलेरी, तिचा आता भाग राहिलेला नाही. तिच्याऐवजी उपाध्याय आला आहे. लग्न म्हणजे नाच ह्या कल्पनेसही फाटा मिळाला आहे. मरणोत्तर पिंड देण्याची प्रथा त्यांच्यात सुरू झाली आहे. पण हिंदुधर्मातील अनेक चालीरिती त्यांनी स्वीकारल्या असल्या तरी ते पुरे हिंदू बनलेले नाहीत. आदिवासींना हिंदू म्हणण्याचा प्रयत्न करणे तसे धाडसाचे होईल.

आता आपण ख्रिस्ती धर्माकडे वळू या. ह्या देशात सुमारे दोन कोटी ख्रिस्ती असतील. त्यापैकी आदिवासी किती हे सांगता येणार नाही, पण त्यांची संख्या फारशी नसावी असे दिसते. काही राज्यांत, विशेषतः आसाम, नागालँड, मिझोराम, मेघालय, अरुणाचल, बिहार व मध्यप्रदेश ह्या राज्यांत संख्या जास्त असेल, पण इतरत्र ती अगदी थोडी दिसते. उदाहरणार्थ, महाराष्ट्रात ५७ लाख आदिवासीत सुमारे १० ते १५ हजार गेल्या १००–१५० वर्षात ख्रिस्ती झाले आहेत. बहुसंख्य आदिवासींच्या जीवनावर ख्रिस्ती धर्माचा फारसा परिणाम झाला आहे असे वाटत नाही. ख्रिस्ती मिशनऱ्यांना आदिवासींकडून तसा फारसा प्रतिसाद मिळत नसतो. दुष्काळ, पूर व इतर आर्थिक समस्यांनी पिडलेले आदिवासीच ख्रिस्ती बनतात, पण इतर आदिवासी जनता मिशनऱ्यांच्या प्रलोभनाला बळी पडत नसते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मिशनरी प्रवृत्तीला आळा बसला आहे. आसाम, नेफा वगैरे भागात ब्रिटिश आमदानीत ख्रिस्ती धर्माचा प्रसार बऱ्याच मोठ्या प्रमाणात झाला असला तरी धर्मांतराने त्यांच्या जीवनावर फारसा परिणाम झाल्याचे दिसत नाही. धर्मांतरित मंडळी गुप्तपणे प्राणिपूजा व निसर्गपूजा ( ॲनिमिझम ) अमलात आणीत असतात. हे धर्मांतरित जरी स्वतःस इतरांपेक्षा श्रेष्ठ मानीत असले तरी इतर आदिवासी त्यांच्याकडे हे हीन आहेत ह्याच दृष्टीने पहातात. दुष्काळ, पूर वगैरे बाबतीत सरकारने योग्य त्या उपाययोजना केल्या आहेत तसेच शिक्षण सक्तीचे केले आहे. इतर विकास योजनाही अंमलात आणल्या आहेत. आता मिशनऱ्याचे काहीच चालणार नाही हे निर्विवाद होय.

शहरी जीवन, औद्योगीकरण वा साप्ताहिक बाजार ह्या आर्थिक बाबी आहेत. मानवशास्त्रज्ञ म्हणतात त्याप्रमाणे ह्या बाबींचा संबंध संस्कृतीशी नाही. आपण शहरी जीवनच पत्करावे असे आदिवासींना वाटत नाही. अगदी थोडे आदिवासी लोक शहरात स्थायिक झाले आहेत. मुंबईसारख्या ८० लाख वस्तीच्या शहरात उणेपुरे ८० हजारही आदिवासी नाहीत. त्यापैकी २०–२५ हजार आदिवासी मुंबईच्या त्या रानावनात असतात. बाहेरून मुंबईस येणाऱ्या आदिवासींची संख्या फारच कमी आहे. तसेच, दिल्ली हे

भारताच्या राजधानीचे शहर. त्याची वस्ती आता २० लाखांच्या वर गेली आहे. पण तीत आदिवासी औषधालाही मिळणार नाही. ५ कोटी आदिवासींपैकी १० लाख आदिवादिसुद्धा शहरी उद्योगधंद्यात शिरले आहेत असे दिसत नाही. शहरी जीवन हे ग्रामीण व जंगली जीवनाहून अगदी भिन्न आहे. जंगलातून आल्यावर तेथील आदिवासींना आपले घरदार व शेती ह्याबद्दलचा आर्थिक मोबदला स्वीकारून आपले मूळ वतन सोडावे लागते. अशा परिस्थितीत काही आदिवासी बांधव आणखी आतील भागात जातात तर काही त्या भागांत जे नवे शहर वसू लागते त्यात जाऊन राहू लागतात. त्यांना मिळालेला आर्थिक मोबदला शहरातील व्यसनापायी केव्हाच संपून जातो. त्यांना धंद्याचे प्रशिक्षण नसल्यामुळे शहरात आदिवासी साधे मजूर बनतात व कसेतरी आपले पोट भरतात. त्याचे जुने संस्कारी जीवन शहरात नष्ट होते व इतर मजूर त्याच्याकडे पहातांना ते कोणी रानटी आहेत अशीच दृष्टी ठेवतात. आपले उद्दिष्ट असे आहे की, उद्योगधंद्याचे विकेंद्रीकरण होऊन ग्रामीण भागात धंदे जावेत. त्याकरिता दळणवळणाची साधने, पाणी, बीज वगैरे साधने सरकारने त्यांना उपलब्ध करून द्यायची. जंगल भागासंबंधी म्हणावयाचे तर जंगल-उद्योगांना पुष्कळ वाव आहे. जंगलाचे औद्योगीकरण झाले तर आदिवासी बांधवांना त्यांच्या गावी काम व पैसा मिळू लागेल व ते शहराकडे धाव घेणार नाहीत हे निश्चित. औद्योगीकरणामुळे आदिवासी जीवनावर काय परिणाम होतात ते वर आले आहे. पण असे आदिवासी मूठभरच आहेत. त्यांच्या जीवनात शहरी जीवनाने क्रांती होत असली तरी तीन कोटी आदिवासींच्या नेहमीच्या जीवनावर त्याचा काहीच परिणाम होत नसावा.

शहरी जीवन किंवा औद्योगीकरण ह्यायोगे आदिवासी जीवनावर तितकासा परिणाम घडत असला तरी साप्ताहिक बाजार अगर बाजाराच्या जागा ह्यांचा त्यांच्या जीवनावर बराच परिणाम होत असतो. साप्ताहिक बाजार देशाच्या कानाकोपऱ्यातून भरत असतात. त्या बाजारांना हजारोंच्या संख्येने दूरदूरचे आदिवासी बांधव येत असतात. त्यात त्यांच्या स्त्रियांचा भरणा फार मोठा असतो. त्याचप्रमाणे आदिवासींखेरीज इतर जनताही शेकडोंच्या संख्येने तेथे गोळा होते. ह्यायोगे वस्तूंची देपाणघेवाण तर होतेच पण एकमेकांचा संपर्कही वाढण्यास संधी मिळते. ह्यामुळे दोघांच्याही जीवनावर हळूहळू परिणाम होत असतात. तसेच, आदिवासींची राजकीय प्रगती पहाता इतर मंडळी त्यांच्या बरोबर समानतेच्या भावनेने वागतात.

आपल्या समाजाचे पारंपारिकतेतून आधुनिक अवस्थेत परिवर्तन होत असताना ताण व संघर्ष निर्माण होणे अपरिहार्य असते. त्या संघर्षांची कारणे शोधून काढणे व त्यांच्या अनिवार्य परिणामांची तीव्रता कमी करणे हे उचित होय. आता आपण आदिवासींच्या समाजाचा त्या दृष्टीने विचार करू.

आदिवासींमधील नव्या नेतृत्वाने आपल्या जमातीत राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण केली आहे. भारताच्या घटनेने आदिवासींना केंद्रीय आणि राज्यातील कायदेमंडळात राखीव जागा दिल्या आहेत. काही राज्यांतील मंत्रिमंडळात आदिवासींचा समावेश केला गेला आहे. पंचायत राज्यातही त्यांना प्रतिनिधित्व मिळाले आहे. या सर्व गोष्टींमुळे त्यांच्यात राष्ट्रीय भावना उद्‌भवली आहे. संस्थांतील निवडणुका लढविताना त्यांना राजकीय क्षेत्रातील प्रशिक्षण मिळत गेले आहे. परंतु घटनेतील खास तरतुदींनी आदिवासींचे समाधान झालेले नाही.

आदिवासी जनता व इतर जनता यांत आर्थिक क्षेत्रात उद्‌भवणाऱ्या संघर्षाविषयी मला जास्त चिंता वाटते. प्राथमिक अवस्थेतील शेतीही न करता जंगल उत्पादन व जंगली जनावरांची शिकार यावर चरितार्थ चालविणारे काही आदिवासी आजही आढळतात हे खरे, पण त्यांची संख्या अत्यल्प असून ती उत्तरोत्तर कमी कमी होत आहे. आदिवासींचा दुसरा एक गट 'बदलती शेती' (शिफ्टिंग कल्टिव्हेशन) करणारा आहे. या गटात सुमारे २५ लाख आदिवासी असून भारताच्या ११ राज्यातील सुमारे १५ लाख एकर जमिनीत ते दरसाल बदलती शेती करतात. बदलत्या शेतीचे अनिष्ट परिणाम त्यांना पटवून देण्याचे सरकारने व समाज सेवकांनी खूप प्रयत्न केले. पण त्यास यश आले नाही. या प्रश्नाविषयी श्री. एम. डी. चतुर्वेदी व श्री. एस्. एच्. हॉचर्ड (पूर्वीचे इन्स्पेक्टर जनरल ऑफ फॉरेस्टस्) तसेच नियोजन मंडळाचे कार्यक्रम विषयक सल्लागार श्री. एम्. एस्. शिवरामन आणि आदिवासी विषयाचे एक तज्ज्ञ श्री. जे. पी. मिल्स या सर्वांनी व्यक्त केलेले विचार लक्षात घेतले पाहिजेत. बदलती शेती म्हणजे जमीनीचा अशास्त्रीय उपयोग, हा समज त्यांच्या मते चुकीचा आहे. तसेच बदलत्या शेतीमुळे जमिनीची मोठ्या प्रमाणावर धूप होते हा समजही त्यांच्या मते चुकीचा आहे. या विषयी ढेबर कमिशनने आपल्या अहवालात पान १४६ वर म्हटले आहे– 'सुमारे १० टक्के' आदिवासी बदलत्या शेतीवर आपली उपजीविका करतात. बदलत्या शेती विषयी

सर्व तज्ञांत एकमत नसताना त्यांना ( आदिवासींना ) आपल्या जमिनीस मुकावयास लावणे बरोबर ठरणार नाही. बदलती शेती ही आदर्श पद्धत नव्हे. याबद्दल सर्वांचे एकमत आहे. शक्य तेव्हा 'टेरेसिंग' आणि लागवडीच्या इतर पद्धती सुरू केल्या पाहिजेत याबद्दलही सर्वांचे एकमत आहे. परंतु विस्तृत प्रमाणशीर टेरेसिंग करणे शक्य नसल्याने बदलती शेती काही काळ चालू राहील असे दिसते.

खादी आयोगाने या प्रश्नाचा खोलवर विचार केला आहे. बदलत्या शेतीचा शास्त्रशुद्ध पायावर विकास करून त्यातील अपाय मर्यादित करणे; जमिनीचा कस वाढविणे आणि त्यासाठी अशा सर्व भागात संशोधन करणे हे धोरण योग्य ठरेल असा निष्कर्ष खादी आयोगाने काढला आहे. आदिवासींचे स्थिर शेतकरी म्हणून पुनर्वसन करण्याचा प्रयत्न करणारे सरकार व आदिवासी यांच्यात या क्षेत्रात कुरबूर निर्माण झालेली आहे.

आदिवासींचा तिसरा गट म्हणजे स्थिर शेती करणारा आणि जंगलकाम करून पुरवणी उत्पन्न मिळविणारा. आदिवासींमध्ये हा तिसरा गट सर्वांत मोठा आहे. हा गट आता राजकीयदृष्ट्या जागृत झाला आहे. त्यातून नवे नेते उदयास आले आहेत. मंत्री मंडळातील आदिवासी प्रतिनिधी तसेच राज्यातील कायदे मंडळे, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती वगैरे मधील आदिवासी प्रतिनिधी या गटातील आहेत. या विशिष्ट वर्गाला प्रगती हवी असली तरी आपली स्वतःची जीवनपद्धत बदलण्यास ते तयार नाहीत. जमीनदार, लहान व्यापारी, जंगलाचे ठेकेदार, सरकारी अधिकारी वगैरेकडून आदिवासींची होणारी पिळवणूक थांबली पाहिजे असे त्या वर्गात वाटते आणि ह्याच ठिकाणी संघर्ष निर्माण झाला आहे. ही पिळवणूक नष्ट करण्यासाठी आदिवासी प्रतिनिधी झगडत आहेत. त्यांचे प्रयत्न बऱ्याच अंशी यशस्वी झाले आहेत.

आदिवासी व बिगर आदिवासी सभासदांच्या सरकारवरील प्रभावामुळे कूळ कायदा, कमाल जमीन धारणा कायदा, हस्तांतर जमिनीचा कायदा, आदिवासींची आर्थिक स्थिती सुधारणा कायदा १९७६, एकाधिकार धान्य खरेदी कायदा, सावकारी नियंत्रण कायदा, जमीनदारी व तालुकादारी नष्ट करणारे कायदे करण्यात आले. आदिवासी हा आपल्या ग्रामीण समाजातील अत्यंत पिळला गेलेला वर्ग असल्यामुळे ह्या कायद्यांनी त्याला बराच दिलासा मिळाला आहे.

परंतु आदिवासींना मिळालेल्या जमिनीचे क्षेत्र अत्यंत लहान आहे. त्यातील पिके सर्वस्वी पावसावर अवलंबून असल्याने दर चौथ्या किंवा पाचव्या वर्षी पावसाच्या अवकृपेमुळे पिके नष्ट होऊन आदिवासींची संपूर्ण अर्थव्यवस्था कोलमडते. ती अर्थव्यवस्था पुन्हा सावरण्यास कित्येक वर्षे लागतात. चांगला पाऊस झालेल्या वर्षीही शेतीचे उत्पन्न जेमतेम दोन-तीन महिने पुरते. ढेबर कमिशनने म्हटल्याप्रमाणे लावणीचे काम संपल्यावर दुसरे काहीही नसल्याने पावसाळ्याचे किमान दोन महिने बहुसंख्य आदिवासींना कंदमुळांवर निर्वाह करावा लागतो. या काळातील उपासमार व वर्षाच्या इतर महिन्यांतील अर्ध उपासमार आदिवासींना अतिशय जाणवते. पंचवार्षिक योजनांवर कोट्यावधी रुपये खर्च होऊनही हा प्रश्न सुटलेला नाही ही परिस्थिती कधी आणि कशी सुधारणार असा आदिवासींचा प्रश्न आहे. आदिवासी विकास गटामुळे व आदिवासी उपयोजनेमुळे त्यांचे दारिद्र्य व बेकारी हे मुख्य प्रश्न सुटलेले नाहीत. पिण्याच्या पाण्याच्या विहिरी, वाहतुकीसाठी जोडरस्ते, शाळांच्या इमारती यांसारख्या काही सं यी उपयोजना विकासामुळे कार्यरत आहेत हे खरे. तथापि, या क्षेत्रातील शेतीवरच भर दिला आहे. सुमारे ४० ते ५० टक्के आदिवासी भूमिहीन मजूर आहेत आणि बाकीचे आदिवासी त्यांच्यापाशी वरकस जमीन धरून १ ते १० एकरांपर्यंत म्हणजे अपुरीच जमीन आहे. १० एकरांपेक्षा जास्त जमीन असणाऱ्या म्हणजेच सुमारे १० टक्के आदिवासी शेतकऱ्यांना फायदा मिळतो. उरलेल्या सुमारे ९० टक्के आदिवासींना याचा काहीच उपयोग होत नसल्याने त्यांच्यात बराच असंतोष आहे.

कुरबूरीचे आणखी एक कारण म्हणजे सध्याचे जंगलविषयक धोरण. ढेबर कमिशनने आपल्या अहवालात याविषयी एक संपूर्ण प्रकरण लिहिले आहे. जंगल ठेकेदारांच्या ऐवजी जंगल कामगारांच्या सहकारी संस्थांकडे जंगलाचे काम द्यावे असे अहवालांत म्हटले आहे. मध्यवर्ती शासनाने राज्य सरकारांना अशीच सूचना केली. असून जंगल कामगार सोसायट्या सुरु करण्यासाठी पैशाची व्यवस्था केली होती. ढेबर कमिशनने याबाबत जोराची शिफारस केली आहे. १९६१ मध्ये ढेबर कमिशनने आपल्या अहवालात म्हटले की, महाराष्ट्र व गुजरात यात असलेल्या सुमारे ७०० जंगल कामगार सोसायट्याखेरीज बाकीच्या भारतात अशा फक्त ९० सोसायट्या आहेत. जुन्या मुंबई राज्यात

( पान २५ वर पहा )

# आदिवासींचा विकास आणि नवी आव्हाने

डॉ. श. गो. देवगावकर

स्वातंत्र्यपूर्व भारतात ब्रिटिश राजसत्तेच्या हातून प्रशासनाच्या कार्याच्या अनुषंगाने जो काही विकासात्मक कार्ये पार पडली त्याचा भारतातील नागरी समाजाला काही अंशी लाभ मिळत गेला. ग्रामीण समाज मात्र उपेक्षितच राहिला. पर्वतराजीवर, दऱ्याखोऱ्यांत आणि गिरिकंदरांत राहणारा आदिवासी हा तर संपूर्णपणे दुर्लक्षितच राहिला. त्याचे मुख्य कारण म्हणजे त्याचेकडे लक्ष देऊन ब्रिटिश साम्राज्यशाहीला कोणताच लाभ होणार नव्हता. अर्थात हे विधान करीत असताना दुसऱ्याही एका वस्तुस्थितीचा उल्लेख करणे आवश्यक आहे. त्याच ब्रिटिश शासनयंत्रणेत लहानमोठ्या प्रशासकीय पदावर कार्यरत असलेल्या तत्कालीन ब्रिटिश आय. सी. एस. अधिकाऱ्यांनी आपला कार्यभाग सांभाळीत असताना दुर्गम अशा आदिवासी विभागात जाऊन तेथील लोकजीवनाची पाहणी करून जे संशोधनात्मक आणि अभ्यासपूर्ण लिखाण केले, त्याचे श्रेय त्यांना द्यावेच लागेल. यात प्रामुख्याने डब्ल्यू. व्ही. ग्रीगसन, आर. व्ही. रसेल, आर टेंपल, ल्युसी स्मिथ, सी. यु. विल्स, जॉन ड्रेक आणि खिजॉफ हॉन फ्युरर हायमेन्डार्फ इ. व्यक्तींचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. त्याबरोबर रे. हिस्लाप, डॉ. व्हेरियर एल्विन आणि भाषिक विकासाच्या दृष्टीने पायाभूत संशोधन करणारे श्री जी. ए. ग्रीअर्सन ह्यांचा देखील उल्लेख करावा लागेल मात्र ख्रिस्तॉफ फ्युरर हायमेन्डार्फ ह्यांचा संबंध जुन्या निजामशाहीतील आदिलाबाद विभागातील गोंडांच्या विकासकार्याशी आला. किंबहुना त्यांच्याच नेतृत्वाखाली हे कार्य सुरू झाले. त्यांच्या नेतृत्वाखाली कार्य केलेल्या अनेक मान्यवर प्रशासकीय व्यक्ती या महाराष्ट्राला लाभल्यात हे विशेष. मात्र ध्येयधोरणाचा भाग म्हणून आदिवासी-विकासाकडे स्वातंत्र्योत्तर काळातच लक्ष पुरविण्यात आले आणि त्यात तत्कालीन प्रधानमंत्री पं. जवाहरलाल नेहरू ह्यांचाच सिंहाचा वाटा होता, हे एक ऐतिहासिक सत्य आहे. पहिली पंचवार्षिक योजना राबविण्यास सुरुवात झाली त्याच काळात सामूहिक विकास योजनांनाही प्रारंभ झाला आणि इतर ग्रामीण भागांतील परिस्थिती व राष्ट्रजीवनाच्या मुख्य प्रवाहापासून एकलकोंडे आणि भिन्न सांस्कृतिक जीवन जगणाऱ्या आदिवासींची परिस्थिती ही बऱ्याच बाबतीत भिन्न होती. त्यांच्या समस्याही भिन्न होत्या. म्हणून यासाठी उपाययोजनाही भिन्न असणे आवश्यक होते. या कार्यात ज्या दोन कार्यकर्त्या अभ्यासकांनी योगदान दिले, त्यात डॉ. एल्विन व डॉ. बेहराम मेहता ह्यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. पं. नेहरूंच्या निकटवर्ती आणि विश्वातील अशा या दोन अभ्यासकांची आदिवासीविकासाकडे पाहण्याची पूर्व-भूमिकाही थोडी वेगळी होती, हे लक्षात घ्यावे लागेल. वर वर्णिलेल्या ब्रिटिश सरकारच्या अलिप्तवादी भूमिकेतून आणि काही अंशी मानववंश शास्त्रज्ञांना प्रयोगशाळा शिल्लक रहावी म्हणून आदिवासींच्या बाबतीत 'जैसे थे' भूमिका ( Keep them as they are ) काहींनी स्वीकारली होती. डॉ. एल्विन ह्यांची सुरुवातीची भूमिकाही अशाच स्वरूपाची होती. मात्र कालांतराने त्यांची ही भूमिका बदलत गेली. आदिवासींच्या जीवनपद्धतीत झपाट्याने बदल घडवून आणावा ही दुसऱ्या टोकाची भूमिकाही प्रचलित होती. विकासाच्या नावे आदिवासींना 'उपटण्याची' ही अतिरेकी भूमिका पं. नेहरूंना मान्य नव्हती. ह्या दोन्हीचा सुवर्णमध्य पं. नेहरूंच्या नावे सांगण्यात येतो तो असा की, आदिम जमातींना विकासाच्या संधी आणि आवश्यक त्या आंतर-रचना ( Intra-structure ) उपलब्ध करून देऊन यथावकाश बाह्य जगतातील जीवनप्रवाहात मिसळण्याची संधी ( Gradual assimilation ) उपलब्ध करून द्यावी; मात्र त्या वेळी त्यांच्या संस्कृतीतील चांगल्या आणि उपयुक्त अशा गोष्टींचेही जतन आणि त्यासोबत विकास करावा, ही भूमिका डॉ. एल्विन ह्यांनीही स्वीकारली. डॉ. बेहराम मेहता ह्यांची मात्र हीच भूमिका प्रथमपासून होती. पहल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात आदिम विकासावर नियोजनमंडळाचे सल्लागार म्हणून ते कार्य करीत होते. इतकेच नव्हे तर मुंबईच्या 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायसेन्स'च्या ट्रायबल कम्युनिटी ऑग्गनायझेशन'चे प्रमुख आणि प्राध्यापक म्हणून मध्यप्रदेशातील 'तामिया' या विकासखंडाचे कार्य त्यांनी हाती घेतले होते. भारत सरकारने डॉ. एल्विन ह्यांच्या नेतृत्वाखाली नेमलेल्या समितीने आदिवासी विकास-खंडाची शिफारस केली आणि त्याचप्रमाणे विशेष अनुदान प्राप्त असे आदिवासीविकास-

खंड निर्माण करण्यात आले. मध्यंतरीच्या काळात निर्माण करण्यात आलेल्या विशेष बहुउद्देशीय विकास खंडाची जागा त्यांनी घेतली.

यानंतर आदिवासी विकासासाठी किमान सहा शासकीय कार्यक्रम स्वीकारण्यात आले आणि आदिवासी जमातींसाठी विभागीय विकास ( Area development ) दृष्टिकोन स्वीकारण्यात आला. परंतु काही विभागातील आदिवासी जमाती या विखुरलेल्या होत्या. तसेच काही जमाती अतिमागास होत्या. तेव्हा त्यांच्यासाठी एकात्मिक आदिवासी विकास दृष्टिकोन स्वीकारण्यात येऊन प्रकल्प करण्याचे ठरविण्यात आले. ( Integrated Tribal Development Project ) पन्नास टक्के किंवा त्याहून जास्त आदिवासी संख्या असलेल्या विभागासाठी आदिवासी उपयोजना ( Tribal Sub-plan ) करण्यात आल्या आणि विविध पंचायत समिती किंवा तहसीलमधील आदिवासी विभाग एकत्र समजून या उपाययोजना आखण्यात आल्या. पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी या विभागांचे निश्चितीकरण झाले आणि कार्य जोरात आले. अतिमागास ( Primitive ) विभागांसाठी स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन उपयोजना कार्यक्रम ठरविता येईल व त्यासाठी विशेष अभ्यासप्रकल्प राबविले जातील अशी स्वागतार्ह तरतूद करण्यात येऊन महाराष्ट्रात त्यासाठी सुरुवातीलाच सुमारे ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली.

आदिवासी विकासासंबंधी वर घेतलेल्या संक्षिप्त आढाव्या वरून हे स्पष्ट होते की, आदिवासी विकासाबद्दलचे धोरण आणि दिशा ही गेल्या पाच पंचवार्षिक योजनांच्या काळात सुस्पष्ट झालेली आहे व त्या दृष्टीने बरेच कार्यही झालेले आहे. त्या कार्याची फलश्रुती म्हणून आदिवासी विभागांना कमीजास्त प्रमाणात लाभही प्राप्त झाले आहेत. त्यामुळे आदिवासींच्या जीवनावर होणाऱ्या चर्चा परिसंवाद किंवा भाषणे यातून 'आदिवासींचा विकास' घडवून आणावा काय ?' या किंवा अशा मुद्यांवर करण्यात येणारी चर्चा हा निरर्थक काथ्याकूट होय. अर्थात अशा व्यक्तींमध्ये हौसे, गवशे आणि नवशेच जास्त असतात आणि त्यांना वर दिलेल्या विकास प्रक्रियेची काहीही कल्पना नसते. किंबहुना आदिवासींबद्दल चर्चा करणे ही एक फॅशन म्हणून बोलणारेच त्यात जास्त असतात. वास्तविक आतापर्यंतच्या आदिवासी-विकास-कार्याचा झालेला परिणाम अभ्यासल्यास भारतातील आणि महाराष्ट्रातील विविध आदिवासी जमाती सामाजिक, आर्थिक विकासाच्या विविध टप्प्यावर येऊन उभ्या आहेत आणि स्थूलमानाने पाहता त्यांच्या सांस्कृतिकरण प्रक्रियेतील अवस्था, पर्यावरण आणि त्यांची विकसनक्षमता ह्यांचेशी संलग्न असे हे टप्पे होत. तेव्हा आता इथून मागे जाणे नाही. मात्र पुढे जात असताना मागील अनुभवावरून फेरविचाराची गरज आहे. काही जुन्या समस्या सुटल्या असल्या तरी काही नवीन समस्या निर्माण होऊ पाहात आहेत व त्यामुळे संबंधित आदिवासी जमातींच्या समोर, आदिवासी-विकासाची जबाबदारी पार पाडणाऱ्या शासनासमोर, आदिवासी विकासात सहभागी होणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या समोर काही नवीन आव्हाने निर्माण झालेली आहेत. त्यांतील सर्वांचा परामर्ष घेणे जरी शक्य नसले तरी प्रस्तुत लेखकाच्या अनुभवांतून महत्त्वाच्या वाटणाऱ्या काही आव्हानांचा विचार पुढे करण्यात येत आहे.

## आदिम जमातींपुढे निर्माण झालेली काही नवी आव्हाने

हजारो वर्षांपासून आपल्या सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरा आणि रीतिरीवाजांचे निष्ठेने जतन केलेल्या आदिवासींना विकासामुळे बदलत असलेल्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीशी जुळवून घेण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. त्यांच्या मनात श्रद्धेने जपलेल्या मूल्यांनाच बदलविण्याचा हा प्रश्न आहे. उदाहरणादाखल आपण खालील गोष्टींचा विचार करू.

फिरती शेती करणाऱ्या आदिवासींना स्थिर शेती करावयास लावल्यानंतर आणि बीजारोपण प्रसारित पद्धतीने करणाऱ्यांना (Broadcast method) शेती नांगरून सुधारित पद्धतीने करायला लावल्यावर विकासाचा एक टप्पा आपण गाठल्याचे समाधान आपणास लाभत असले तरी आदिवासींच्या मनामध्ये मात्र संघर्ष निर्माण होतो. कारण हा बदल त्यांच्यासाठी केवळ सामाजिक, आर्थिक जीवनातील नसून भूमातेच्या छातीवरून नांगर न चालविण्याच्या मूल्यामध्येही झालेला बदल असतो. केवळ उपयोगितेसाठी उत्पादन, म्हणजेच उपयोगितामूल्याच्याच भूमिकेतून ( अर्थात अजाणतेपणे ) जीवन जगणाऱ्या आदिवासीत वस्तुविनिमयाचीच अवस्था अजूनपर्यंत रूढ होती. त्याऐवजी आर्थिक व्यवहार आणि विनिमयमूल्य, विकासप्रक्रियेतून ज्ञात झाले असले तरी धडपणे ना ते अंगवळणी पडले, ना नीटपणे ज्ञात झाले. त्यामुळे अनेकदा आदिवासींच्या आर्थिक विकासाऐवजी त्यांचे शोषण होऊन गैर आदिवासींचाच विकास होण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे.

देवधर्माच्या विधीमध्ये आणि सुखदुःखाच्या प्रसंगी ताडीचा वापर करणारा, मोहाच्या फुलांची भाजी आणि बियांचे तेल काढून दैनंदिन जीवन जगणारा आदिवासी केवळ विवाहसमारंभ किंवा तत्सम प्रसंगीच मोहाची दारू पितो. परंतु पिऊन तर्र झालेला आणि गटारात लोळणारा आदिवासी, आदिवासी-विभागात क्वचितच सापडतो. बाहेरून आलेले लोक मात्र आदिवासी भागातील आपले कार्य चोखपणे पार पाडण्यापेक्षा पिऊन तर्र होऊन आपले काम न करता सार्वजनिक 'तमाशा' करताना अनेकदा सापडतात. यांत अनेक विविध खात्यांमधील लहानमोठे अधिकारी, इतकेच नव्हे तर शांतता-सुव्यवस्था ह्याची जबाबदार अंगावर असलेले गणवेषधारी अधिकारी प्रस्तुत लेखकाने स्वतः बघितले आहेत. या पार्श्वभूमीवर शासनातर्फे किंवा स्वयंसेवी संघटनांतर्फे नशाबंदी सप्ताहांतर्गत कार्यक्रम जेव्हा आम्ही आयोजित करतो, तेव्हा एखादा निरक्षर माडिया वृद्ध आम्हाला विचारतो, 'पूजेच्या वेळीसुद्धा दारूचा उपयोग करू नका असे तुम्ही आम्हाला सांगता आणि ताडी प्यालो असलो तरी आम्हाला पकडतात' पण मग शासकीय अधिकारी पिऊन तर्र होऊन पडलेले असतात त्याचे काय!' अशा प्रश्नांची उत्तरे देणे आम्हाला अवघड असते. विकास-प्रक्रियेतून होणाऱ्या जाणीव-जागरणाचे, अस्मिता-जागरणाचेच हे फलित असते व एका दृष्टीने पाहता हे स्वागतार्ह आहे हेही खरे. परंतु आदिवासींच्या निरागस मनात गुदमरणारा हा मूल्यसंघर्ष तुम्हाआम्हाला अडचणीत टाकणारा ठरतो.

विकासप्रक्रियेसाठी अत्यंत आवश्यक असलेले आणि आदिवासींमधूनच आलेले विकासाभिमुख स्थानिक नेतृत्व ही एक आवश्यक बाब आहे. दुर्दैवाने आदिवासी-विभागात परंपरागत नेतृत्व असले तरी बहुतांश ठिकाणी ते विकासाभिमुख नाही आणि असले तरी नेत्यांचे हितसंबंध आणि ज्यांचे नेतृत्व ते करण्याचा दावा करतात त्यांचे हितसंबंध यांत दुरावा निर्माण झाल्याचे दिसते. अलीकडील नवीन युवा-पिढीमध्ये परंपरागत नेतृत्वाबद्दलही पूर्वीसारखा अंधश्रद्धायुक्त आदर आढळत नाही आणि विश्वासाने ज्यांच्या मागे जावे असे नवीन नेतृत्वही त्यांना सापडत नाही, ही अत्यंत घातक परिस्थिती आहे. संधिसाधूंना, हिसावाद्यांना हळुवारपणे पाय रोवण्यासाठी सोयीची आहे. स्वार्थी, भ्रष्ट आणि ज्या आदिवासींसाठी कार्य करावयाचे म्हणून आपण आलेले आहोत, त्यांच्याबद्दल मुळीही आस्था, जिव्हाळा नसलेले, केवळ शिक्षेवर आल्याप्रमाणे कार्यभार सांभाळणारे काही अधिकारी ही परिस्थिती अधिक स्फोटक बनवितात. अशा परिस्थितीत कमी-जास्त शिकलेल्या आदिवासी युवक आणि युवतींना शासकीय किंवा गैरशासकीय परंतु विश्वासार्ह माध्यमामधून योग्य ती दिशा दाखविणे, त्यांचे संघटन करणे, त्यांच्या विकासाच्या आणि विधायक कार्यात त्यांना पुढाकार घ्यायला लावणे आणि परंपरा व प्रगती यांतील परिस्थितिसापेक्षमध्य काढून वाटचाल करण्यास त्यांना प्रोत्साहन व सहकार्य देणे ही आवश्यक बाब होय. नेतृत्वाची ठेकेदारी बंद करून नेतृत्व करणारी युवकांची एक रांग (Cadre) निर्माण करणे ही काळाची गरज आहे.

ऐतिहासिकदृष्ट्या पाहता जंगलाचे जतन आदीवासींनी केलेले आहे, कारण वृक्ष आणि जंगल हेच त्यांचे घर होते. जीवनाला आवश्यक तेवढेच लाकूड तोडून आणणे आणि फुले, पाने, मध, गोंद आणि झाडांपासून मिळणारे इतर रस आणि पदार्थ ह्यांचा आवश्यक तेवढाच उपयोग करून घेऊन जीवन जगणारा आदिवासी हाच खरा वृक्षमित्र होय. ब्रिटिश काळापासून वनसंपत्तीची कल्पना बाह्य जगाला आल्यानंतर वनसंरक्षण खाते व त्याबरोबरच वनातील झाडांची तोड या दोन्ही गोष्टींना सुरूवात झाली. खाजगी जंगलकंत्राटदारांच्या जमान्यात तर अवैधमार्गाने बारेमाप जंगलतोड झाली. उशीरा का होईना ही कंत्राटदारपद्धती संपुष्टात आणण्यात आली आणि हे कार्य पूर्णपणे जंगलखात्याकडे आले. तेव्हापासून वनसंरक्षण संवर्धन व कटाई या तिन्ही बाबी शास्त्रशुद्ध पद्धतीने सुरू झाल्या आहेत. हे जरी स्वागतार्ह असले तरी जंगलावरच ज्याचे जीवन निर्भर आहे असा आदिवासी स्वतःच्या घरीच पाहुणा झाला आहे. तसेच वनविकासाचे धोरण हे व्यापारी (commercial) वृत्तीवर आधारलेले आहे. याचा तत्कालिक परिणाम आदिवासींच्या जीवनावर होतो आणि कालांतराने राष्ट्रावरही होईल याकडे दुर्लक्ष होत आहे. मोह, खैर बाभुळ, हिरडा, ब्याहडा, धवड, आंबा, वड, पिंपळ, उंबर, टेंभरू आणि इतर अनेक वृक्ष हे फुले, फळे, सावली, औषधी रस इ. देणारे तर आहेतच, पण यांच्या अनुषंगाने मधमाशा, कीटक, विविध पक्षी, रानातील जनावरे जगतात. अशा पक्ष्यांवर व लहान जनावरांवर व्याघ्रसिंहादि जनावरे जगतात आणि या संतुलित नैसर्गिक पर्यावरणावर वनमानवाचे व ग्रामाचे जीवन चालते आणि शहरी संसाधनांवर येणारा भार कमी होतो. उलट वनव्यवस्थेतूनच शहरी जीवनाला विविध वस्तूंचा लाभ मिळत आलेला आहे. वनविकास महामंडळाने स्वीकारलेल्या धोरणांतर्गत मात्र वृक्षकटाई झालेल्या सर्व नवीन क्षेत्रांमध्ये सागवानाचे वृक्षारोपण हाती घेण्यात आलेले आहे. हा वृक्ष कीटक, पक्षी, पशू

आणि मानव यांना सावली तर सोडाच पण दुसऱ्या कुठल्याही दृष्टीने उपयोगी नाही. त्याचे आकर्षण एकच, सागवानाच्या लाकडाला बाजारभाव उत्तम आहे आणि त्यातून शहरी संस्कृतीतील उच्चभ्रू समाजाच्या हौशीची पूर्ती होते आणि लाकडाचा धंदा करणाऱ्या व फर्निचरचा व्यवसाय करणाऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारते. उद्या सगळी सागवानाचीच जंगले झाली तर फार मोठे असंतुलन निर्माण होईल. दुसरे असे की, सागवान वृक्षामुळे जमिनीतील पाण्याची पातळी ( Water level ) खाली जाते. त्यामुळे आदिवासी-विभागात पिण्याच्या पाण्याचीही समस्या निर्माण होत आहे. वनविकास धोरणातून निर्माण झालेली ही आव्हाने ही आज केवळ आदिम समाजाची वाटत असली तरी उद्या संपूर्ण राष्ट्रापुढील आव्हाने बनणार आहेत, ह्याची आपण वेळीच दखल घ्यावयास हवी.

विकासप्रक्रियेतील एक महत्त्वाचे अंग म्हणजे शिक्षणाचा प्रसार आणि प्रबोधन कार्य होय. सर्वदूरच्या आदिवासी विभागात प्राथमिक व माध्यमिक शाळा, आश्रमशाळा आणि निवासी-शाळा ह्यांचेद्वारे बरेच कार्य करण्यात आले असून त्याचा प्रभावही कमी-जास्त प्रमाणात आढळतो. तरीही जास्त सुयोग्य आणि समर्पित शिक्षक आणि आदिवासी जनजीवन व बोली ह्याबाबत शिक्षकांना पूर्वप्रशिक्षण देण्यात आले असते तर ह्याच अवस्थेतून शिक्षणाचा फार जास्त प्रभाव पडला असता, तसेच आदिवासी उपयोजनेच्या मूळ आकृतिसंबंधात कल्पिलेली ' आश्रम-स्कूल कॉम्प्लेक्स ' ची कल्पना प्रत्यक्षात कधीच उतरविण्यात आली नाही. तिच्याशी संलग्न असलेली Growth centre ची कल्पनाही कागदावरच राहिली. जुन्या आकृतिबंधातील चालत आलेल्या रचना आणि उपाययोजनेत सुचविलेल्या आदिवासी को-ऑपरेटिव्ह सोसायटीसारख्या नवीन रचना ह्यांचा तात्कालिक मेळ घालून तोच स्थायी स्वरुपात चालविण्यात आला. त्याचबरोबर प्रौढ शिक्षण कार्यक्रमही राबविण्यात आला. या सर्व गोष्टींची गोळाबेरीज परिणाम म्हणा किंवा अन्य समाजसेवी संस्थांनी केलेल्या कार्याचा परिणाम म्हणा आदिवासींमध्ये जाणीव-जागृती दिसू लागली. खायला, प्यायला आणि रहायला मोफत व्यवस्था, गणवेश इ. ची सवलत असूनही जे आदिवासी पालक १९७४-७५ पर्यंत आपल्या मुलांना शाळेत पाठविण्यास इच्छुक नसत आणि आपल्या मुलाला पाठविण्याची इच्छा झाल्यास गावच्या मुखियाला किंवा परंपरागत नेत्याला विचारून मगच पाठवीत, तेच पालक जाणीव-जागरणामुळे शाळेत शिक्षक नाहीत ह्यासाठी आंदोलन करू लागले. आदिवासी सहकारी संस्थेतून त्यांच्या मालाचे पैसे मिळाले नाहीत म्हणून वरिष्ठ अधिकाऱ्याला भेटून तक्रारी करू लागले. वेठबिगारीबद्दल एखाद-दुसरा का होईना आवाज करू लागला, सरकारी दवाखान्यात डॉक्टर नसल्याची आपली व्यथा बोलून दाखवू लागला. म्हणून पुन्हा त्यांच्यापुढे आणि आपल्यापुढे नवीन आव्हाने निर्माण झालीत. आर्थिक बाबतीतही व्यापारी व सावकारांकडून आपले शोषण होत आहे, इतर अनेक लोकांकडून वेठबिगार करून घेतली जात आहे, ह्याचीही जाणीव निर्माण झाल्याने नवीन आव्हाने समोर उभी ठाकलीत. Ignorance is bliss अशी एक म्हण आहे. ज्ञान होऊ लागल्याबरोबर अज्ञानामुळे असणारी संतुष्टता लोप पावली आणि तिची जागा अपेक्षेने व अपेक्षापूर्ती न झाल्यामुळे निर्माण होणाऱ्या उद्वेगाने घेतली. आपल्या मागण्या व आपला उद्वेग प्रकट करण्याच्या विधिमान्य व राजमान्य पद्धती माहीत नसल्यामुळे असहाय्यतेची जाणीव निर्माण होऊन यातूनच तणाव निर्माण होऊ लागले. जागृत आदिवासींपुढे ही नवीन आव्हाने उभी राहू लागलीत.

## शासनापुढील आव्हाने

ह्याच नाण्याची दुसरी बाजू म्हणजे शासनासमोर उभी राहिलेली आव्हाने होय. एखाद्या जनसमूहाचा विकास घडवून आणण्यासाठी कटिबद्ध झाल्यानंतर आणि काही विकासयोजना कार्यान्वित झाल्यानंतर त्या विकसनशील समूहाच्या मनात आशाआकांक्षा व अपेक्षा निर्माण होतात. त्याची परिपूर्ती करण्याची क्षमता शासनव्यवस्थेत आहे किंवा नाही हा प्रश्न महत्त्वाचा असतो. नाहीतर आपले धोरण आपल्यावर उलटण्याची शक्यता असते. यासाठी विकासकार्यात येणाऱ्या अडचणी, तक्रारी व सूचना तत्परतेने विचारात घेऊन त्या सुयोग्य वाटल्यास गल्लीपासून दिल्लीपर्यंत आवश्यक त्या खटपटी करून या नवोदितांचे समाधान करण्याची पात्रता शासनास असावयास हवी. दुर्दैवाने यासाठी आवश्यक असलेली प्रशासकीय कार्यक्षमता वैचारिक गतिक्षमता, पुरेसे बुद्धिचातुर्य आणि तडफदारपणा असलेले विकास अधिकारी विकासप्रशासनात अपवादानेच सापडतात. कारण प्रशासनकौशल्यात प्रख्यात अशा व्यक्तींना आदिवासी विभागात पाठविण्याऐवजी बदनाम झालेल्यांना शिक्षा म्हणून आदिवासी-विभागात पाठविणे हीच प्रथा रूढ झालेली होती. दुसरे कारण म्हणजे निर्णय

( पान १४ वर पहा )

# सुशिक्षित आदिवासींसमोरील समस्या

दिनानाथ मनोहर

## समस्यांचे स्वरूप :

भारत स्वतंत्र झाल्यापासून भारतीय समाजातील मागासलेल्या जाती जमातींना विकसित करण्यासाठी शासनाकडून खास प्रयत्न होऊ लागले. विशेषतः गेल्या तीन दशकात हे प्रयत्न परिणामकारक रीतीने अंमलात आणले जाऊ लागले. मागासलेल्या जाती–जमातींचे आर्थिक उत्थापन व्हावे ह्यासाठी विविध योजना आखण्यात आल्या. त्यांना शिक्षण मिळावे म्हणून विशेष प्रयत्न करण्यात आले. ह्याचा परिणाम म्हणून आदिवासींच्या वास्तव परिस्थितीत निश्चितच फरक झालेला आहे. आदिवासींच्या विकासासाठी झालेल्या प्रयत्नांमुळे आणि एकूणच ग्रामीण जीवनात झालेल्या स्थित्यंतरामुळे पूर्वी आदिवासींना ज्या समस्यांना सामोरे जावे लागत असे त्या समस्यांचे स्वरूप आता बदलले आहे. परंतु त्या समस्या आता राहिलेल्या नाहीत असे मात्र नाही. त्या समस्या अजूनही आहेत परंतु आता त्यांचे रूप काहीसे वेगळे झाले आहे. पूर्वी आदिवासींना शिक्षणाच्या सोयी उपलब्ध नव्हत्या. आता शिक्षणक्षेत्रांतील सोयी व सवलतीमुळे एक सुशिक्षित पिढी आदिवासींमधून पुढे येत आहे. ह्या पिढीला नव्याच प्रकारच्या समस्यांशी सामना करावा लागत आहे. पूर्वी आदिवासी ज्याप्रकारे शेती करत होता तशी ते आज करत नाही. आता त्यांच्या शेतीयंत्राचे बरेच आधुनिकीकरण झाले आहे. त्यामुळे शेतीत आता त्यांना वेगळ्या प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. आदिवासींतील जमीनधारकांचे प्रमाण कमी होऊन भूमीहीन शेतमजुरांचे, ग्रामीण मजुरांचे प्रमाण वाढल्यामुळे ग्रामीण मजुरांचे नवे प्रश्न पुढे आले आहेत. सुशिक्षित आदिवासीतही बेकार युवकांचा प्रश्न सतावयाला लागला आहे.

ह्या समस्या वेगळ्या स्वरूपात परंतु शिल्लक आहेत ह्याचे एक आणि मुख्य कारण हे आहे की, बिगर आदिवासींचा आदिवासींकडे पहाण्याचा दृष्टीकोन अजूनही बदललेला नाही. आदिवासींचे होणारे शोषण नष्ट झालेले नाही. ह्या शोषणाचे स्वरूप बदलले आहे, हेच ह्या समस्या मागील कारण आहे. परंतु येथे ह्या अशा समस्यांवर विविचेन न करता केवळ सुशिक्षित आदिवासी युवकांसमोर उभ्या ठाकलेल्या समस्यांवर येथे विचार करावयाचा आहे.

आदिवासी युवकांसमोर उभ्या ठाकलेल्या ह्या समस्यांचे मुख्यतः दोन विभागात विभाजन करता येईल. ज्या समस्यांना प्रत्यक्ष शिक्षण घेताना तोंड द्यावे लागते अशा समस्या एक प्रकारात, आणि शिक्षण पुरे केल्यावर नोकरी मिळविण्यासाठी वा नोकरी टिकविण्यासाठी येणाऱ्या समस्या, ह्या दुसऱ्या प्रकारात येतील. आजच्या ह्या परिस्थितीत विद्यार्थी म्हणून येणाऱ्या अडचणी आदिवासी विद्यार्थ्यांनाही येतात, परंतु आदिवासी म्हणूनही आदिवासी विद्यार्थ्यांना काही खास अडचणींना तोंड द्यावे लागते ह्या ठिकाणी केवळ शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर पदवी शिक्षणात, पदव्योत्तर शिक्षणात पूर्ण केल्यावर बेकार असताना, व नोकरी काळात येणाऱ्या अडचणींचे विवेचन करण्यात येणार आहे.

## समस्या आणि उपाय :

( १ ) आज असे आढळते की, आपल्या आडनावांचा, आपल्या कुळाच्या नावांचा, आपल्या जातीच्या नावांचा आदिवासी जमातीच्या नावाशी असलेल्या नामसादृश्याचा गैरफायदा घेऊन अनेक बिगर आदिवासी युवक आदिवासी जमातींचे असल्याबाबत खोटी प्रमाणपत्रे घेऊन शैक्षणिक आणि नोकरीच्या क्षेत्रात आदिवासींना मिळत असलेल्या सवलतींचा लाभ घेत आहेत. ही बाब फार गंभीर आहे. आदिवासींच्या जमिनींवर होणारे अतिक्रमण ही जशी गंभीर समस्या आहे त्याचप्रमाणे आदिवासींच्या शैक्षणिक सवलतींवर होणारे हे बिगर आदिवासींचे अतिक्रमण ही सुद्धा गंभीर बाब आहे. अगोदरच विद्यापीठात आणि उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थात पदव्योत्तर विद्यार्थ्यांना मर्यादित जागा असतात, त्यात आदिवासींसाठी राखीव जागा ठराविकच. ह्या जागादेखील जर बिगर आदिवासी बळकावणार असतील तर कसेबसे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पुरे केलेल्या आदिवासी युवकांनी आपला विकास साधावा तरी कसा ?

गेल्या काही महिन्यांपासून शासनाचे आणि इतर आदिवासींचे कल्याण इच्छिणाऱ्या संस्थांचे लक्ष ह्या समस्येकडे

घेतले गेले आहे. शासनाने हा होणारा अन्याय थांबवण्यासाठी काही पावलेही घेतली आहेत. परंतु ह्या बाबतीत ज्या शासकिय अधिकाऱ्यांनी अशी खोटी प्रमाणपत्रे जाणून-बुजून दिली असतील त्यांना कडक शासन करणे अत्यंत आवश्यक आहे. खोटी प्रमाणपत्रे देणाऱ्या अधिकाऱ्यांचे हेतू तपासून त्यांना गुन्ह्यांबद्दल सजा देणे महत्त्वाचे आहे.

(२) सुशिक्षित आदिवासी पदवीधर युवकांना नोकऱ्या मिळाव्यात म्हणून आदिवासी विकास अधिकारी, आदिवासी विकास महामंडळ अधिकारी हे विशेष कळकळीने प्रयत्न करत असावेत असे दिसते. किंवा असे म्हणता येईल की त्या बाबतीत ते काही विशेष करूच शकत नाहीत. ह्यासाठी त्यांना विशेष अधिकार देण्यात यावेत असे वाटते. जिल्हा सेवन योजन कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांकडून राखीव जागांच्या बाबतीत मुलाखतींसाठी कॉल्स् पाठविण्यात जाणून-बुजून विलंब लावला जातो अशी नेहमीची तक्रार आहे. जिल्हा सेवायोजन कार्यालय राखीव जागा भरण्यासाठी योग्य वेळी आणि योग्य प्रकारे कॉल्स काढते या नाही हे तपासण्याचा अधिकार ह्या अधिकाऱ्यांना असला पाहिजे. खरे तर जिल्ह्यात शासकिय कार्यालये व इतर संस्थात जी राखीव पदे आहेत अशा पदांवर आदिवासी/दलीत उमेदवार ह्यांची योग्य प्रकारे नेमणूक होते या नाही हे जोपासण्यासाठी आदिवासी विकास आधिकारी व आदिवासी विकास महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना हे तपासण्याचा खास अधिकार दिला जावा, आणि त्याबाबतीत त्यांना जबाबदारही धरण्यात यावे.

ह्याशिवाय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेत जास्तीत जास्त आदिवासी युवकांनी उत्तीर्ण झाले पाहिजे म्हणून अशा उमेदवारांचे खास शिक्षण वर्गही आदिवासी विकास खात्यातर्फे घेतले जातात. परंतु दुर्दैवाने आतापर्यंत भरपूर पैसे खर्च करून चालवलेल्या अभ्यासवर्गात कोचिंग घेतलेल्या विद्यार्थ्यांनी काही खास प्रगती दाखवलेली नाही. परिणाम असा झालेला आहे की, हे कोचिंग क्लासेसच आता बंद करण्यात आले आहेत. वस्तूतः ह्या कोचिंग क्लासेसचा उपयोग का होत नाही ? आपल्या कोचिंग करण्याच्या पद्धतीतच काही उणिवा राहिलेल्या आहेत कां ? असे प्रश्न उपस्थित करून आत्म-परिक्षण करणे गरजेचे होते. ह्याविषयी वेगळा प्रयोग करून पाहण्याची गरज आहे. उदाहरणार्थ ज्या प्रकरणाचा अनुभव आहे, ज्या संस्थेकडे हे कोचिंग देण्यास योग्य असा शिक्षकवर्ग आहे अशा संस्थेकडून असे वर्ग चालविण्याचा प्रयोग करून पहायला काय हरकत आहे ?

(३) ह्या अभ्यासवर्गाचा अनुभव असा असला तरी, एक लक्षात घेतले पाहिजे की, प्रत्यक्ष लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परिक्षांना बसणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या सतत वाढत आहे. अशा स्पर्धा परीक्षांना बसणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जाही सुधारत आहे. असे असूनही असे दिसते की, अनेक राखीव जागा ह्या योग्य उमेदवार उपलब्ध नाहीत म्हणून एक तर रिकाम्या ठेवण्यात येतात किंवा बिगर आदिवासी उमेदवारास नेमणूक देऊन भरल्या जातात. ह्याचवेळी असेही अनुभवास येते की, लोकसेवा आयोगाकडून शिफारस झालेल्या आदिवासी उमेदवारांची संबंधित खात्याकडून दखलच घेतली जात नाही. एक तर शिफारस केल्या गेलेल्या उमेदवारांना नेमणूक करण्यात एवढा विलंब केला जातो की, घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे जे युवक जास्त काळ बेकार राहू शकत नाहीत असे आदिवासी युवक कुठल्या तरी दुय्यम दर्जाच्या नोकऱ्यांत लागून जातात. कित्येक वेळा खात्याकडून शिफारस झालेल्या उमेदवारांची नेमणूक करण्याचे टाळण्यासाठी ह्या शिफारसीकडेच दुर्लक्ष करण्यात येते.

ह्याबाबत दोन तीन गोष्टी होणे महत्त्वाचे आहे. एक तर विशिष्ट जागेसाठी ज्या उमेदवारांची शिफारस करण्यात येते, त्यातील एखाद्या उमेदवाराने ही नेमणूक अव्हेरली तर त्याच्या खालोखाल गुणवत्ता असलेल्या उमेदवारास ही नेमणूक दिली जावी.

ठराविक कालानंतर त्या काळात आयोगाने शिफारस केलेल्या आदिवासी उमेदवारांपैकी किती उमेदवारांना नियुक्ती पत्रे देण्यात आली आहेत हे पाहिले गेले पाहिजे.

(४) सहकारी संस्था, निमसरकारी संस्था, शासनाकडून वेगवेगळ्या सवलती घेणारे उद्योग ह्या सर्वांमध्ये राखीव जागा असायला पाहिजे ह्यात काही वाद नाही. पण जेथे आधीच राखीव जागा सवलतीच्या असूनही भरल्या जात नाहीत. त्या जागा भरल्या जाणे गरजेचे आहे. अशा जागा भरण्याबद्दल जे काही नियम आहेत त्यातील पळवाट बंद करून ह्या नियमाचे कडक पालन होऊन, राखीव जागा सर्वच्या सर्व भरल्या जाव्यात हे बघणे आवश्यक आहे.

(५) ज्यांना नोकऱ्या मिळाल्या आहेत अशा आदिवासी नोकरदारांच्या पदोन्नतीबाबतही अशी दिरंगाई व दुर्लक्ष अनुभवास येते. जे लायक नाहीत त्यांना पदोन्नती द्या असे कोण म्हणेल ? पण नियमात असेल तर, आणि लायक असेल तर आदिवासी नोकरदाराला उन्नती मिळाली पाहिजे. असे आढळते की जे आदिवासी नाहीत पण ज्यांच्याजवळ आदवासी असल्याची खोटी प्रमाणपत्रे

आहेत अशा बिगर आदिवासींना झपाट्यात उन्नती मिळते आणि खरा आदिवासी बाजूलाच राहतो.

ह्याबाबत प्रत्येक खात्याचा अखत्यार असलेला एक अधिकारी नेमणे आवश्यक आहे, हा अधिकारी ज्या व्यक्तीबद्दल शंका घेण्यास जागा आहे त्या व्यक्तीची चौकशी सुरू करेल. ह्यासाठी त्या व्यक्तीबद्दल तक्रार यायलाच हवी अशी अट नसावी.

थोडक्यात म्हणजे आज आदिवासींना विशेषतः सुशिक्षित आदिवासी युवकांना ज्या खास सवलती देण्यात येतात त्यांची अंमलबजावणी जास्तीत जास्त चांगली व्हावी असे प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. ह्यासाठी आदिवासी विकासासाठी जी कार्यालये व अधिकारी काम करत आहे त्यांना खास अधिकार देऊन जबाबदार धरले पाहिजे. अशा तऱ्हेचे खास प्रयत्न कल्याण योजनेच्या अंमलबजावणीसाठी झाले नाहींत तर आदिवासी विकास योजना हा केवळ प्रचाराचा आणि प्रसिद्धीचा मुद्दा आहे असे म्हणावे लागेल.

आदिवासींसाठी दिल्या जाणाऱ्या सोयी सवलती आदिवासींना मिळत आहेत वा नाहीत हे तपासण्यासाठी आवश्यक नियम शासनाने केले पाहिजे. पण मुख्य बाब तर ही आहे की, अशा योजना शासन योग्य प्रकारे राबवते वा नाही हे पाहण्याचे काम आदिवासी कार्यकर्त्यांनी केले पाहिजे. आदिवासी नेत्यांचे, आजी व माजी आदिवासी मंत्र्यांचे, आदिवासी कार्यकर्त्यांचे हे काम आहे, ही जबाबदारी आहे. आज आदिवासींमधून जी नवी पिढी तयार होत आहे तिचे काम आहे की, त्यांनी अशी जबाबदारीची पदे सांभाळून आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. त्यांचेच हे काम आहे की, आपल्या नेत्यांकडून त्यांनी ही कामे करून घेतली पाहिजे.

---

[ पान ११ वरून ]

घेणाऱ्या उच्चपदस्थ कार्यालयापासून तर प्रत्यक्ष आदिवासी विभागात काम करणाऱ्यांपर्यंत जी सुसूत्रता आणि लवचिकता असायला हवी तिचा अभाव होता. विविध प्रकारचे विकासकार्य चालविणाऱ्या व एकाच भागात काम करणाऱ्या प्रशासकीत घटकांमध्ये समन्वय नव्हता व आजही नाही. स्थानिक परिस्थिती आणि गरज पाहून एखादा महत्त्वाचा निर्णय घेण्याची अधिसत्ता त्या विभागातील, उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनाही देण्यात आली असेल तर संबंधित अधिकाऱ्यांनी ते अधिकार वापरण्याची हिंमत केली नाही. एखादे ध्येयधोरण मंत्रालयात ठरविण्यात आल्यावर कार्यान्वित करीत असताना स्थानिक परिस्थितिनिरूप ते निरूपयोगी किंवा हानिकारक वाटले तरी तसे कळविण्याची हिंमत न करता राबविण्यात आल्याचे होकारार्थी प्रतिवृत्त पाठविण्याची प्रवृत्तीच जास्त होती. त्यामुळे नियोजन करणाऱ्यांना अनुभवाश्रित प्रत्यावाहन ( feed-back ) कधीच होऊ शकले नाही.

वरील प्रशासकीय सद्गुण, विकासव्यवस्थेत यावेत यासाठी विकासव्यवस्थेत यथायोग्य प्रवृत्ती आणि पात्रता असलेल्या व्यक्तींची भरती ( Recruitment ) ही आवश्यक बाब आहे हे जरी शासनास ज्ञात असले तरी त्या दृष्टीने पाऊले उचलण्यात आली नाहीत. आरक्षी आणि आस्थापना या परंपरागत पद्धतीच्या कार्यांना ज्या आणि जशा व्यक्ती चालतात त्या आणि तशाच प्रकारच्या व्यक्ती विकासकार्यातही दडपण्याची चूक सतत होत आलेली आहे. वास्तविक अशा प्रकारच्या कार्याबद्दल जिव्हाळा, पूर्वानुभव, अभ्यास आणि पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना, प्रस्थापित नियमाचे जाळे बाजूला सारून, विशिष्ट काळासाठी करार करून या कार्यात घेणे आवश्यक होते. स्वयंसेवी संघटनांमधील,व्यक्तींनाही निश्चित काळासाठी घेता आले असते. खाजगी कंपनीच्या भरती पद्धतीमध्ये जी कल्पकता व आक्रमकता असते ती दुर्दैवाने शासकीय भरतीमध्ये येऊ शकली नाही. यापुढे एक पाऊल जाऊन असे म्हणता येईल की, ज्यांच्या विकासाचा हा कार्यक्रम चालविण्यात येतो त्यांच्यातील शिक्षित तरुणांना लहान मोठ्या पदांवर ठराविक काळासाठी घेण्याची योजनासुद्धा शासनाने स्वीकारावी आणि औपचारिक पदवी शिक्षणाची उणीव मधून मधून प्रशिक्षणाद्वारे भरून काढावी. यातून विकास, प्रशासन आणि आदिवासी ह्यांच्यात परस्पर विश्वास आणि सहसंवेदना ( Rapport ) निर्माण होण्यास मदत होईल.

विकासासाठी ज्याप्रमाणे आदिवासींनी आपल्या अंधश्रद्धा आणि जुनाट परंपरा यापासून दूर जाणे आवश्यक आहे, त्याप्रमाणेच विकास-कार्यक्रम राबविणाऱ्या प्रशासनानेही साम्राज्यशाहीतून वारसाने मिळालेल्या चाकोरीच्या बाहेर जाणे आवश्यक आहे ह्याची दखल घ्यावयास हवी.

[ महाराष्ट्र आदिवासी दर्शनवरून साभार ]
( १ मे १९८६ )

# अनुसूचित जमातींच्या हितरक्षणार्थ घटनात्मक तरतूदी

- अनुच्छेद १५ ( ४ ) मधील किंवा अनुच्छेद २९ चा खंड ( २ ) यातील कोणत्याही गोष्टींमुळे नागरिकांपैकी सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकरिता अथवा अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींकरिता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.
- अनुच्छेद १९ ( ५ ) नुसार भारतीय नागरिकाला भारताच्या कोणत्याही भागात मुक्त संचार करण्याचा, वास्तव्य करण्याचा आणि आणि स्थायिक होण्याचा आणि मालमत्ता संपादन करण्याचा, निर्धारण करण्याचा व विल्हेवाट लावण्याचा मूलभूत हक्क असला तरी कोणत्याही अनुसूचित जमातीच्या हितसंबंधांच्या रक्षणासाठी या हक्कांवर वाजवी निर्बंध घालणारे योग्य ते कायदे करण्याचा अधिकार राज्याला देण्यात आला आहे.
- अनुच्छेद २३ ( १ ) नुसार माणसांच्या अपव्यापार आणि वेठबिगारास प्रतिबंध करण्यात आला आहे. या उपबंधाचे कोणत्याही प्रकारे व्यतिक्रमण करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.
- अनुच्छेद २५ : सद्‌सद्‌विवेक बुद्धीचे स्वातंत्र्य, धर्मपालनाचे व धर्मप्रचाराचे मुक्त स्वातंत्र्य.
- अनुच्छेद २९ ( १ ) नुसार भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या कोणत्याही नागरिक गटाला आपली स्वतःची विभिन्न भाषा, लिपी वा संस्कृती जतन करण्याचा अधिकार असेल.
- अनुच्छेद २९ ( २ ) नुसार राज्याच्या खर्चाने चाललेल्या किंवा राज्याच्या पैशातून सहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेस कोणत्याही नागरिकास केवळ धर्म, वंश, जात, भाषा या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही.
- अनुच्छेद ४६ नुसार राज्य दुर्बलतर जनवर्ग आणि विशेषतः अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करील आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यापासून त्यांचे संरक्षण करील.
- अनुच्छेद १६४ ( १ ) नुसार बिहार, मध्य प्रदेश व ओरिसा या राज्यांमध्ये एका मंत्र्याकडे अनुसूचित जमातींच्या कल्याणकार्याचा प्रकार असेल व त्याशिवाय त्याच्याकडे अनुसूचित जमातींचे व मागासवर्गाचे कल्याणकार्य किंवा अन्य कोणतेही काम यांचा प्रकार असेल.
- अनुच्छेद २४४ ( १ ) – अनुसूचित क्षेत्रे व अनुसूचित जमाती यांचे प्रशासन व नियंत्रण याविषयी तरतूद.
- अनुच्छेद २७५ ( १ ) – एखाद्या राज्यातील अनुसूचित जमातींच्या कल्याण वृद्धीसाठी किंवा त्या राज्यातील अनुसूचित क्षेत्रांची प्रशासन पातळी त्या राज्याच्या उर्वरित क्षेत्रांच्या प्रशासन पातळीइतकी उंचावण्यासाठी ते राज्य भारत सरकारच्या मान्यतेने हाती घेईल अशा विकास योजनांचा खर्च भागविणे राज्याला शक्य व्हावे यासाठी आवश्यक आर्थिक तरतूदी.
- अनुच्छेद ३३० – लोकसभेत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याकरिता जागा राखून ठेवणे.
- अनुच्छेद ३३४ – राखीव जागा व विशेष प्रतिनिधित्व चाळीस वर्षांनंतर समाप्त होणे.
- अनुच्छेद ३३५ – सेवा व पदे यावर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे हक्क.
- अनुच्छेद ३३८ नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याकरिता एक विशेष अधिकारी असेल व तो राष्ट्रपतीने नियुक्त करावयाचा असेल.
- अनुच्छेद ३३९ – अनुसूचित क्षेत्रांचे प्रशासन व अनुसूचित जमातीसंबंधीचे कल्याणकार्य यावर संघराज्याचे नियंत्रण.
- अनुच्छेद ३४२ नुसार संविधानाच्या प्रयोजनार्थ अनुसूचित जमाती मानल्या जातील. त्या जमाती किंवा जमाती–समाज अथवा जमाती किंवा जमाती–समाज यांचे भाग किंवा त्यातील गट विनिर्दिष्ट करणे.
- अनुच्छेद ३७१ ( क ) – नागालॅण्ड राज्याबाबत विशेष तरतुदी.

( 'वेस्टलॅण्ड न्यूज' फेब्रु.–एप्रिल ८७ आणि आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या पुस्तिकेवरून साभार.)

# महादेव कोळी मुलांच्या कुपोषणाचे प्रमाण व कारणे :

**प्रा. वि. श्री. कुलकर्णी**
मानवशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ,
पुणे.

भारतामध्ये कुपोषणाचे प्रमाण कमी अधिक प्रमाणात शहरी, ग्रामीण तसेच आदिवासी भागामध्ये दिसून येते. अनेक भौतिक आणि सामाजिक शास्त्रांमध्ये कुपोषणाचा अभ्यास करून त्यामागची कारणे शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. मानवशास्त्रही त्याला अपवाद नाही. मानवशास्त्रात कुपोषणाचा अभ्यास करताना प्रामुख्याने दोन गोष्टींचा विचार केला जातो. एक म्हणजे ज्या जमातींचा कुपोषणाच्या संदर्भात अभ्यास करावयाचा आहे त्या जमातीमधील लोकांची होणारी सामाजिक वाढ आणि दुसरे म्हणजे त्या जमातींमध्ये असणाऱ्या सामाजिक रूढी परंपरा, श्रद्धा आणि आर्थिक कारणांचा तेथील लोकांच्या पोषणाशी असणारा संबंध. व्यक्तीची शारिरीक वाढ व ती ज्या समाजात रहात असते त्या समाजातील रूढी परंपरांचा घनिष्ठ संबंध असतो. प्रस्तुत लेखात महादेव कोळ्यांच्या मुलांमध्ये असलेल्या कुपोषणाचा अभ्यास मानवशास्त्रीय दृष्टीकोनातून करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ह्या हेतूने लेख दोन भागात विभागलेला आहे. पहिल्या भागात महादेव कोळ्यांच्या मुलांमध्ये कुपोषण आहे हे दाखवून दुसऱ्या भागात त्यामागची कारणे शोधण्याचा प्रयत्न आहे.

## महादेव कोळ्यांची मुले कुपोषित आहेत का ?

महाराष्ट्रात महादेव कोळी हे साधारणतः लोकसंख्येनुसार दुसऱ्या क्रमाकावर असलेले आदिवासी आहेत. सह्याद्रिच्या पूर्व–पश्चिम पसरलेल्या रांगांमध्ये यांचे बहुसंख्येने वास्तव आहे. प्रस्तुत अभ्यासामध्ये जुन्नर तालुक्यातील अंजनावळे, सोमतवाडी, देवळे व आजूबाजूच्या इतर गावातील महादेव कोळ्यांच्या मुलाचा समावेश केलेला आहे. एकूण ४७० मुलामुलींचा अभ्यासात समावेश असून हा अभ्यास १९८५ ते१९८७ या कालावधीत पूर्ण केला आहे.

## शास्त्रीय पद्धतीचा वापर :

मुलांमध्ये कुपोषणाचे प्रमाण किती आहे ? ती कुपोषित आहेत का ? इत्यादी गोष्टी ठरविण्यासाठी मानवशास्त्रातील मानवमिती ह्या तंत्राचा वापर केला. मानवमिती म्हणजे मनुष्याच्या शरीराची शास्त्रोक्त पद्धतीने घेतलेल्या मोजमापाचा अभ्यास. मानवमितीच्या आधारे शारीरिक लक्षणांचे स्वरूप ठरविले जाते. ह्या तंत्रामध्ये व्यक्तीची उंची व वजन तसेच तिच्या शरीरावरील इतर मोजमापे घेतली जातात व ही मोजमापे व्यक्तीच्या वयानुरूप आहेत किंवा नाही हे बघितले जाते. तसेच वरील मोजमापाची तुलना त्याच मोजमापांच्या राष्ट्रीय दर्जाबरोबर करून पोषण अगर कुपोषणाचे प्रमाण ठरविणे सोपे जाते. असे केल्याने व्यक्तीच्या शरीराची वाढ योग्य प्रमाणात होते किंवा नाही हे समजते. म्हणूनच महादेव कोळ्यांमधील मुलांच्या कुपोषणाचा अभ्यास करताना मानवमितीच्या तंत्रांचा वापर केलेला आहे. मानवमितीचा उपयोग करीत असताना पुढील उद्देश डोळ्यासमोर होते, (१) पोषणाशी निगडीत असणाऱ्या मानवमितीच्या साधनसामुग्रीची उपलब्धता प्राप्त करून घेणे की जी आत्तापर्यंत शक्य झालेली नव्हती. (२) मानवमितीचा उपयोग करून महादेव कोळ्यांच्या पोषणस्थितीचे मूल्यमापन करणे, (३) अशा प्रकारे केलेल्या मूल्यमापनाशी निगडीत असणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक कारणांचा विचार करणे.

मानवमितीचे यथायोग्य तंत्र वापरून या मुलामुलींची उंची व वजने मोजली. ही मुले वयवर्षे ५ ते १७ मधील असून ( cross–sectional ) या शरीरवाढीच्या अभ्यासपद्धतीनुसार त्यांची मोजमापे घेण्यात आली होती. मुलामुलींच्या वयासंबंधी निरनिराळ्या प्रकारे माहिती काढून ती निश्चित केली गेली..

## माहितीचे विश्लेषण व निष्कर्ष :

( १ ) सोमतवाडी, अंजनावळे, देवळे व जवळपासच्या इतर आश्रमशाळांमध्ये प्रत्यक्ष जाऊन पाहणी केल्यावर असे आढळून आले की त्या शाळांमध्ये मुलींचे प्रमाण कमी आहे. शाळांमध्ये असणाऱ्या एकूण मुलापैकी ३१४ मुले व १५३ मुली आहेत.

( २ ) मुलांच्या उंचीच्या वाढीमध्ये त्यांच्या वयानुसार फरक पडत जातो. तसेच मुलांच्या उंचीत होणाऱ्या वाढीत सातत्य नसते. म्हणजेच एका ठराविक

काळामध्ये ही वाढ खुंटते व नंतर पुन्हा सुरू होते. उदा. मुलांच्या ६ ते ७ व्या वयापासून उंची वाढताना दिसते. परंतु ८ ते ९ व १२ ते १३ व्या वयामध्ये त्यांच्या उंचीच्या वाढीत खंड पडतो. तर १३ ते १४ या वयात ही वाढ सर्वाधिक असते आणि १४ व्या वर्षानंतर वाढीचे प्रमाण जरी वाढत असले तरी ते १३ ते १४ वयातील वाढीच्या प्रमाणापेक्षा सर्वसाधारणतः कमीच असते.

मुलीच्या उंचीच्या वाढीमध्येही वयानुसार ते सातत्य आढळत नाही. वय वर्षे ८ ते ९ व १० ते १३ या दरम्यान उंचीची वाढ किंचित खंडित झालेली दिसते आणि १३ व्या वर्षानंतर वाढीचे प्रमाण अगदीच कमी झाल्याचे दिसून येते. हे सर्व जरी सर्वसाधारण वाढीच्या नियमानुसार असले तरी १४ व्या वर्षी वाढीच्या प्रमाणातील वाढ मात्र अकस्मित आहे.

( ३ ) उंचीप्रमाणेच मुलामुलींमध्ये वजनाचे प्रमाण सावकाश वाढत गेल्याचे दिसते. ही गोष्टही वाढीच्या नियमानुसारच घडत आहे. म्हणजेच विशेषतः ९ ते १४ व्या वर्षापर्यंतचा जो वयात येण्याचा काळ असतो त्यात ही गोष्ट घडताना प्रकर्षाने दिसते.

या तपासलेल्या किंमती I C M R ने काढलेल्या महाराष्ट्रातील मुलामुलींच्या संदर्भातील प्रमाणित किंमतीबरोबर पडताळून पाहिले असता असे लक्षात येते की मुलांच्या उंचीतील खुरटेपणा काही काही ठिकाणी प्रकर्षाने जाणवतो. मुलांमध्ये ७१.६% तर मुलींमध्ये ७३.२% कुपोषणाचे प्रमाण दिसून येते. याशिवाय ११.९३ % मुलांमध्ये व २५.३५% मुलींमध्ये अतिकुपोषित स्थिती दिसून येते. यालाच मॅरॅस्मिक स्थिती म्हणतात. अशा स्थितीत सर्वसाधारणपणे मनुष्यास रुग्णालयातील संपूर्ण विश्रांतीची जरुरी सांगितली गेली आहे. सुपोषित मुलांची टक्केवारी, अल्पांशानेच आहे. उदा. मुले ४.८ % व मुली ०.६५ — सुपोषित असल्याचे आढळते.

वरील माहितीवरून हे स्पष्ट होते की महादेव कोळयांच्या मुलांमध्ये कुपोषण आहे. आता प्रश्न असा उपस्थित होतो की असे कुपोषण होण्याची कारणे काय ? प्रत्यक्ष पाहणी करता असे दिसून आले की अनेक सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक कारणे ह्या कुपोषणाला जबाबदार आहेत. ह्या कारणांचा आपण सविस्तर विचार करू.

## कुपोषणाची सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक कारणे

कोणत्याही जमातीत एकदा कुपोषणाचे प्रमाण आहे हे सिद्ध झाल्यावर त्याची कारणे समजणे सोपे जाते. जमातीत कुपोषणाची कारणे अनेक असू शकतात. उदा. अनुवंशिकता सामाजिक रूढी, परंपरा, धार्मिक श्रद्धा, आर्थिक आणि पर्यावरण परिस्थिती इत्यादी. ह्या प्रत्येक कारणांचा पोषणाशी निगडीत संबंध असतो. व्यक्ती अनुवंशिक दृष्ट्या दुर्बल असेल किंवा अनुवंशिक रोगाने पिडीत असेल तर आर्थिक, सामाजिक परिस्थिती उत्तम असूनही व्यक्तीच्या शरीराचे पोषण होऊ शकत नाही. याउलट अनुवंशिक दृष्ट्या व्यक्ती निरोगी असूनसुद्धा केवळ आर्थिक आणि सामाजिक रूढी परंपरा, श्रद्धा ह्यांच्यामुळे व्यक्ती कुपोषित होते. उदा. काही आदिवासींमध्ये गाईगुरे विपुल असूनसुद्धा दुधाच्या रोजच्या आहारातील प्रमाण कमी आढळते. असे असण्याचे कारण म्हणजे वासरांनी गाईचे दूध पिऊन जे दूध शिल्लक रहाते त्याचाच केवळ वापर केला जातो. अशा तऱ्हेने व्यक्तीच्या कुपोषणाला अनेकविध कारणे असू शकतात. अर्थात ही कारणे एकाच वेळेस कारणीभूत असतील असे मात्र नाही तर काही ठिकाणी अनुवंशिक कारणांचे प्राबल्य असेल तर काही ठिकाणी सामाजिक व आर्थिक कारणांचे प्राबल्य असेल. थोडक्यात कुपोषणाचे प्रमाण ठरविण्यासाठी पुढील चार गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. ( १ ) जीवाणू, विषाणू व परोपजीवी कृमींचे शरीरावर होणारे परिणाम ( २ ) खाण्यापिण्याच्या सवयी व त्या अनुषंगाने येणाऱ्या सांस्कृतिक गोष्टींचा प्रभाव ( ३ ) धान्योत्पादन व त्याच्याशी निगडीत रूढी, प्रथा वगैरेंचा प्रभाव ( ४ ) आरोग्य व शिक्षण इत्यादी.

हिन्दु महादेव कोळयांच्या कुपोषणाच्या संदर्भात असे दिसते की अनुवंशिक कारणापेक्षा इतर सामाजिक, आर्थिक कारणेच त्यांच्यातील कुपोषणाला कारणीभूत आहेत ह्या कारणांचा सविस्तर आढावा आपण आता घेणार आहोत.

महादेव कोळयांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे दिवसभर शेतात काम करण्यासाठी खरे पहाता त्यांना योग्य आहार घेण्याची आवश्यकता आहे. परंतु ते जेव्हा सकाळी शेतात जातात तेव्हा कधी दूधाचा आणि दूध नसेल तर कोराच चहा घेऊन जातात. पुरुष व स्त्रिया दुपारी व रात्री असा दोनच वेळा आहार घेतात. मुले मात्र दोन, तीन वेळा जेवतात दूध असेल तर ते त्यांना दिले जाते. येथे एक गोष्ट महत्त्वाची आहे ती म्हणजे आहार देण्याच्या बाबतीत मुले–मुली ह्यांच्यात दूजाभाव नसला तरी त्यांना शिक्षण

देण्याच्याबाबतीत दुजाभाव जरुर केला जातो. मुली कितीही शिकल्यातरी त्यांना चूल व मूल हेच सांभाळावे लागते ह्या भावनेने मुलींना शाळेत कमी प्रमाणात पाठविले जाते.

त्यांचे मुख्य जेवण म्हणजे तांदूळ, नाचणी किंवा बाजरीची भाकरी आणि चटणी किंवा बेसन. बटाटे, कांदे, वांगी आणि इतर भाजीपाला इत्यादींचा वापर त्यांच्या जेवणात अधून-मधून असतो. मुग, उडीद, हरभरा डाळ इत्यादी कडधान्ये ते वापरतात. ताजा भाजीपाला न मिळाल्यामुळे आणि न परवडल्यामुळे भाकरी व बेसन ह्याचाच वापर त्यांच्या जेवणात जास्त असतो. ते बकऱ्याचे व ससयाचे मांस खातात. आर्थिक परिस्थितीनुसार ह्याचा वापर असतो. ह्याशिवाय पावसाळयाच्या दिवसात खेकडे व मासे ह्याचा वापरही ते आहारात करतात. अंड्याचा वापर क्वचित केला जातो. महादेव कोळ्यांमध्ये काही वारकरीही आहेत ते पूर्णपणे शाकाहारी आहेत.

आदिवासी ही अगदी साधी माणसे आहेत. त्यामुळे आधुनिक पद्धतीने ते स्वयंपाक करीत नाहीत. चटणी-भाकरी एवढेच जेवण त्यांना पुरेसे असते. ते त्यांचा स्वयंपाक चुल्ह्यावर करतात. स्वयंपाकासाठी अल्यूमिनियमची भांडी वापरतात. भाजीसाठी थोड्याशा तेलाचा वापर करतात. क्वचितच मसाल्याचा वापर करतात. सणासुदीच्या वेळेस मात्र ते पुरणपोळी आणि घावन करतात. सोमवार आणि उपवासाच्यादिवशी ते मटण खात नाहीत. चातुर्मासामध्ये मटण न खाणे बंधनकारक असते. मुलीच्या मासिकपाळी-मध्ये तिला दूध आणि ताक पिण्यास मनाई असते. उप-वासाला ते 'अनिव' नावाचे कंदमुळ खातात. लग्नसमारंभ प्रसंगी वरणभात, पुरणपोळी, बुंदी, जिलबी इत्यादी आर्थिक परिस्थितीनुसार करतात. घरात जर मृत्यू आला तर ते घरात अन्न शिजवत नाहीत. शेजारचे त्यांना अन्न आणून देतात. दहाव्याला गावातील लोकांना जेवण देतात,

ह्या लोकांच्यात दारूचेप्रमाण बरेच आहे. पूर्वी मोहाच्या फुलांपासून ते दारू बनवित असत. परंतु अलीकडे दारू बनविण्यासाठी ते हिरड्याचा वापर करतात. नंतर ते मिश्रण अल्युमिनियमच्या भांड्यात ठेवून त्या भांड्याला वरती कापड बांधून उकळतात. अशा तऱ्हेने दारू बनविली जाते. अनेक लोकांना दारू पिण्याचे व्यसन आहे. दारू पिणे हे त्यांच्या संस्कृतीचा जणू भागच बनून गेलेले आहे म्हणूनच कदाचित दारू पिण्यामुळे होणाऱ्या शारीरिक हानीकडे हे लोक कानाडोळा करतात.

जगण्यासाठी अन्नाची गरज असते आणि त्यासाठी त्याचा साठाही करावा लागतो. महादेव कोळी विविध प्रकारची धान्ये काढीत नसल्यामुळे त्यांच्याकडे साठा करण्याजोगे फक्त तांदूळ आणि साळीच असतात. त्याचा साठा ते कणगीत करतात. मीठ तिखट घालून ते कैरीचे लोणचेही बनवितात.

आर्थिक स्थिती उत्तम नसल्यामुळे डॉक्टरांनी सांगि-तल्याप्रमाणे ते आजाऱ्याला आहार देऊ शकत नाहीत. आजारांबद्दल त्यांना गांभिर्य वाटत नसल्यामुळे डॉक्टरने सांगितल्याप्रमाणे आहार घेण्याकडे त्यांचे दुर्लक्ष असते. त्याशिवाय भगतावर असलेला त्यांचा विश्वास. आज जरी शिक्षणामुळे त्यांच्यामध्ये अंधश्रद्धेचे प्रमाण कमी कमी होत असले तरी त्याचे प्रमाण फारच कमी आहे. घरात कोणीही आजारी पडले तर ते प्रथम भगताकडे जातात. भगत त्यांना अंगारा, तीर्थ वगैरे देतो. भगताकडे जाऊनही गुण आला नाही तरच ते डॉक्टरकडे जातात. अनेकदा असेही घडलेले सांगण्यात आले की रोगी मृत्यूच्या दारात असताना भगताची रोगावर मात्रा चालली नाही म्हणूनच केवळ डॉक्टरला बोलाविले पण अशा ऐन घटकेला जाऊन काहीच उपयोग नसतो आणि मग रोगी दगावतो. रोग आणि आजार ह्याबाबत ते अज्ञानी आहेत. आजारात ते रोग्याला भाकरी ऐवजी तांदुळाची पेज देतात.

जरी त्यांची आहार घेण्याची पद्धती साधी असली तरी ते घेत असलेल्या आहाराला समतोल आहार म्हणता येईल. कारण आपण जेव्हा ते घेत असलेल्या अन्नाची ( nutritional value ) पोषण मूल्य बघतो तेव्हा असे लक्षात येते की पुरेशा कॅलरीज असलेले अन्न ते घेतात. कारण भात, नाचणी, डाळ आणि कारळ्यांची चटणी यामुळे त्यांना Carbohydrate, Proteins आणि अगदी कमी प्रमाणात fat आणि oil मिळते. परंतु असे असूनही त्यांच्या मुलांमध्ये कुपोषणाचे प्रमाण आढळून येते. ह्याचे कारण म्हणजे त्यांच्यामध्ये असलेले काही रितीरिवाज. गरोदर स्त्रीला हलका आहार दिला जातो. तिच्या आहारा-कडे योग्य ते लक्ष दिले जात नाही. ह्याचा परिणाम बाल-काच्या वाढीवर होतो. प्रसुतीनंतर तिला केवळ भातच दिला जातो. बाळाची तब्येत चांगली असेल तरच तिला नाच-णीची भाकरी आणि वरण दिले जाते. Lactation Period मध्ये स्त्रीला खोबरे, दूध, तूप असल्यास दिले जाते. बाईला अंगावर दूध जास्त यावे म्हणून कातबोळ दिले जाते. ह्या कातबोळाचा परिणाम म्हणजे ह्या स्त्रियांचे दांत लवकर म्हणजेच लगेचच एक दोन वर्षात पडतात. तसेच बाळ जेव्हा आपल्या हाताने अन्न खायला लागेल तेव्हाच त्याला अन्न दिले जाते. तोपर्यंत तो दूधावरच

असतो. ह्याचाही परिणाम बालकाच्या वाढीवर होऊन ते दूर्बल बनते. सर्वसाधारणपणे एक ते दीडवर्षानंतरच ते आहार घ्यायला लागते. ह्या सुमारासही त्याला वेगळा खास असा आहार दिला जात नाही. तर घरातील इतर लोक जो आहार घेतात तोच त्याला दिला जातो. ह्यामुळेही कुपोषणाचे प्रमाण वाढते.

ह्याशिवाय स्वच्छता, सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था आणि शुद्ध पाणी ह्यांचा अभावही ह्या संदर्भात महत्त्वाचा आहे. येथे त्यांच्या घराची रचना महत्त्वाची आहे. त्यांची घरे बुटकी असून शेणाची बनविलेली असतात. घरात जवळ जवळ अंधारच असतो. घरात स्वच्छ सूर्यप्रकाश खेळण्यासाठी वावच नसतो त्यामुळे त्यांच्या घरात गुदमरल्यासारखे होते तसेच घरात जनावरांचा गोठा आणि स्वयंपाक करण्याची जागा जवळ जवळ असतात. त्यामुळे जनावरांचे मलमूत्र आणि त्याभोवती घोंगावणाऱ्या माश्या त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने हानीकारक ठरतात. ह्या व्यतिरिक्त त्यांना असलेल्या घाणेरड्या सवयी. ते बसल्याजागीच थुंकतात. ह्या त्यांच्या थुंकण्यामुळे रोगाचा प्रादूर्भाव होण्यास मदत होते. त्यांच्या लहानमुलांच्यात खरजेचे प्रमाणसुद्धा बऱ्यापैकी आहे. ह्याशिवाय महत्त्वाची गोष्ट म्हणजे शुद्ध पाण्याचा अभाव. तरी गांवातील डॉक्टर अनेक प्रकारची औषधे विहिरीच्या पाण्यात टाकून पाणी शुद्ध ठेवण्याचा प्रयत्न करतात.

भारतातील मुलांच्या परिस्थितीच्या संदर्भात युनिसेफने १९८४ च्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे अगदी लहानपणी आवश्यक ते अन्न न मिळणे हे कुपोषणाचे एक महत्त्वाचे कारण होय ! अंजनावळेच्या आजुबाजुची भौगोलिक व नैसर्गिक परिस्थिती व तेथील पिकणारे अपुरे धान्य व त्यांचे अर्थातच काहीसे अपुरे वितरण ही सुद्धा कुपोषणाची कारणे होऊ शकतात; पण पहिल्या कारणाइतकी मात्र ती महत्त्वाची वाटत नाहीत. ती पहिल्या कारणास पुरक मात्र जरूर ठरतात. महत्त्वाच्या पोषण द्रव्यांचा अभाव त्यांच्या आर्थिक परिस्थितीवरही प्रकाश टाकतो. आवश्यक ते धान्य प्रकार विकत घेण्यासारखीही परिस्थिती नसल्याने गप्प बसणेच भाग पडते व याचा हळूहळू परिणाम एकेका पिढीवर होऊ लागतो व परिणामी कुपोषणाचे प्रमाण वाढते.

महादेव कोळी आदिवासींच्या बरोबरच या ना त्या कारणाने आलेले बिगर आदिवासी लोकही ह्या भागात रहातात. हे बिगर आदिवासी लोक, आदिवासींच्या मानाने आपल्या मुलांच्या पोषणासंबंधी जरा जागृत दिसतात. परंतु त्यांच्या ह्या जागृतावस्थेचा परिणाम येथील मूळ आदिवासींवर मात्र अगदी थोड्या प्रमाणात झालेला दिसून येतो. महादेव कोळी जमातीमध्ये अलिकडे शिक्षितांचे प्रमाण वाढले आहे. परंतु त्यामुळे त्यांच्यात सुधारणेच्या दृष्टीने फारच कमी प्रमाणात बदल घडत आहेत. जरी शिक्षण घेतले, तरी हा माणूस जुन्या रूढी, समजुतींना अंधश्रद्धेपोटी अजून चिकटून आहे.

म्हणजे एकूणात पहायचे झाल्यास हा समाज तूर्ततरी संक्रमणावस्थेच्या अर्धवट मार्गावर आहे. अलीकडे एकात्मिक बाल विकास केंद्रे या भागात स्थापन झाली असली तरी प्रत्यक्ष परिणाम मात्र अजून सुमारे १० ते १२ वर्षांनंतरच दिसण्याची शक्यता आहे. म्हणून सध्या येथे जे कुपोषणाचे प्रमाण दिसते ते केवळ वर उल्लेखिलेल्या इतर गोष्टींचाच परिपाक होय. या संदर्भात त्यांच्या जेवणाच्या सवयी, मोसमानुसार आहारात असणारे वैविध्य, पूर्णाहारासंबंधीच्या त्यांच्या कल्पना, स्वयंपाक करण्याच्या त्यांच्या पद्धती, मांसाहाराचे प्रमाण व सिद्ध–निशिद्धत्वाच्या त्यांच्या कल्पना, गर्भवती स्त्रीचा आहार तसेच अंगावर पाजणाऱ्या स्त्रीचा आहार, मुलांचा आहार ह्या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात.

अशा तऱ्हेने महादेव कोळ्यांच्या मुलांमध्ये कुपोषणाचे जे प्रमाण दिसते ते म्हणजे त्यांच्यामध्ये असलेल्या सामाजिक रूढीपरंपरा व आर्थिक परिस्थिती ह्यांचा परिपाक होय.



# पावला पावलाने पुढे जाऊ !

लेः रा. वि. मुस्कुटे

१

जंगल जमिनीतील अतिक्रमणे रीतसर करून घेणे, आदिवासी कायद्याप्रमाणे आदिवासींना जमिनी परत मिळवून देणे, अल्पभूधारकांच्या हक्क नोंदींबाबतच्या तक्रारी दूर करणे, गांवठाण पाडून मागणे, आदिवासींच्या गावठाणाबाहेरील झोपड्यांच्या जागेवर त्यांचे हक्क प्रस्थापित करणे वगैरे व्यापक व मूलभूत प्रश्नांवर प्रामुख्याने 'श्रमिक मुक्ती संघटनेचे' काम चालते. पण वारसनोंद, खातेफोड, हक्कनोंदी बाबतच्या तक्रारी, रेशन कार्डे, झोपड्यांना घर क्रमांक मिळविणे, उत्पन्नाचे व जातीचे दाखले वगैरे सामान्य लोकांच्या दैनंदिन प्रश्नातही संघटनेला लक्ष घालावे लागले. संघटनेच्या कार्यकर्त्यांनी प्रश्न समजावून घेऊन अर्ज लिहून द्यायला सुरुवात केली. सामान्य व क्षुल्लक समजले जाणारे हे किरकोळ प्रश्न सामान्यांना फार महत्त्वाचे वाटतात. या प्रश्नांची सोडवणूक करून घेण्यासाठी दोन रुपयांपासून पन्नास रुपयांपर्यंत किंवा कोंबडी, बाटली देण्याची कुवत गरीबांमध्ये नसते. तेव्हा सामान्यांच्या सामान्य प्रश्नांमध्ये ठोस काही तरी केले पाहिजे अशी गरज निर्माण झाली.

## भूमिका तयार झाली

संघटनेमार्फत वारस नोंद, खातेफोड, पीक पाणी, प्रमाणित नकला मिळणे वगैरेंसाठी अर्ज देण्यात आले. पण त्याला उत्तरे मिळेनात. संघटनेकडे अर्जदार खेटे घालू लागले. कार्यकर्त्यांनी तलाठींकडे, तहसिलदारांकडे अर्जदारांसह खेटे घातले, तगादे लावले. आठवण पत्रे पाठवली-उपयोग झाला नाही. "भ्रष्टाचार करून काम करून घ्यायचे नाही" अशी शपथ संघटनेने सभासदांना दिली असल्याने काम करुन घेण्याचा हा राजमार्ग ( ! ) बंद होता. या प्रश्नावर संघटीत कृती करण्याचे ठरले. जानेवारी ८६ मध्ये रीतसर नोटिस देऊन तहसीलकार्यालयासमोर एक दिवसाचे धरणे धरण्यात आले. या धरण्याचा महसूल खात्यावर फारसा परिणाम झाला नाही. संघटनेचे काम चालूच राहिल्याने प्रलंबित अर्जांची संख्या वाढतच होती. उत्तरे मिळत नव्हती. या सामान्य प्रश्नासाठी प्रलंबित अर्जांच्या यादीसह रीतसर नोटिस देऊन एक दिवसाचे दुसरे धरणे ऑगस्ट महिन्यात तहसीलदार कार्यालयापुढे धरण्यात आले. या धरण्यांत २५०/३०० लोक होते. मागील अनुभव लक्षात घेऊन शिल्लक अर्जात निर्णय दिले नाहीत तर तीन महिन्यांनंतर बेमुदत धरणे धरण्यात येईल अशी जाहीर नोटीस देण्यात आली. परंतु ' ये रे माझ्या मागल्या ' हाच पुन्हा अनुभव आला. तीन महिने वाट पाहिली. निर्णय मिळाले नाहीत. तेव्हा–४४८ प्रलंबित प्रकरणांचा तपशील देऊन १५ डिसेंबर पासूनच्या बेमुदत धरण्याची नोटिस तहसीलदारांना १ डिसेंबरला देण्यात आली. या नोटिसीच्या टंकलिखित प्रती प्रांत, जिल्हाधिकारी, आयुक्त, सचिव, मंत्री वगैरे सर्वांना पाठविण्यात आल्या होत्या. या नोटिसीची दखल कोणी घेतली तर नाहीच पण कोणाकडून पोहोचही साधी आली नाही. १ ते १५ डिसेंबरपर्यंत कोणत्याही अधिकाऱ्याने साधी विचारपूसही केली नाही.

## बेमुदत धरण्याची तयारी झाली

संघटनेची मर्यादीत ताकद लक्षात घेऊन दोन विभाग करण्यात आले. कामाची वाटणी झाली. थंडी कडक असल्याने प्रत्येकाने घोंगडी व धकटीसाठी भारा आणावा अशा सूचना दिल्या होत्या. धरणे सुरू झाल्यावर सावलीसाठी तात्पुरता मंडप उभारण्याचे ठरले. धरण्यामध्ये जे लोक बसतील त्यांना पाड्यापाड्यांतून पाळीपाळीने घरटी पाच भाकऱ्या जमा करून पाठविण्याची जबाबदारी पाड्यातील सभासदांनी स्विकारली. दोन वेळचा चहा व भाकरीसाठी कालवण मुरबाडला करण्याचे ठरले. बेमुदत धरण्याला मुंबईतील प्रमुख मराठी दैनिकांतून प्रसिद्धी द्यायची व्यवस्थाही करण्यात आली होती. ठरविल्याप्रमाणे सर्व तयारी पार पाडण्यात आली. मात्र धरण्यात सामील झालेल्या लोकांजवळ घोंगड्याच नसल्याने, ८/१० जण सोडून कोणी घोंगड्या आणल्या नाहीत व एस्. टी. वर भारे न घेतल्याने धकटी पेटू शकली नाही. त्यामुळे धरणे धरणाऱ्यांचे कडक थंडीमुळे फारच हाल झाले. त्यांची जणू सत्वपरीक्षाच पाहिली गेली.

## पहिला दिवस मिरवणुकीने गाजला !

दिनांक १५ डिसेंबर रोजी १२ ला म्हसा रोडवरून मिरवणूक निघाली. सुरुवातीला ३०० लोक होते. उपविभागीय जंगल अधिकारी यांच्या कार्यालयावर मिरवणूक येऊन थडकली. चोरट्या जंगल तोडीला साथ देणाऱ्या

जंगल खात्याचा घोषणा देऊन व गाणी म्हणून धिक्कार करण्यात आला. आगाऊ नोटिस देऊनही उपविभागीय जंगल अधिकारी हजर नसल्याने व जंगल कुपातील चोरटी तोड करणाऱ्या मढच्या विजय बोंमेला पाठीशी घातला असल्याने त्याचा धिक्कार करण्यात आला. तेथून मिरवणूक मुरबाड गावात रस्त्यारस्त्याने फिरली व तहसील कार्यालयावर येऊन तेथे ठाण मांडण्यात आले. मिरवणूक संपली तेव्हा ५००/५५० लोक होते. त्यापैकी २२५ जण धरण्यात सामील झाले. त्यांना बिल्ले देण्यात आले. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, दारिद्र्य रेषेखालील यादीमधील आणि एकात्मिक ग्रामीण विकास योजनेतील भ्रष्टाचाराबद्दलचे निवेदन गटविकास अधिकाऱ्यांनी मोर्चापुढे येऊन स्विकारले. तहसीलदार श्री. वाळींबे यांनीही मोर्चापुढे येऊन प्रलंबित प्रकरणांच्या यादीसह संघटनेचे निवेदन स्विकारले.

## मुरबाडकरांचा भरघोस पाठिंबा मिळाला

" नाही पांघरायला घोंगडी, नाही शेकायला धकटी " तरीही थंडीच्या कडाक्यात २२५ आदिवासी रात्रभर चिकाटीने धरणे धरून बसलेले पाहून मुरबाडकर द्रवले. त्यांना कौतुक वाटले. धरणे धरणाऱ्यांच्या मागण्यांबद्दल जिज्ञासाही निर्माण झाली. धरण्याकरता मदत गोळा करण्यासाठी कार्यकर्ते गांवात फिरू लागले तेव्हा गावकऱ्यांनी त्यांना बोलावून घेऊन अहमहमिकेने मदत दिली. पैसे दिले. कांदे, बटाटे, भाजी, गूळ, तांदूळ, हळद, मसाला, साखर, काय मागितले ते सढळ हाताने दिले. १६ ला संध्याकाळी सहा वाजता इंदीरा कॉंग्रेसचे कार्यकर्ते डोंबिवलीचे विठ्ठलराव भुस्कुटे यांच्या अध्यक्षते खाली जाहीर सभा झाली. विजय साठे, इंदवी तुळपुळे, संघटनेचे सल्लागार रा. वि. भुस्कुटे, बारकू निरगुडा इत्यादींनी धरण्यासाठी बसलेल्यांच्या मागण्या काय आहेत, त्यांची काय भूमिका आहे हे समजावून दिले. या सभेमुळे गांवात चैतन्य निर्माण झाले व धरण्याला गावकऱ्यांचे पूर्ण सहानुभूती व प्रेम प्राप्त झाले.

## सत्याग्रहाची घोषणा

बेमुदत धरण्याची जाहीर नोटीस तीन महिन्यांपूर्वी ऑगस्ट महिन्यांत देऊनही मुरबाडच्या तहसीलदारांनी काही हालचाल केली नाही. ते मख्ख राहीले. एवढेच काय शिल्लक कामांचा तपशील देऊन १५ डिसेंबरपासून बेमुदत धरणे धरण्यात येईल अशी नोटीस १ डिसेंबरला देऊनही त्यांनी काही हालचाल केली नाही. गप्पगार राहीले. १५ डिसेंबरला धरणे सुरू झाले. लोक थंडीत कुडकुडत बसले. तरीही ते बधले नाहीत. त्यांची ही अमानुष बेपर्वाई पाहून बेमुदत धरण्याला गेंड्याच्या कातडीचे महसूलखाते दाद कदापीही देणार नाही असे सर्वांचे मत पडले. तेव्हा आणखी दोन दिवस संधी देऊन दि. १८ रोजी सत्याग्रह करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. खास प्रतिनिधी पाठवून या निर्णयाचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना पोहोचविण्यांत आले.

## २

वरीष्ठांकडून आदेश मिळाल्याने तहसीलदार कुंभकर्णी झोपेतून जागे झाले. संघटनेने ४४८ अर्जांची गांववार यादी प्राधान्य क्रम ठरवून करून द्यावी अशी त्यांनी लेखी मागणी केली आणि वाटाघाटीला बोलाविले. अर्जांचे निर्णय हातात न पडता निव्वळ आश्वासनांवर समाधान होणे शक्य नव्हते. अर्थातच वाटाघाटीतून काहीच निष्पन्न झाले नाही. पोलिस अधिकाऱ्यांकडून गर्भीत भाषेत दम देण्यात आला की, सत्याग्रह केलात तर याद राखा ! कचेरीत प्रवेश करून दिला जाणार नाही. सरकारी कामात अडथळा केलात, सरकारी मालमत्ता नष्ट केलीत, दरोडा घातलात म्हणून केसेस भरल्या जातील. या पोकळ दमाला भीक न घालता सत्याग्रहाचे डावपेच आखण्यात आले.

## सत्याग्रह कसा होणार ?

धरण्यांत बसलेला प्रत्येकजण आपल्या अर्जाचे काय झाले याची चौकशी करण्यासाठी कार्यालयांत जाईल, अर्जकामी निर्णय झाला असेल तर उत्तर घेऊन बाहेर पडेल. काम झाले नसले तर ते हातात पडेपर्यंत कचेरीतून हलणार नाही असे जाहीर करण्यात आले. कचेरीच्या कंपाऊंडमध्ये तसेच कचेरीत कोणी घोषणा द्यायच्या नाहीत. कोणीही सरकारी कर्मचाऱ्याला शिवीगाळ करणार नाही एवढेच नाहीतर त्यांच्यावर रागावणार देखील नाही. कचेरीतल्या टांचणीलाही कोणी हात लावायचा नाही अशा सक्त सूचना देण्यांत आल्या. दिलेल्या अर्जाचे काय झाले याची कचेरीत जाऊन चौकशी करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. हा कायदेशीर हक्क प्रत्येकाने बजावयाचा आहे. हा हक्क बजावताना पोलीसांनी अडवले तर तसेच पुढे जायचे परंतु त्यांनी अटक केली तर पकडून घ्यायचे. पकडल्यावर घोषणा द्यायच्या असे सर्वांना जाहीरपणे वारंवार सांगण्यात आले.

## सत्याग्रह नरम ... गरम !

सत्याग्रहींची पहिली मोठी तुकडी विजय साठे यांच्या नेतृत्त्वाखाली ११॥ ला कचेरीकडे निघाली. कचेरीच्या कंपाऊंडमध्ये शिरताच या तुकडीला अटक करण्यात

आली. बाहेरून आणि आतून घोषणा सुरू झाल्या. पोलिसांनी गाडीत घालून नेले. या दरम्यान एक एक करून मोहन राठोडच्या नेतृत्त्वाखालील वीस सत्याग्रही तहसील कार्यालयाच्या व्हरांड्यांत जाऊन बसले होते. ते सर्व तहसीलदारांच्या चेंबरमध्ये गेले. त्यांच्या अर्जांची चौकशी सुरू केली. तेव्हा तहसीलदार श्री. वाळिंबे यांनी पोलिस अधिकाऱ्याला बोलावून घेऊन त्यांना अटक करविली. तहसीलदारांच्या चेंबरमधून घोषणा सुरू झाल्या. एवढ्या कडक बंदोबस्तातही सत्याग्रही तहसीलदारांच्या चेंबरपर्यंत पोहचल्याचे पाहून पोलीस गोंधळले आणि भडकले.

## शूर आदिवासी महिला सत्याग्रहींनी कमाल केली.

दुपारी एकला इंदवी तुळपुळे व लतिका पाटील यांच्या नेतृत्त्वाखालील दोन महिलांच्या तुकड्यांनी कचेरीच्या कंपाऊंडमध्ये प्रवेश केला. इंदवीची तुकडी धिमेपणाने पुढे सरकत होती तर लतिकाची तुकडी पोलिसांच्या लाठ्यांचा अडथळा दूर करून त्यावरून उड्या टाकून तुफान वेगाने पुढे सरकत होती. पोलीस अधिकाऱ्यांचे माथे भडकले. त्यांनी लाठीमार करण्याचा हुकूम केला. पोलीसांनी स्त्रियांशी धक्काबुक्की केली. त्यांना लाठ्या मारल्या. महिलांच्या कडेवरची लहान मुले पडली. बहुतेक बायांच्या हातातील बांगड्या फुटल्या. एवढे झाले तरी नऊ जणी तहसीलदारांच्या चेंबरमध्ये घुसल्या. श्रीमती मेधा गाडगीळ, सहाय्यक जिल्ह्याधिकारी चेंबरमध्ये होत्या. त्यांच्या शेजारच्या भेटीला लोकांसाठी मांडलेल्या खुर्च्यांवर काही महिला बसल्या. काही खाली बसल्या. तहसीलदार श्री. वाळींबे यांनी त्यांची खुर्ची संघटनेच्या कार्यकर्त्या लतिका पाटील यांना बसायला दिली. आपल्या अर्जाचे काय झाले याची चौकशी महिला करीत असताना श्री. महाले, सर्कल पोलीस निरीक्षक रागाने फणफणत चेंबरमध्ये घुसले. त्यांनी लतिका पाटीलच्या काचकन् थोबाडीत मारली. लतिकाच्या डोळ्यापुढे काजवेच चमकले. लतिकाला बुकलले आणि बाहेर असलेल्या दोघा महिला पोलीसांना बोलावून घेऊन तिला चेंबरमधून झोडत झोडत बाहेर काढले. इतर महिलांनाही खुर्चीसकट उचलून चेंबरमधून बाहेर काढण्यात आले. तहसीलदारांच्या चेंबरमध्ये तहसीलदार व प्रांत ऑफीसर या दोन्ही दंडाधिकाऱ्यांसमोर, सर्व कर्मचाऱ्यांसमोर कामाची चौकशी करीत करीत असलेल्या संघटनेच्या महिला कार्यकर्तीला सी. पी. आय. नी नाहक थोबाडून व बुंकलून खास पोलीसी हिसका दाखविला. दंडाधिकारी नाहीत तर पोलीस श्रेष्ठ आहेत हे कृतिने दाखवून दिले. प्रजासत्ताक भारतातील कायद्याच्या राज्याची चुणूकही आदिवासींना दाखवून दिली. त्यानंतर रा. वि. भुस्कुटे यांच्या नेतृत्त्वाखालील तुकडीने सत्याग्रह केला. या तुकडीला धक्काबुक्की करून आरडा ओरडा करून अटक करण्यात आली. चंद्रकांत जाधव यांच्या नेतृत्त्वाखालील मोठ्या तुकडीने कचेरीच्या कंपाऊंडमध्ये ५ वाजता प्रवेश करून अटक करून घेतली. सत्याग्रह पाहण्यासाठी कचेरीपुढे मुरबाडकरांची नुसती झुंबड उडाली होती.

## पाड्या पाड्यांवरील संघटनेची भाकरी पुरुन उरली

शेकडो सत्याग्रहींना पकडले. पोलिसी अंदाजाप्रमाणे दोनशेच्या जेवणाची ऑर्डर पोलीसांनी दिली होती. सत्याग्रही पकडले ४५०. तेव्हा पोलीसांची पंचाईत झाली. दोनशेचा भत्ता सकाळपासून भुके राहीलेल्या शंभरांनाही पुरला नाही. परंतु पाड्या पाड्यांवरून कार्यकर्त्यांनी जमा केलेल्या भाकऱ्याच शेवटी उपयोगी पडल्या. त्या भाकऱ्या सर्वांना पुरल्या एवढेच नव्हे तर उरलेल्या भाकऱ्या सत्याग्रहाचा प्रसाद म्हणून लोकांनी वाटून घेऊन घरी नेल्या.

## उलट्या काळजाचे पोलिस खाते

पोलीसांच्या धक्काबुक्कीत आणि लाठीमारात जखमी झालेल्या महिलांना सरकारी दवाखान्यांत औषधोपचार मिळाला पाहीजे असा आग्रह सत्याग्रहींनी धरला. तेव्हा मेडीकल ऑफीसरकडे यादी देऊन या जखमी महीलांना पोलीसांबरोबर पाठवून बॅंडेज बांधून औषधोपचार करण्यात आला. पोलीसांनी नेमक्या याच चार महिलांना सरकारी कामात अडथळा केला या आरोपाखाली अटक केली. त्यांची जामिन देऊन सुटका करून घेण्यात आली. आदिवासींना मारहाण करून त्यांनाच पुन्हा आरोपी बनवून अटक करण्याच्या पोलीस खात्याच्या नेहमीच्या कसाब करणीचा प्रत्यय या लढ्यांतही आला. जामिनावर सुटका झाल्यावर या चारे जखमी महिला सत्याग्रहींनी पुरुष पोलिसांनी त्यांच्याशी धक्काबुक्की केली, त्यांना झोडले, त्यांच्या शालीनतेचा भंग केला. सार्वजनिक ठिकाणी त्यांची बेअब्रू केली म्हणून लेखी तक्रार दाखल केली. लतिका पाटीलने सी. पी. आय श्री. महाले यांचेविरुद्ध नांवानीशी फिर्याद दिली आहे.

**पावला पावलाने पुढे जाऊ !**
**आपले हक्क मिळवून घेऊ !**

सायंकाळी ६॥ ला पोलिसांनी सर्व सत्याग्रहींची सुटका

[ पान २९ पाहा ]

# "आदिवासी विद्यार्थी संघर्षांच्या उंबरठ्यावर !!!"

ॲड. विजय साठे



...विद्यावेतन मिळालेच पाहिजे...तुमच्या प्रतिष्ठेसाठी आम्हाला बळी देऊ नका... शैक्षणिक संस्थेत राजकारण; हाय हाय... विद्यार्थी कृती समिती झिंदाबाद... विद्यावेतनात अडथळा आणणाऱ्यांचा धिक्कार असो... चेकचा वटाव झालाच पाहिजे... बँक मॅनेजर तू करतोस काय, पुढाऱ्यांचे पाय चाटतोस काय ?... थांबणार नाय थांबणार, आमचा लढा थांबणार नाय...

शाळेच्या पहिल्याच दिवशी असंख्य आदिवासी विद्यार्थी व पालकांनी त्यांच्या न्याय्य मागणीसाठी आंदोलन छेडले होते. विद्यार्थी पालकांच्या घोषणा आसमंतात दुमदुमत होत्या. तो दिवस सोमवार धसईमधील बाजाराचा होता. त्यामुळे निदर्शकांना आणखीनच चेव चढला होता.

विद्यार्थी चिडलेले होते, त्यांचे पालक हवालदिल झाले होते. मुरबाड तालुक्यातील धसई येथील जनता विद्यालयातील ९५ आदिवासी विद्यार्थी-विद्यार्थिनींना मिळावयाचे रु. ४२,००० /– विद्यावेतन एक वर्षाचा कालावधी लोटूनही मिळाले नव्हते. चांगली वर्तणूक व ७५% उपस्थिती या दोन प्रमुख निकषांवर शासन आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतन देत असते. इयत्ता पाचवी ते सातवी मधील विद्यार्थ्यास द.म. रु. ४०/–व विद्यार्थिनीस द.म. रु. ५०/– व इयत्ता आठवी ते दहावी मधील विद्यार्थ्याला रु. ५०/– द. म. व विद्यार्थिनीला द. म. रु. ६०/– असे दहा महिन्यांच्या कालावधीसाठी हे विद्यावेतन मिळते. जी गावे आदिवासी उपयोजनेत येतात त्या गावातीलच आदिवासी विद्यार्थ्यांना हे विद्यावेतन मिळते. विद्यार्थ्यांची गळती कमी व्हावी, त्यांच्या काही अडीअडचणींचे निराकरण व्हावे हे विद्यावेतन देण्यामागचे काही प्रधान उद्देश.

पण या विद्यावेतनासाठी सोमवार दि. १५–६–८७ रोजी खासदार शांताराम घोलपांच्या धसई गावातील आदिवासी विद्यार्थ्यांना फार मोठे आंदोलन पुकारावे लागले हे केवढे दुर्दैव ? त्यांचाच धसईमधील आधारस्तंभ धसईचे गेली १५ वर्षे सरपंचाची धुरा सांभाळणारे व धसई येथील जनता विद्यालयावरील शालेय समितीचे माजी चेअरमन श्री. अनंत तुकाराम घोलप यांच्या घरावर विद्यार्थ्यांना निदर्शने करावी लागावी, ही चिंतेची बाब म्हणावी लागेल. पण १५ तारखेला त्यांच्यावर मोर्चा येणार हे आधी संघटनेने कळविल्यावर गावचा एक जबाबदार पुढारी, ज्या आदिवासींच्या जिवावर अनंत काळ राज्य केले त्या आदिवासींच्या रास्त मागण्यांना सामोरे जाण्याची ही त्यांनी हिंमत दाखवली नाही. पुण्याच्या कॉंग्रेसमेळाव्याचे निमित्त काढून त्यांनी त्या दिवशी अक्षरशः पळ काढला (आणि आधीच मी सध्या संस्थेचा चेअरमन नाही असे कळवून ते मोकळेही झाले होते)

विद्यमान छत्रपती शिक्षण संस्था कल्याण यांच्या धसई येथील जनता विद्यालयावरही विद्यार्थीकृती समितीने जोरदार निदर्शने केली. शिक्षण घेण्याच्या कोवळ्या वयात विद्यार्थ्यांना त्यांच्या न्याय्य मागणीसाठी आपल्या शाळेसमोर निदर्शने करायला लागणे, ही संस्थेच्या इतिहासातील पहिलीच नामुष्कीची वेळ असेल !

हे सर्व विद्यावेतन जिथे अडकून राहिले होते त्या ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. धसई शाखेवर शेवटी विद्यार्थिपालक ठिय्या मारून बसले व गेले वर्षभर अडकून पडलेल्या चेकचा वटाव जोपर्यंत बँक करीत नाही, तोपर्यंत बेमुदत बसण्याचा जाहीर इशारा देण्यात आला व धरणे कार्यक्रम सुरू झाला.

या प्रश्नाला धरून काही विद्यार्थी व पालक नोव्हेंबर ८६ मध्ये संघटनेकडे आले. त्या आधी त्यांनी शिक्षक, पुढारी, संस्था पदाधिकारी या सर्वांना अनेकवेळा विनवण्या, विनंत्या केल्या होत्या. असे पाच महिने केल्यावर ते थकले. संघटनेचे

अध्यक्ष श्री. गोमा उघडा (आदिवासी कार्यकर्ते) यांनी हा प्रश्न मिटिंगमधे घेतला. या प्रश्नाला धरून आणि विशेष करून शालेय क्षेत्रात शक्यतो आंदोलन नको असे संघटनेच्या मिटिंगमध्ये ठरले. त्यानुसार विद्यार्थी पालकांचे म्हणणे ऐकून शाळेच्या संस्थेला एक विनंतीपत्र पाठवण्यात आले व वर्तमानपत्रात प्रसिद्धीसाठी मजकूर पाठवला, तो पुण्याच्या दै. श्रमिक विचारने छापला ( १-१२-८६ ) त्यानंतर आम्ही जाणून बुजून स्वस्थ बसलो. म्हणजेच आम्हीहून त्यात लक्ष घालण्याचे टाळले.

पण अन्यायाला, सहनशीलतेला सीमा असते. विद्यावेतन मिळेल, अशी किती काळ वाट पहाणार ? मुले संघटनेच्या मागे परत लागली. तेव्हा संघटनेने परीक्षा होऊन जाऊ देत असा सबुरीचा सल्ला देऊन तो विषय पुढे ढकलण्याचा प्रयत्न केला. परीक्षा झाल्या, उन्हाळ्याची सुट्टी संपायला आली तरी आज मिळेल, उद्या मिळेल एवढीच भाषा कायम राहिली. परत मुले संघटनेकडे येऊ लागली. श्री. अनंत घोलपांच्याच बैठकीतले कॉंग्रेस ( आय ) चे स्थानिक आदिवासी पुढारी एक दिवस अचानक संघटनेच्या कार्यालयात येऊन धडकले व त्यांची या प्रश्नाबाबतची असमर्थता स्वच्छपणे सांगून संघटनेनेच या प्रश्नात आता विनाविलंब लक्ष घालावे अशी विनंती केली ( त्यांच्याही मुलाला इतरांप्रमाणे गेले वर्षभर विद्यावेतन मिळालेले नव्हते ! ) संस्थेच्या हितसंबंधी मंडळीनीही संघटनेला या प्रश्नात लक्ष घालण्याचा सल्ला दिला.

शालेय क्षेत्रात आंदोलन हे संघटनेला नैतिकदृष्ट्या पटत नसतानाही या प्रश्नाला हात घालावा लागला. एकीकडे संघटनेने शाळेचे मुख्याध्यापक, संस्थेचे सचिव, चेअरमन, गट विकास अधिकारी पं. स. मुरबाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे, शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ) ठाणे, चेअरमन अनंत तुकाराम घोलप, सचिव आदिवासी कल्याण मंत्रालय, मुंबई यांचेशी पत्रव्यवहार, वृत्तपत्रात बातम्या ( लोकसत्ता दि. ८-६-८७, दै. श्रमिक विचार ९-६-८७, मुंबई सकाळ १०-६-८७ ) मुरबाडच्या बाजारपेठेत जाहीर बोर्ड व दुसऱ्या बाजूला विद्यार्थी व पालक यांच्या सतत बैठका अशी दुहेरी जय्यत तयारी सुरू झाली. घोषणांनी धसईमधल्या भिंती रंगू लागल्या. वातावरण निर्मिती झपाट्याने होत राहिली. एवढ्या वेळपर्यंत याप्रश्नाचे राजकीय स्वरूप स्पष्ट झाले होते. कल्याणची संस्था भारतीय जनता पक्ष प्रणित तर धसईचे व्यवस्थापन कॉंग्रेस ( आय ) च्या विळख्यात. धसईचे सरपंच व माजी चेअरमनने म्हणे संस्थेला खूप छळले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणेच शालेय कारभार करवून घेणे हा त्यांचा खाक्या !

संस्थेला हे सहन न झाल्याने व शासकिय आदेशाचा आधार घेऊन एक दिवस सर्वसाधारण सभा घेऊन अनंत घोलपांना चेअरमनपदावरून उडवून टाकले. शाळेचे मुख्याध्यापक कृ. बा. घोलप हे पदसिद्ध सचिव, संस्थेचे सचिव भा. प. मराठे हे चेअरमन अशी शालेय समिती होऊन त्यांच्या सहीने आर्थिक व्यवहार होतील असे ठरवले तसा ठराव करून त्यांनी काही दिवसांनी तो ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक धसईला पाठवला

घोलप फारच चिडले. त्यांना ही गोष्ट कळल्यावर त्यांनी विद्यावेतनाच्या धनादेशावर आधी जी सही केली होती, त्यास हरकत घेतली. त्यावेळी बँकेचे चेअरमन त्यांचे जावई ( श्री. कोट ) होते. त्यामुळे संस्थेचा बहुमताने ठराव होऊनही त्यास धुडकावून लावून सासरेबुवांची हरकत ग्राह्य धरली. तो चेक परत पाठवला.

संस्थेच्या म्हणण्याप्रमाणे विद्यार्थ्यांना न्याय्य वेतन लवकर द्यायचे होते म्हणून त्यांनी परत घोलपांची भेट घेतली. घोलप म्हणाले, ' निदान या चेकपुरती तरी माझी सही राहू दे ' असे बँकेला कळवा म्हणजे चेक वटेल. ' ( असे बँकेनेही संस्थेला कळवले होते ! ) संस्थेने हा कायदेशीर सल्ला ( ? ) मान्य केला. त्यांनी परत ठराव केला व तो बँकेला पाठवला. ( घोडचूक करून ) बँकेला आयती संधी मिळाली. दोन विरोधी ठराव. चेक कसा वटणार ? त्यांनी प्रधान कार्यालयाकडे प्रकरण पाठवले व अगदी रितसर वेळकाढू धोरण सुरू झाले. संघटनेकडून सर्व संबंधितांना खरमरीत पत्रे गेल्यावर एकच धावपळ सुरू झाले. संस्थेचे ८-१० लोक संघटनेच्या कार्यालयात आले व त्यांनी त्यांची बाजू मांडली व परत एकदा चेक वटवण्यासाठी बँकेत टाकतो, असे सांगितले घोलपांनी कळवले की, मी चेअरमन नाही. बँकेने संस्थेकडून परत एकदा ठराव मागितला. चक्रे वेगाने फिरू लागली. पण पैसे काही शाळा सुरू व्हायच्या आत विद्यार्थ्यांच्या हातात पडले नाहीत. अखेर आंदोलनाचा दिवस उजाडून जोरदार निदर्शनांना सुरुवात झाली जवळ जवळ दोन तास बँकेसमोर ठिय्या मारून बसल्यावर अखेर बँकेने चेक वटवला.

विद्यावेतन ५½ % व्याजदरासकट देण्याचे मान्य करण्यात आले तेव्हा मुख्याध्यापकांना सामील करून संध्याकाळी एक मोठा विजयी मिरवणूक निघाली व त्याच दिवशी श्रमिक मुक्ती संघटनेचे अध्यक्ष श्री. गोमा उघडा

[ पान २९ पाहा ]

( पान ७ वरून )

१९४८ सालात या सोसायट्या सुरू झाल्या आणि आदिवासीत त्या अतिशय लोकप्रिय झाल्या. या सहकारी आंदोलनामुळे आदिवासींचे सुप्त गुण प्रकाशात आले. प्रचंड कामे सहकारी पद्धतीने व कार्यक्षमतेने पार पाडण्याची कुवत आदिवासी लोकांत आहे हे त्या चळवळीने जगास दाखवून दिले आहे. महाराष्ट्र व गुजरात राज्यात अशा सोसायट्यांची संख्या व काम वाढविण्याची पद्धतशीर योजना इतर राज्यांना जंगल ठेकेदाराची पद्धत बंद करून सहकारी पद्धतीने कार्य सुरू करण्याचा प्रयत्न झाला. उपयोजना क्षेत्रांत आदिवासी सहकारी संस्था उभारण्यात आल्या आहेत आदिवासींच्या दैनंदिन गरजा व शेतीच्या गरजा भागविल्या जाव्यात हा त्यामागील मुख्य उद्देश आहे, एकाधिकार धान्यखरेदी या संस्थामार्फतच केली जात आहे. ठेकेदाराची पद्धत भारतीय घटनेच्या ४६ व्या कलमाविरुद्ध आहे. आदिवासींना सहकारी पद्धतीने जंगल उद्योग सुरू केले तर त्यांच्या बेकारीच्या तीव्र प्रश्नांची सोडवणूक करता येईल. अमेरिका, स्वीडन इत्यादी प्रगत राष्ट्रांत जंगल-उद्योगाचे हजारो कारखाने गेली कित्येक वर्षे चालू आहेत. मात्र भारतात गेल्या १०० वर्षांत अशा प्रकारचे जेमतेम २५० कारखाने चालू आहेत. जंगल उद्योगाचे कारखाने यापुढे आपण मोठ्या प्रमाणावर सुरू केले पाहिजेत. भारतात जंगल विपूल असल्याने दूरवरच्या जंगलातच असे कारखाने सहकारी पद्धतीने सुरू करणे शक्य आहे. या कारखान्यात आदिवासींना काम मिळेल व शिवाय व्यवस्थापन आणि तांत्रिक काम प्रशिक्षण त्यांना मिळू शकेल. जंगल मालावरील प्राथमिक प्रक्रिया आदिवासी आपल्या खेड्यातच श्रमप्रधान मार्गांनी करू शकतील. नंतरच्या प्रक्रिया जंगलांतच असलेल्या सुसज्ज आधुनिक कारखान्यात होऊ शकतील. परंतु जंगल विभागापासून कारखाने दूर जात आहेत. त्यामुळे सध्याच्या बेकारीत भर पडत आहे. जंगल संपत्तीचा विकास व शास्त्रीय पद्धतीचा उपयोग याला कोणाचा विरोध असणार नाही. स्थानिक आदिवासींना प्रशिक्षण देऊन त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवावी. जंगलवाढ झाली पाहिजे. त्यांत स्थानिक आदिवासी सहभागी केल्याविना, जंगल वाढ कशी होणार ? त्याचाही विचार झाला पाहिजे.

आदिवासींचा एक चौथा वर्ग आहे. पोलादाचे कारखाने, विजेचे कारखाने, खाणी, धरणे वगैरे सुरू झाल्यामुळे ज्यांना स्थलांतर करावे लागले अशा आदिवासींचा हा वर्ग आहे. बिहार, ओरिसा, पश्चिम बंगाल व मध्यप्रदेश, महाराष्ट्र यांतील कांही आदिवासी विभागांत यांतील कारखाने आहेत. इतर राज्यांनीही जंगल विभागात लहान प्रमाणावर असे कारखाने सुरू केले आहेत. यामुळे किती आदिवासींना स्थलांतर करावे लागले, त्याचा अधिकृत आकडा मिळत नाही. परंतु माझ्या अंदाजाप्रमाणे तो आकडा सुमारे ५ लाखाचा असावा. औद्योगिकरणाचा आदीवासींवर काय परिणाम झाला याविषयी ढेबर कमिशनने आपल्या अहवालात एक प्रकरण लिहिले आहे. व्यक्ती, कुटुंब, समाज आणि परिस्थिती यांवर औद्योगिक विकासाचा परिणाम होतो असे कमिशनने म्हटले आहे. यातून मानसिक, सामाजिक व आर्थिक परिणाम होतात. औद्योगिकरणाच्या प्रश्नाचा या व्यापक संदर्भात अजून विचार केला गेला नाही आणि या विषयीचे संशोधन अगदी अपुरे आहे.

आदिवासींचे सक्तीने स्थलांतर हा सखोल महत्त्वाचा सामाजिक व नैतिक प्रश्न आहे. याची पुरेशी जाणीव संबंधितांना दिसत नाही. पिढ्यान् पिढ्यांची घरे आणि कामाची ठिकाणे सोडून आदिवासींना स्थलांतर करावे लागले. सरकारने जागा ताब्यात घेण्याच्या पद्धतीचा तपशील आदिवासींना माहीत नसल्याने, मिळाली तेवढी रोख भरपाई घेऊन त्यांनी घरेदारे सोडली. जवळपासच्या उद्योगनगरांतील अनेक आकर्षणामुळे त्यांच्या खिशातील पैसा संपण्यास वेळ लागला नाही. यामुळे लवकरच ते निष्कांचन व भूमिहीन बनले. कोणत्याही कुशल अगर अर्धकुशल कामाचा अनुभव किंवा प्रशिक्षण नसल्यामुळे ते सारे आदिवासी भूमिहीन मजूर बनले.

ढेबर कमिशनच्या सात शिफारसी पुढे सारांशाने दिल्या आहेत : ( १ ) वन्य विभागांत कारखाने सुरू झाल्याने, तसेच बाहेरील हितसंबंध तेथे आल्यामुळे आदिवासींवर काय परिणाम झाला ह्याचे शास्त्रीय संशोधन तातडीने झाले पाहिजे. ( २ ) औद्योगिक योजना आणि पुनर्वसन योजना एकत्रित केल्या पाहिजेत. स्थलांतर करावे लागलेल्या लोकांनाही औद्योगिक योजनांचा लाभ मिळाला पाहिजे. ( ३ ) पुनर्वसन योजनात स्थलांतरित व्यक्तींचे शिक्षण-प्रशिक्षण वगैरेंच्या कार्यक्रमाचाही समावेश केला पाहिजे. ( ४ ) स्थलांतरित आदिवासींसाठी त्या भागात एक वर्कशॉप किंवा उद्योग प्रशिक्षण केंद्र सुरू केले पाहिजे. ( ५ ) कारखान्यातील लोकांसाठी अन्नधान्ये, भाज्या, अंडी, मांस वगैरेंच्या निर्मितीसाठी स्थलांतरित आदिवासींना त्या भागांतून जमीन व इतर सवलती मिळाल्या पाहिजे.

( ६ ) पाणीपुरवठा, आरोग्याच्या सोयी, शाळा, दवाखाने वगैरेंनी युक्त अशा नव्या वसाहती सुरू कराव्यात. आपल्या नेहमीच्या नैसर्गिक वातावरणातच आपण आहोत असे त्यांना वाटले पाहिजे. ७) कारखान्यातील कायम नोकऱ्या मिळण्याबाबत स्थलांतरित आदिवासींना अग्रहक्क मिळाला पाहिजे.

काही प्रमुख विचारवंतांचे या महत्त्वाच्या प्रश्नाकडे लक्ष गेले आहे. त्यापैकी श्री. के. मल्होत्रा यांनी 'औद्योगीकरणाचा आदिवासींवरील परिणाम' हा विचारप्रवर्तक लेख लिहिला आहे. औद्योगीकरणाच्या परिणामांचे पृथ्थकरण त्यांनी पुढीलप्रमाणे केले आहे.

( १ ) तांत्रिक कार्यक्षमता आणि आकडेवारी यांच्या संदर्भात सर्व प्रश्नांचा विचार करणाऱ्या अर्थपंडितांकडून उद्योगाचे नियोजन केले जावे. ( २ ) आदिवासींमधील हितसंबंधी लोकांनी औद्योगीकरणाचा फायदा मिळवून गरीब आदिवासींची पिळवणूक करण्यास त्यांना साधन मिळते. ( ३ ) औद्योगीकरणामुळे परंपरागत सामाजिक संस्था नष्ट होऊन आदिवासींच्या सामुहिक जीवनास तडे जातात. ( ४ ) औद्योगीकरणामुळे जुनी मूल्ये नष्ट होऊन जी नवी मूल्ये उदयास येतात ती आदिवासीना मानवत नाहीत. ( ५ ) औद्योगीकरणामुळे उपभोग्य वस्तूंचा दर्जा कमी होऊन राहणीचा खर्च बेसुमार वाढतो. ( ६ ) जुन्या मूल्यांची मोडतोड व नव्या अर्थव्यवस्थेची सुरुवात यामुळे लोकांच्या सवयी व गरजा प्रमाणाबाहेर वाढतात पण त्यासाठी त्यांच्यापाशी पुरेसा पैसा नसतो.

आदिवासी समाजात नवा प्रवाह निर्माण होत आहे. आदिवासी दलितांना मिळणाऱ्या सवलतींचा हेवा अन्य जनांना का वाटावा? खरं म्हणजे तसा वाटायला नको. आदिवासी अद्याप अशिक्षित, अज्ञानी, असंघटित व अजागृत आहेत. त्याचा फायदा अपात्र सवलतदारांना होत आहे. अनेक खोटे, बनावट व मागासलेपणाचा बुरखा पांघरलेले लोक आदिवासींच्या सवलती प्राप्त करून खऱ्या आदिवासींना मागे ठेवत आहेत परिणामी खऱ्या आदिवासींना शिक्षण, नोकरी आणि धंदे यांत मागे राहावे लागत आहे. आदिवासींसाठी धडपडणाऱ्या कार्यकर्त्यांनां व हितचिंतकांना या प्रश्नाचे गांभीर्य अद्याप उमजलेले नाही. परंतु आदिवासी विकासातील ही धोंड हाच एक मोठा संघर्ष होण्याची भीती आहे. आता कुठे आदिवासी मुले शाळा-कॉलेजमध्ये जाऊ लागली आहेत व सवलतीला पात्र ठरत आहेत. परंतु या सवलती मिळण्याचे भाग्य त्यांच्या पदरात आहे की नाही हा यक्षप्रश्न आता काळच सोडविणार आहे.

वरील सर्व गोष्टींमुळे समाजात संघर्ष निर्माण होतात. पण हे संघर्ष अनंतकाळ टिकणारे नाहीत. कालांतराने ते संघर्ष नष्ट होतील. वीज उत्पादक कारखाने, खाणी, नोकऱ्या वगैरे उद्योगात फारच थोड्या आदिवासींना काम मिळू शकेल. बहुसंख्य आदिवासी शेती व जंगल यावरच अवलंबून राहातील. औद्योगिकरणामुळे आपल्या बेकारीचा प्रश्न सुटणार नाही. तो जास्त गंभीर होईल. महाराष्ट्रात साखर कारखाने व सूतगिरण्या यासारखे काही मोठे उद्योग सहकारी रीतीने चालू आहेत. इतर उद्योगही अशा रीतीने चालू करता येतील. जंगल विभागात जंगल उद्योग सहकारी रीतीने सुरू करणे शक्य आहे. त्यासाठी आदिवासींना योग्य ते प्रशिक्षण मिळाले पाहिजे. शिक्षण, शेती, सहकार, सहकारी जंगल उद्योगामुळे आदिवासींच्या बेकारीचा प्रश्न सुटल्यावर आदिवासींतील व इतरातील सामाजिक संघर्ष नष्ट होऊन आदिवासी या देशातील समाजाशी एकरूप होऊन जातील.

( 'साधना' आदिवासी जीवन विशेषांक–स्वातंत्र्यदिन, १९८५ व आदिवासी संशोधन पत्रिकेवरून साभार )



# बेदरकार वृक्ष तोड थांबवा

रा. वि. भुस्कुटे

पंतप्रधान राजीव गांधी यांनी दिल्ली येथे शक्तीवनांत पाच हजार विद्यार्थ्यांसह एक हजार झाडे लावण्याचा सोहळा दूरदर्शनवर नुकताच पहायला मिळाला. वृक्षारोपण समारंभांची या दिवसात नुसती झुंबड उडाली आहे. या दोन महिन्यांत कोणताही सार्वजनिक समारंभ वृक्षारोपणा" शिवाय संपन्न होत नाही. वातावरणाचे संतुलन बिघडू नये म्हणून सामाजिक वनीकरण नितांत आवश्यक आहे. त्यासाठी सर्व प्रचार माध्यमांचा उपयोग करून सामाजिक मन आणि वातावरण तयार करणेही. आवश्यक आहे.

**वृक्षतोड अव्याहत भरमसाठ चालू ठेवून साजरे होणारे वनमहोत्सव म्हणजे प्रचंड ढोंग आहे :**

परंतु वनीकरणाचे उद्दिष्ट प्रामाणिकपणे साध्य करायचे असेल तर व्यापारी नफ्यासाठी होणारी अपरीपक्व झाडांची बेकायदेशीर प्रचंड तोड थांबविलीच पाहिजे. या प्रचंड वृक्षतोडीकडे दुर्लक्ष करून ती थोपविण्यासाठी काहीही प्रयत्न न करता निव्वळ काही झाडे समारंभपूर्वक लावून वनमहोत्सव साजरा करणे ही स्वतःचीच घोर फसवणूक आहे. सामान्य जनांचे दृष्टीने हे निव्वळ नाटक आहे. स्पष्टच बोलायचे तर हे प्रचंड ढोंग आहे.

**अवैध वृक्षतोडीस साथ देणाऱ्या भ्रष्ट महसूल अधिकाऱ्यांना आवरा :**

ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे आणि कोल्हापूर या जिल्हांतील जंगलातून, खाजगी वनांतून फार मोठ्या प्रमाणावर नैसर्गिकपणे झाडे उगवत असतात; व वाढत असतात. माणसांनी लावलेल्या थोड्या झाडां-बरोबरच नैसर्गिकपणे वाढलेल्या अमाप झाडोऱ्याची तोड दर २/३, २/३ वर्षांनी सरपणासाठी किटा म्हणून आणि कोळसाभट्टीसाठी व्यापारी नफा कमवण्याकरता जंगल कंत्राटदार करत असतात. या होणाऱ्या प्रचंड तोडीची कल्पना येण्यासाठी एकच उदाहरण येथे देतो. मिळालेल्या माहितीनुसार एकट्या संगमेश्वर तालुक्यातून १९८५ साली अधिकृतपणे दोन लाख एकोणीस हजार पोती कोळसा व १२०० ट्रक जळाऊ किटा बाहेर पाठविण्यात आला. सॉ मिलमध्ये कापलेले लाकूड यात धरलेले नाही. मुंबई पुण्यातील ज्या कार्यकर्त्यांनी, संस्थांनी नैसर्गिक पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जंगले वाढविण्याचे कंकण बांधले त्यांनी रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्यातील खाजगी जमिनीतून गेल्या ५ वर्षांत किती वृक्षतोड झाली, किती किटा व कोळसा निर्यात झाला याचे संशोधन करावे संशोधनाचे निष्कर्ष प्रसिद्ध करावेत. गरीब बिचाऱ्या, पोटासाठी अतिक्रमण करून जंगल प्लॉट कसणाऱ्या आदिवासींना दिलेला हक्क मिळू नये म्हणून हायकोर्टात रीट अर्ज दाखल करणाऱ्या मुंबईच्या पर्यावरण रक्षकांनी, कोकणांत चाललेल्या बेकायदेशीर जंगलतोडीस साथ देणाऱ्या भ्रष्ट जंगल व महसूल अधिकाऱ्यांनी त्यांचे कर्तव्य बजावावे म्हणून रीट अर्ज दाखल केल्यास ते नक्कीच स्पृहणीय ठरेल.

**कायद्याने झाडे तोडण्यावर निर्बंध आहेत :**

महाराष्ट्र राज्यात झाडे तोडण्यावर जमीन महसूल संहिता ११६६ तसेच त्याखालील नियमांप्रमाणे निर्बंध लादण्यात आले आहेत. तसेच झाडांची अमर्याद तोड होऊ नये म्हणून खास महाराष्ट्र वृक्ष तोड (नियमन) कायदा १९६४ केला आहे. या कायद्यानुसार (१) हिरडा, (२) नेहडा, (३) मोह, (४) चिंच, (५) आंबा ६) फणस (७) खैर, (८) चंदन (९) बीज, १०) हल्दू, (११) तिवस, (१२) ऐन, (१३ किंजल १४) अंजन आणि (१५) जांभूळ या पंधरा जातीच्या झाडे तोडण्यावर निर्बंध घातले आहेत. नायब तहसीलदाराने दिलेल्या परवानगी-शिवाय झाडांची कोणासही तोड करता येत नाही.

**कायदा अंमलात येत नाही :**

सामाजिक वनीकरणाला दिवसानुदिवस जे महत्त्व प्राप्त होत आहे. त्या संदर्भात हे कायदे कितपत उपयोगी व परिणामकारक आहेत ? कोकणामध्ये गेले कित्येक वर्षे सातत्याने होत असलेली प्रचंड वृक्ष तोड पाहाता अस्तित्वात असलेले कायदे व नियम पुरेसे प्रभावी नाहीत. तसेच त्यांची अंमलबजावणी व्यवस्थित होत नाही असेच म्हणावे लागेल.

**तोडीवर निर्बंध असलेल्या झाडांची यादी अपुरी व कालबाह्य झाली आहे :**

बंदी असलेल्या झाडांची यादी जरी पाहिली तरी आपल्या लक्षात येते की महाराष्ट्रात सर्वत्र वाढणारी, अखाद्य तेल निर्माण करू शकतील अशी कडूलींब, करंज ही झाडे, बोर, बाभुळ ही झाडे, वनमहोत्सवात मोठ्या प्रमाणात लावली जाणारी निलगिरी, गुलमोहर, सुबाभुळ, आकेशीया, रेनट्री इत्यादी झाडांचा समावेश या यादीत नाही. तेव्हा या तोडण्यास बंदी असलेल्या झाडांची यादी फेरतपासणी होऊन त्यात इतर आवश्यक झाडांचा समावेश केला पाहिजे.

**वृक्षतोडीच परवानगी देण्याचे अधिकारी जिल्हाधिकारी आणि उपजिल्हाधिकारी यांनाच फक्त असावेत :**

या कायद्याप्रमाणे झाडे तोडण्याची परवानगी देण्याचा अधिकार महालकरी किंवा नायब तहसीलदार यांना दिला असला तरी कोकणातील तालुक्यात ही परवानगी देण्याचे काम तहसीलदारांच्या सहीनेच चालते. गेल्या ५ वर्षात दिलेल्या परवानग्यांचे नमुना परीक्षण जरी विभागीय कमिशनर, जिल्ह्याधिकारी किंवा उपजिल्ह्याधिकाऱ्यांनी केले तरी असे नक्की निष्पन्न होईल की दिलेल्या बऱ्याचशा परवानग्या नियमांचा भंग करून ठरवून दिलेली कार्यपद्धती न अवलंबता दिलेल्या आहेत. राजस्व अभियान सध्या चालू आहे. तेव्हा वरीष्ठ महसूल अधिकाऱ्यांनी या अभियानात हे राष्ट्रकार्य अवश्य केले पाहिजे. झाडे तोडायला परवानगी देणे हे या बदलत्या परिस्थितीमध्ये फार जबाबदारीचे काम आहे. तेव्हा हे अधिकारी जिल्ह्याधिकारी किंवा उपविभागीय अधिकारी यांच्या पुरतेच मर्यादित ठेवायला पाहिजेत.

**वृक्षतोडीस बेदरकारपणे परवानगी दिली जाते :**

रोगीष्ट, मृत किंवा वारेमोड झालेले झाड, सिल्व्हीकल्चरली पक्व किंवा कसवणुकीस अडथळा करणारे झाड या तीन प्रकारची झाडे तोडण्यास फक्त परवानगी द्यायची आहे. यापैकी पहिल्या प्रकारचे झाडांबाबत एक वेळ महसूल खात्याच्या अधिकाऱ्यांना खात्री करून निर्णय घेता येईल परंतु दुसऱ्या प्रकारच्या झाडांबाबत जंगल खात्यातील तज्ञ अधिकाऱ्यांचा अभिप्राय घेणे आवश्यक आहे. तर तिसऱ्या प्रकारच्या झाडांबाबत शेती खात्यातील तज्ञ अधिकाऱ्यांचा अभिप्राय घेणे आवश्यक ठरते. झाडे तोडण्यासाठी परवानगी देताना असा अभिप्राय घेतला गेला आहे का? परवानगी देऊन तोड झाल्यावर परवानगी प्रमाणेच तोड झाली आहे याची फेरतपासणी केली आहे का? हे तपासल्यास मनोरंजक बेकायदेशीर गोष्टी उघड्या वर येतील. वृक्ष संवर्धनासाठी या तरतुदींची काटेकोरपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

**पाणवठ्याच्या जागापासून ३० मीटर अंतरातील झाडे तोडता येत नाहीत :**

महाराष्ट्र वृक्ष तोड (नियमन) कायद्याच्या तरतुदी या आधी मंजूर केलेल्या नियमांना पूरक आहेत. तेव्हा पूर्वीचेही नियम लागू आहेत. पूर्वीच्या नियमांप्रमाणे परवानगी देताना तलाव, नदी, ओहोळ या पाणवठ्यांपासून ३० मीटर अंतरातील झाडे वगळायची आहेत. तसेच रस्त्याच्या कडेला लावलेली झाडे तोडता येत नाहीत. एवढेच नव्हे तर प्रत्येक एकरात कमीत कमी २० झाडे शिल्लक राहीलीच पाहिजेत. या तरतुदींचे भान वृक्ष तोडीच्या सर्रास परवानग्या देताना तहसीलदारांनी ठेवले असेल असे वाटत नाही.

**बेकायदेशीरपणे केलेल्या वृक्षतोडीस नेमलेली शिक्षा अपुरी आहे :**

परवानगी न घेता झाडांची तोड केल्यास त्याबद्दल या कायद्याचे कलम ३ प्रमाणे एक हजार रुपयापर्यंत दंड सांगितला आहे. साग, ऐन, खैर या लाकडांचे, सरपणाचे व कोळशाचे भरमसाट वाढलेले भाव विचारात घेतले तर हा दंड कःपदार्थ आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम ४८ प्रमाणे अनाधिकाराने कोणी खनिज काढल्यास खनिजाची बाजारभावाने होणाऱ्या किंमतीच्या तिप्पट रककमेपर्यंत दंड करता येतो. ही दंडाची रक्कम एक हजारापेक्षा कमी असेल तर एक हजार रुपये कमीत कमी दंड म्हणून वसूल करायचा आहे झाडे वाढवून निसर्गाचा समतोल राखण्याचे महत्त्व लक्षात घेता अनाधिकाराने तोडलेल्या झाडांच्या बाबतीत वरीलप्रमाणे दंड आकारणी करणे सर्वार्थाने योग्य ठरणार आहे.

**वृक्ष तोडीच्या गुन्ह्यांकडे महसूल, पोलीस व जंगल अधिकारी जाणून बुजून दुर्लक्ष करीत आहेत :**

बेकायदेशीरपणे तोड झाल्यास महसूल, जंगल आणि पोलिस अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई करायची आहे. महसूल खात्यातील अव्वल कारकून किंवा नायब तहसीलदार, रेंज फॉरेस्ट ऑफीसर आणि पोलिस निरिक्षक यांना

अनाधिकाराने झाडाची तोड झालेल्या जागेत प्रवेश करून तोडलेला माल जप्त करता येतो. त्याचप्रमाणे झाडे तोडण्यासाठी वापरलेली हत्यारे, वहातुकीसाठी वापरलेली जनावरे बैलगाड्या, ट्रक, बोट जप्त करायच्या आहेत. हे असे अधिकार आपल्याला आहेत याची जाणीवच नसल्याचे सोंग हे अधिकारी बेमालूमपणे वठवतात. खाजगी जागेतील अनाधिकाराने होत असलेल्या जंगल तोडीची जंगल व पोलिस खात्याला वर्दी दिली तर हे आमचे काम नाही म्हणून स्वस्थ बसल्याची उदाहरणे खूप आहेत. तेव्हा या अधिकाऱ्यांना त्यांना दिलेल्या या अधिकारांची जाणीव त्यांच्या वरीष्ठांनी तसेच जागृत युवक कार्यकर्त्यांनी वेगळ्या भाषेत देण्याची वेळ आली आहे.

**चोरट्या वृक्षतोडीची माहिती देणाऱ्यास बक्षिस दिले पाहिजे :**

जंगल खात्याच्या अखत्यारातील जंगल जमिनीतील चोरटी तोड पकडून देणाऱ्याला पकडलेल्या मालाच्या बाजारभावाने होणाऱ्या किंमतीच्या १/१० रक्कम बक्षिस म्हणून देण्याची योजना सध्या कार्यान्वित आहे. जंगल खात्याव्यतिरिक्तच्या सरकारी व खाजगी जागेतील चोरटी तोड पकडून देणाऱ्यांसाठी देखील अशी बक्षिस योजना लागू करण्याचा शासनाने विचार केला पाहिजे.

**तोडलेल्या प्रत्येक झाडाचे बदली एक नवे झाड लावले गेलेच पाहिजे :**

जेवढी झाडे तोडली तेवढी झाडे पुन्हा लावली गेलीच पाहिजेत. तेव्हा ज्या कोणाला झाडे तोडण्याची परवानगी देण्यात येईल त्यांनी जेवढी झाडे तोडली तेवढीच त्या जागेत अगर अन्यत्र लावली पाहिजेत अशी जबाबदारी कायद्याने ठरविली पाहिजे. झाडे तोडण्याचा परवाना देतानाच झाडे लावण्याचे हमीपत्र व रोख रक्कम डिपॉझिट करून घेतली पाहिजे. हमीपत्राप्रमाणे ठरवलेल्या मुदतीत झाडे लावली नाहीत तर डिपॉझिट रक्कम सरकारजमा करण्यात यावी. भूमिहीनाकडून तेवढी झाडे लावून या रक्कमेतून मजुरीचा खर्च भागवण्यात यावा. शर्तभंग करणाऱ्यास पुन्हा परवानगी देऊ नये. या कंत्राटदाराचे नाव काळ्या यादीत घालण्यात यावे आणि इतर शासकीय कंत्राट व सवलतीपासून वंचीत ठेवावे. तोडलेल्या प्रत्येक झाडामागे निदान एक झाड लावले गेले तरच साजऱ्या होणाऱ्या वनमहोत्सवाला काही अर्थ प्राप्त होणार आहे.

[ पान २२ वरून ]

केली. सौजन्य म्हणून पोलिसांनी त्यांच्या गाडीतून सुमारे तीनशे सत्याग्रहींना टोकवडे येथे पोहोचविले. अटक केलेल्या चार जखमी महिलांना संघटनेने जामिनावर सोडवून घेतले. एवढे होईपर्यंत जिल्ह्याधिकारी भास्कर पाटील यांनी तहसील कार्यालयात बोलावले असल्याचा निरोप मिळाला. सर्व मागण्यांवर चर्चा झाली. वारस नोंद, खातेफोड, नक्कल देणे, रेशन कार्ड देणे ही महसूल खात्याने कर्तव्य म्हणून करायची कामे आहेत. या त्याच्या कर्तव्यांत संघटना जर मदत देत असेल तर ती घेतली पाहिजे असेही त्यांनी तहसीलदारांना बजावले. संघटनेच्या यादीत दाखवलेल्या सर्व अर्जांत १५ जानेवारी ८७ पर्यंत निर्णय झाला पाहिजे अशी त्यांनी तहसीलदारांना ताकीद दिली. तोपर्यंत केलेल्या कामाचा दैनिक अहवाल पाठवण्याबद्दल त्यांना बजावले. जिल्ह्याधिकाऱ्यांनी स्वतः भेट देऊन, संघटनेच्या मागण्या रास्त आहेत व त्या १५ जानेवारीपर्यंत पुऱ्या करण्याचे आदेश तहसीलदारांना देऊन तीन दिवसांच्या धरणे कार्यक्रमाच्या आणि सत्याग्रहाच्या यशस्वितेवर जणू शिक्कामोर्तबच केले आहे.

[ पान २४ वरून ]

व मुख्य कार्यवाह श्री. किसन पारधी यांच्या हस्ते विद्यावेतन वाटण्यात आले.

भांडल्याशिवाय काही मिळत नाही. आंदोलनाशिवाय प्रश्न धसास लागत नाहीत हे जरी खरे असले तरी आजच्या व्यवस्थेत स्वतंत्र भारतात गरीब आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतनासाठी आंदोलन करावे लागते, संस्थेच्या पदाधिकारी व स्थानिक व्यवस्थापन यामधील गलिच्छ पक्षीय राजकारण, जबाबदार पुढाऱ्यांचे प्रश्न रेंगाळत ठेवण्यास खतपाणी, शासकिय अधिकाऱ्यांची अनास्था, लहान-लहान मुलांना भर पावसात भिजत निदर्शने करायला लावणे, बँके अधिकाऱ्यांचा लाळघोटेपणा, मुलांना चिखलात बसून रहावे लागणे या सर्व गोष्टी शरमेच्या आहेत. अर्थात शालेय विद्यार्थी यापुढे अन्याय सहन करणार नाहीत हे ठामपणे त्यांनी दाखवून दिले. ते बरे झाले. शेवटी मुलांनी दिलेली एक घोषणा कायम अस्वस्थ करील "कोण म्हणतो स्वराज्य आहे ?

हे तर चोरीचे राज्य आहे !

# मुरबाड-शहापूरमधील आदिवासी जागा होत आहे

बारकू निरगुडा

## आदिवासी आता खरोखर जंगलचा राजा राहिला आहे का ?

आदिवासीभाग तसेच जंगल व डोंगरदऱ्यांमध्ये रहात असलेल्या ठाकूर जमातीची ठाणे जिल्यातील शहापूर तालुक्यात बरीच वस्ती आहे. आदिवासींच्या वाड्या, गावे टेकड्यांवर, जंगलात का वसलेल्या आहेत ? असा प्रश्न सर्वांसमोर उभा रहातो.

आदिवासी हा जंगलचा राजा आहे असे म्हटले जाते. खऱ्या अर्थाने आदिवासी हा जंगलाचा राजा आहे का हा प्रश्नच आहे. जंगलचा राजा असतो कसा? कसा असायला पाहिजे ? जंगलावर त्याचे कोणते अधिकार असले पाहिजेत ? आदिवासी हा पूर्वीच्या काळापासून मूळचा रहिवासी म्हणून जंगलात प्रथमपासून रहाणारा, जंगलाची रखवाली करणारा ! म्हणूनच आदिवासी हा जंगलचा राजा मानला जातो. परंतु जंगलच्या राजासारखे शासनाने आदिवासींना अधिकार कां दिलेले नाहीत ?

खरे तर आदिवासीच्या नावावर मोठमोठाले कंत्राटदार जंगलचे राजे होऊन बसले आहेत, असे म्हणायला हरकत नाही. आदिवासी पूर्वीच्या काळात तर कंदमुळे, फळे यांच्यावर जीवन जगत असे. आदिवासी हा जंगलात रहात असला तरी शासन मात्र ( फॉरेस्ट खाते ) जंगलातील लाकूड तोडण्यास त्याला सक्त मनाई करीत आहे.

शहापूरच्या टाकीपठार भागात बऱ्याच प्रमाणात ठाकूरवाड्या आहेत. ह्या प्रत्येक वाड्यामध्ये ३५ ते ४० कुटुंबाच्या गटाने वाड्या तयार होऊन ठाकूर लोक राहिलेले आहेत. ह्या आदिवासी वाड्या-टेकड्यांवरतीच वसलेल्या आहेत. भात जमीन कमी प्रमाणात आहे. भूमिहीन शेतमजूर अत्यल्प भूधारकच मोठ्या प्रमाणावर आहेत.

## आदिवासींना सरकारी कर्मचारी व सावकार ह्यांचा जाच :

फॉरेस्ट खात्याचे कर्मचारी या आदिवासींना धमक्या देत असल्याने दारूच्या बाटल्या व कोंबड्या ह्या त्यांच्या हक्काच्याच होऊन गेल्या आहेत. आदिवासी अडाणी माणूस. काही माहीत नसतं. थोडी कोणी धमकी दिली की ह्या घ्या बाटल्या, ह्या घ्या कोंबड्या ! आदिवासी माणसाचे घाबरट अवस्थेत जीवन गेलेले असते. जमीनदार सावकार आला की या हो शेट, ग्रामसेवक आला की, या हो साहेब, गार्ड आला की, या हो साहेब.

आदिवासी अज्ञानी असल्यामुळे कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्याला साहेब म्हणून हात जोडून नमस्कार करतात. कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्याच्या, जमीनदार सावकारांच्या शब्दाला मान हालवून होकार देतात व त्यांचा मान राखतात. ठाकूर जमातीचे पूर्वापार असे वैशिष्ट्य जाणवते की, सहजासहजी तो खोटे बोलत नाही. जे खरे असेल तेच सांगून, माणुसकीने जगणारा तो भोळा भाबडा माणूस आहे.

परंतू ह्या माणुसकीचा फायदा मात्र सरकारी कर्मचारी व जातिवार सावकार चांगलेच घेत असतात. एखाद्या आदिवासीने एकात्मिक ग्रामीण विकास योजनेअंतर्गत ( I. R. D. P. ) फॉर्म ग्रामसेवकाकडे मागितला तर त्या फॉर्मचे त्या आदिवासीकडून पंचवीस रुपये घेतले जातात. आदिवासी अज्ञानी असल्यामुळे ( आय. आर. डी. पी. ) फॉर्म मोफत मिळतात हे त्यांना माहीत नसते.

उंबरवाडी ( ढाढरे ) गावात एक ग्रामसेवक आला होता त्याला आय. आर. डी. पी. च्या विचारले, काही आय. आर. डी. पी. फॉर्मची काही फी वगैरे असते का ? ग्रामसेवकाने उत्तर दिले की नाही ! ह्या फॉर्मची फी नसते. तो आम्ही मोफत देतो. ज्या ग्रामसेवकला फॉर्मविषयी असे विचारले होते त्याच ग्रामसेवकाने काही लोकांकडून फॉर्मचे पंचवीस पंचवीस रुपये वसूल केले होते. अज्ञानी आदिवासी माणसांस सरकारी कर्मचारी, मालदार, भांडवलदार, कंत्राटदार हे लुटण्यास टपलेले असतात. अशा लुटण्यामध्ये अज्ञानी आदिवासीची परिस्थती मात्र बिकट होऊ लागली आहे. एखाद्या भांडवलदार, जमीनदार सावकाराने आदिवासीना काहीही बोलले किंवा दोन-तीन थोबाडीत मारले तरी त्या सहन कराव्या लागतात. त्या थोबाडीत मारणाऱ्यांना साध्या शब्दाने प्रतिउत्तरसुद्धा देऊ शकत नाही. आदिवासी थोबाडीत मारण्याचा विचार करीत नाही, तो पुढच्या कर्ज मिळण्याचा विचार करीत असतो. आज आपण सावकारांस प्रतिउत्तराने बोललो तर उद्या आपणांस कर्ज मिळणार नाही असेच म्हणून जमीनदार सावकारांस देवमाणूस मानतात.

फॉरेस्ट खात्याच्या कर्मचाऱ्यांचा तर खूपच त्रास

असतो. जंगलातून घरासाठी लाकूड आणले की, फॉरेस्ट खात्याचे कर्मचारी घरात जाऊन ताबडतोब चौकशी करतात. घरामध्ये एखादे नवीन लाकूड दिसले की आदिवासींना धमक्या देऊन ' आणा दारूच्या बाटल्या, आणा कोंबड्या ' जणू काही तो त्यांचा हक्कच आहे कधी कधी शेतीच्या कामासाठी, (चुलीसाठी, धकटीसाठी) आणलेल्या लाकडासही मनाई करून धमक्या देतात. परंतु कंत्राटदार मात्र जंगलच्या जंगले उद्‌ध्वस्त करतात. त्यास धमक्या देत नाहीत. दिवसाढवळ्या डोळ्याने फॉरेस्ट खात्याच्या कर्मचाऱ्यासमोर ट्रक भरून जातात त्यावेळी त्यांना मात्र काही बोलू शकत नाहीत. आदिवासींने घरामध्ये वापरलेले लाकूड फॉरेस्टरांना बरोबर दिसते. परंतू जंगलातील लाकडाचे ट्रक दिवसा भरून जातात ते फॉरेस्टरांना दिसत नाहीत त्यावेळेस फॉरेस्टर डोळे मिटून घेतात की काय ?

आदिवासी हा जंगलात रहात असून देखील फॉरेस्ट खात्याचे कर्मचारी घरासाठी लाकूड आणायला सुद्धा सक्त मनाई करतात. नांगरासाठी आणलेले लाकूडही जप्त करून टाकतात. फॉरेस्टरांच्या दबावाने आदिवासींना मात्र लहान लहान झोपड्यांमध्ये रहावे लागते.

मोठमोठे भांडवलदार कंत्राटदार हे मात्र दुमजल्या इमारती बांधतात. त्यांच्या घरामध्ये कितीतरी टेबले, खुर्च्या, कपाटे इ. लाकडी सामान आढळते. कंत्राटदार, सावकार कोणत्या जंगलातून आणतात हे फॉरेस्टरांना विचारायची आज वेळ आली आहे.

## आदिवासी भागातील अन्याय्य समाजव्यवस्था :

आदिवासी भागात पूर्वापार पिढ्यान् पिढ्या दारूचे प्रमाण खूपच असायचे आदिवासींना ह्या दारूच्या बाटल्यावर बिगर आदिवासी सावकार त्यांच्याकडून वाटेल ते काम करून घेत. एखाद्या सावकारांचे काही काम असले की, दारूच्या एक-दोन बाटल्या कबूल करून एक-दोन दिवस मरमर राबून घ्यायचे !

आदिवासी हा या दारूच्या बाटलीमुळे गुलाम बनायचा. आदिवासीला दारूचे व्यसन लागण्याचे कारण म्हणजे बिगर आदिवासी सावकाराने या आदिवासींना दारूचे व्यसन लावले ते केवळ त्यांच्या दबावाखाली रहाण्यासाठी, गुलाम बनविण्यासाठी, वाटेल ते काम करून घेण्यासाठी. जणू काही आदिवासींना सावकाराने बैलासारखीच नाकामध्ये वेसण घातली आहे. बिगर आदिवासीने हे एक दारूच्या व्यसनाचे माध्यम वापरून त्यांना स्वतःच्या दबावाखाली ठेवायचे होते. त्याने काम व्यवस्थित केले नाही किंवा कामाला थोडा फार उशीर झाला तर त्याला अर्वाच्च शिव्या देऊन छळत असत. त्यांची नावेसुद्धा दुसऱ्यांची ठेवणे, वाईट शिव्याने हाक मारणे. समजा एखाद्याचे नाव असले सोमा की, त्याला हाक मारणार सोम्या. खरं तर आदिवासींचं नाव आदिवासीने बदललेला नाही, तर अशी नाव ठेवणारी मंडळी सावकार, भांडवलदार मोठमोठे कंत्राटदार या मोठमोठ्या मंडळींनीही एक आदिवासीमध्ये, आदिवासी भागात समाजव्यवस्था निर्माण केली आहे. आदिवासींना या उद्धट शब्दांनी हाक मारून त्यांना त्यांच्या दबावाखाली ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. आदिवासीला दारूचे व्यसन लावून त्यांनाच सावकार काम सांगतो. तर आदिवासी दारूड्या ! **लंगोट्या** आदिवासी कधी सुधारणा नाही, आदिवासी हे लबाड अशा कितीतरी शब्दाने आदिवासींना वाईट शिव्याने नाव ठेवतात.

मोठमोठे सावकार, कंत्राटदारच आदिवासींना अशा वाईट शब्दाने छळत नाही तर पोलीस स्टेशनचे पोलीस सुद्धा आदिवासींना वाईट, उद्धट शब्दाने हाक मारतात. ह्याचे उदाहरण द्यायचे झाले तर असे की मी एकदा पोलिस स्टेशनला एका आदिवासी बाईला मारहाण झाल्याची तक्रार नोंदवायला गेलो होतो. पोलिस स्टेशनला जाण्याची माझी पहिलीच वेळ होती, प्रथम तक्रार नोंदवणाऱ्या हवालदारास विचारले की या बाईचे जाब जबाब घेऊन तिची काय तक्रार आहे ती नोंदवा. असे मी घाबरत हवालदारांस सांगितले. तेवढ्यात हवालदार माझ्यावर जोरात ओरडून म्हणाले की, तुम्ही आदिवासी लंगोटे खोट्या-नाट्या तक्रारी नोंदवायला येतात. तुमची तक्रार मी नोंदवणार नाही, अन् तू मध्येच बोलणारा म्होरक्या कोण ! मला बऱ्याच वाईट शब्दाने त्या ठिकाणी हवालदाराने छळले. आतमध्ये टाकण्याच्याही धमक्या दिल्या. मी मात्र घाबरून हळू आवाजात म्हणालो तुम्हाला ह्या बाईची तक्रार नोंदवायची आहे की नाही ? नाहीतर या बाईला पुढे तक्रार करण्यास पाठवतो. एव्हढे सांगताच त्याने मला धमक्या दिल्या. माझी पोलिस स्टेशनला जाण्याची पहिलीच वेळ असल्यामुळे मी त्याला काहीच प्रतिउत्तर देऊ शकलो नाही. मनांतल्या मनांत मला राग येऊन मी संतापलो होता. परंतु माझी बोलण्याची हिंमत होत नव्हती. नंतर ह्या बाईची तक्रार नोंदवण्यासाठी बाहेरून एक अर्ज लिहून आणला, तो अर्ज पोलिस स्टेशनला दिला व डुप्लीकेट प्रतिवर सही घेऊन तसेच आम्ही घरी निघालो.

मी घरी आलो तरी माझ्या डोक्यातील विचाराने थैमान

घातले होते की आतापर्यंत मी कोणाचे शब्द ऐकले नाही आणि असे वाईट शब्दाने मात्र मला चांगलाच धक्का बसला. एक आठवडाभर माझ्या मनात ह्या संदर्भात सारखेच विचार येत रहायचे परंतु मला त्यावेळी हे समजले नाही की, आदिवासी भागात निर्माण झालेल्या अन्याय्य समाजव्यवस्थेचा हा परिणाम आहे.

**संघटनेचे महत्त्व पटू लागले :**

मुरबाड तालुक्यात श्रमिक मुक्ति संघटना नुकतीच स्थापना होऊन आदिवासी भागात आदिवासींचे प्रश्न त्यांच्याकडून सोडवले जात होते. संघटनेचे कार्यकर्ते ॲड. विजय साठे, श्रीमती इंदवी तुळपुळे यांची फक्त नावे ऐकून होतो परंतु त्यांना प्रत्यक्ष बघितले नव्हते ! आदिवासी वाड्यामध्ये युवक शिबीर घेत असत. युवकांना तयार करण्यासाठी ते एक-दीड महिन्यांनी शिबीर घेऊन ते वेगवेगळया विषयासंबंधी जागृती घडवून आणायचे ! एक दिवस संघटनेच्या कार्यालयात मुरबाडला जावून युवक शिबीर मध्ये नाव दिले त्यानंतर शिबीर सुरू झाले. शिबीरामध्ये माझा पहिलाच प्रवेश असल्यामुळे मला फारच कंटाळा येऊन जायचा. जे काही जागृती घडवून येण्यासाठी विषयांवर चर्चा व्हायची ती समाधानकारक समजत नव्हती. शिबीरामध्ये सामाजिक विषय समजत नसल्यामुळे खूपच कंटाळा येऊन घरी जावे की काय असाच मनात विचार येत असे.

शिबीर संपल्यानंतर घरी गेलो. घरी जावून शिकवलेल्या काही विषयांची जाणीव होऊन विचार यायला लागले की खरोखरच आदिवासी भागात खुपच भ्रष्टाचार, अत्याचार, अन्याय आहे. यासाठी काहीतरी युवकांमध्ये जागृती घडवून आणण्यासाठी संघटनेतर्फे युवक शिबीर घेतली जात असतील.

संघटनेच्या दुसऱ्या शिबीरालाही मी हजर झालो. एकमेकांमध्ये वेगवेगळया विषयांची चर्चा सुरु झाली शिबीरामध्ये वेगवेगळे खेळ घ्यायचे त्या खेळानुसार नंतर चर्चा व्हायची. गाण्याचे कार्यक्रम व्हायचे. त्यामुळे शिबीरामध्ये चांगलाच रस येत चालला. चार-पाच युवक शिबीरांमध्ये मी आदिवासींचे काही प्रश्न समजून घेऊ लागलो. संघटनेच्या मिटिंगमध्ये, मोर्चामध्ये मला चांगलाच रस असायचा. माझे घाबरट मन थोडेसे धाडशी होवून काही प्रश्नांबाबत चर्चा करायला लागले. तसेच जनजागृतीची काही छोटी छोटी गाणी स्वतःच रचून लिहायला लागलो. ह्या संघटनेच्या मोर्चे-शिबीर, यामुळे आदिवासी माणूस मात्र जागा होत होता. मुरबाड पोलीस स्टेशन समोर मोर्चा जायचा तेव्हा मात्र पोलीसांवर, इन्स्पेक्टरसमोर मी जोरजोरात घोषणा द्यायचो. मला त्या पोलीसांने दिलेल्या शिव्यांची आठवण होवून संतापाने मी पोलिस, हवालदार **फौजदार तू मालक नाय नोकर हाय !** ह्या घोषणातून माझी चीड व्यक्त करीत होती. मला त्यावेळेस असे वाटावयाचे की आता मला पोलीस वाईट शिव्याने बोलले तर मी त्यांना न घाबरता काही तरी प्रतिकार करू शकेल. अशी मला ठाम खात्री आली होती. आदिवासी माणूस आता जागा होऊन ह्या अन्याय्य **समाज व्यवस्थेला** झुगारून देण्याचा प्रयत्न करीत आहे. कोणी वाईट शब्दाने शिव्या दिल्या तर तो न घाबरता त्याला प्रतिउत्तर देवू शकतो अशी आदिवासी माणसांमध्ये ठाम खात्री झाली आहे. आदिवासी जाणीव जागृती केंद्र पुणे या संस्थेतर्फे व श्रमिक मुक्ती संघटनेच्या सहकार्याने मी व श्री. देवराम दरवडा या कार्यकर्त्यांनी टाकीपठार भागातील आदिवासींमध्ये जाणीव जागृतीचे काम सुरू केले आहे. शहापूर तालुक्यातील टाकीपठार भागातील आदिवासीमध्ये आता जागृती होत आहे. त्यांचे घाबरट मन धाडसी बनत चालले आहे. अन्यायाला वाचा फोडण्याचा विचार करीत आहे. पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाबाबत शहापूरच्या काही आदिवासी पाड्यामध्ये प्रत्यक्ष फिरून पाहणी केली. पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाबाबत लोकांचे खूपच हाल चाललेले होते. उंच उंच टेकड्यांवर चढ उतार करून नदीवरून पाणी आणावे लागत असे. पाण्याच्या बैलगाड्या काही आदिवासी पाड्यांमध्ये लावल्या नव्हत्या. काही आदिवासी पाड्यांमध्ये पाण्याच्या बैलगाड्या लावून दहा दिवसांनी ग्रामसेवकांनी मधेच बंद केल्या होत्या.

**पाण्याचा प्रश्न धसास लावला**

ही सगळी पाण्याच्या प्रश्नांबाबत वस्तुस्थिती बघून काही तरी प्रयत्न करायला पाहिजेत असे ठरवले. पाण्याच्या प्रश्नांबाबत शहापूर तहसिलदार कार्यालयावर व गटविकास अधिकारी कार्यालयावर मोर्चा ३ जून १९८७ रोजी तारीख निश्चित केली.

पाणी टंचाई वाड्यांमध्ये ( आदिवासी ) भागात प्रचार केला. ३ जून १९८७ रोजी तहसिलदार कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. मोर्चामधील बाया-पुरुष सुरुवातीला शहापूरच्या बसस्टॉपच्या बाजूला एकत्र बसून मोर्चाच्या नियमांची चर्चा केली. तसेच घोषणांची प्रॅक्टीस चालली होती. प्रथम शहापूरच्या गल्लोगल्लीला फिरून पाण्याच्या प्रश्नांबाबत जोर-जोरात घोषणा घेतल्या. नंतर थेट तहसिलदार कार्यालयासमोर मोर्चा जाऊन ठेपला. तहसिलदार कार्यालयासमोरही जोरजोरात पाण्याच्या प्रश्नांबाबत घोषणा दिल्या. नंतर मोर्चातले बाया-पुरुष एका

जागेवर एकत्र बसले. सुरुवातीला जन जागृतीच्या व पाण्याच्या प्रश्नाबाबतच्या जागृतीचा कार्यक्रम घेतला. नंतर मोर्चासमोर तहसिलदार निवेदन घेण्यास आले. पिण्याच्या पाण्याची परिस्थिती एकंदरीत आदिवासी बायांनी तहसिल-दारासमोर धडकावून सांगितली. लोकांची अशी मागणी होती की, सहा महिन्यांमध्ये कोणत्याही परिस्थितीत काय-मच्या पाण्याची सोय शासनाने केली पाहिजे. जर सहा महिन्यामध्ये पाण्याची कायमची सोय झाली नाही तर धरणं धरून सत्याग्रह करावा लागेल असेही आदिवासी बायांनी तहसिलदारांना सुनावले. तहसिलदाराने सांगितले, 'तात्पुरता पाण्याचा प्रश्न आम्ही उद्यापासून सोडवतो' असे बोलून ते कार्यालयात निघून गेले.

नंतर गटविकास अधिकाऱ्याच्या कार्यालयावर हा मोर्चा नेण्यात आला. गटविकास अधिकाऱ्यावर मोर्चा नवीनच असल्यामुळे, गटविकास अधिकाऱ्याने पोलिस बंदोबस्त न ठेवल्यामुळे मोर्चामधील लोक सगळे थेट बाहेरच्या गेटमधून गटविकास अधिकाऱ्यांच्या कार्यालयात घुसण्यास गेले तेव्हा गटविकास अधिकारी कार्यालयातून बाहेर पडले.

कार्यालयाच्या बाहेर एका ठिकाणी बसून गटविकास अधिकाऱ्यास पाण्याच्या प्रश्नाबाबतचे निवेदन देण्यात आले. गटविकास अधिकाऱ्यानेही 'तात्पुरता पाण्याचा प्रश्न सोडवू' असे अश्वासन देऊन कार्यालयात गेले.

मोर्चा संपल्यानंतर बसस्टॉपच्या बाजूला मोर्चामधील बाया-पुरुष एकत्र बसून मोर्चासंबंधी चर्चा केली. तसेच शहापूर आदिवासी भागातील पाण्याचा कायम प्रश्न सोडवण्यासाठी आदिवासी युवकांची समिती तयार करण्यात आली.

## आदिवासी वाडीत दारुबंदीचे प्रयत्न

मुरबाड तालुक्यात टोकावडेहून ३ ते ३॥ कि. मी. अंतरावर असलेल्या बांगरवाडी गावात दारुचे प्रमाण इतर आदिवासी वाड्यापेक्षा खुपच असायचे. या वाडीत एकं-दरीत २५ कुटुंबापैकी २० कुटूंबे ही दारुचा धंदा करीत असत. त्यामुळे दारु पिणाऱ्या आदिवासी व बिगर आदि-वासी लोकांचा लोंढा लागायचा. तसेच दारु पिणाऱ्या लोकांचेही प्रमाण बरेच होते. त्यामुळे गावात भांडणे व्हायची, मारामाऱ्या व्हायच्या, पोलिस स्टेशनला तक्रारी जायच्या आणि त्याचा फायदा पोलिस स्टेशनचे पोलिस मात्र चांगलाच घ्यायचे पोलिस पकडून न्यायला आले की, दारुच्या बाटल्या, कोंबड्या ह्या मात्र त्यांच्या हक्का-च्याच होऊन गेल्या होत्या. आदिवासीना धमक्या देऊन खुपच लुटायचे आणि खरोखरच आदिवासी ह्या दारू-मुळेच चांगले लुटले जायचे.

बांगरवाडी (कुडशेत) तरुण युवकांनी दारुबंदी करण्यासाठी काही तरी प्रयत्न करायला पाहिजे. कारण ह्या दारुमुळे भांडण होवून गावातील बरेच लोक पोलिसाने केलेल्या भ्रष्टाचारात सापडले होते. संघटनेच्या युवक शिबीरा-मध्ये दारुबंदी विषयी चर्चा झालीच होती. तेथून आम्हा तरुणांच्या मनात सारखा विचार यायचा. एक दिवस तरुणांनी गावच्या पाटलाच्या अंगणात **दारुबंदी** विषयी १७ मार्च ८४ रोजी प्रथम मिटिंग घेतली. मिटिंगमध्ये सर्व गावकरी लोक बोलावले.

गावात ही पहिलीच मिटिंग असल्यामुळे घरातून लोक बाहेर पडत नसत. नंतर आमच्यामधल्या एका कार्यकर्त्याला प्रत्येकाच्या घरोघरी जाऊन मिटिंगला येण्यास जोर-जोरात सांगण्यास सांगितले. तरी देखील सर्वच लोक मिटिंगमध्ये आले नाहीत. दारुबंदीच्या मिटिंगला सुरूवात झाली. चर्चेला सुरुवात झाल्यानंतर एका युवकांनी दारु करणाऱ्या लोकांना विचारले की, दारुचे धंदे बंद करायचे की नाही? असा आमच्या तरुणांचा विचार चालला आहे की दारु-बंदी आपल्या गावात झालीच पाहिजे. दारु करणाऱ्या एका म्हाताऱ्याने मध्येच उत्तर दिले कि जुन्या काळापासून दारुबंदी कोणी केली नाही अन् तुम्ही काय हा नवीन कायदा करता? दारु करणाऱ्या दुसऱ्या एकाने असे सांगितले की आम्ही सगळे हातावर जगणारे लोक आहोत. दारु विकून कसे तरी पोटा-पाण्याचा प्रश्न सोडवतो. दारुचे धंदे बंद केले तर आमचा पोटाचा प्रश्न काय?

या प्रश्नांने आम्ही युवक थोडे अस्वस्थ झालो. आम्ही विचार करू लागलो की यावर काहीतरी पर्याय शोधायला पाहिजे. आम्ही त्याला बऱ्याच उशीराने उत्तर दिले कि, जे लोक दारु करीत नाहीत त्यांचे कसे भागते? सगळेच लोक दारु विकूनच भागवतात का? दारु विकण्यापेक्षा मजूरी केली तर काही बिघडते का? नंतर त्या दारु करणाऱ्याने सांगितले आम्हाला वेळेवर मजुरी मात्र मिळाली पाहिजे. काही तरी रोजगार मिळवून दिल्यास नक्कीच दारु बंद करीन असे त्याने सांगितले.

या प्रश्नांच्या संदर्भात आम्हा युवकांमध्ये मात्र चांगलीच चर्चा सुरू झाली की, दारुबंद झाली की आमच्या प्रयत्नानी आम्ही काहीही करून रोजगार मिळवून देण्याचा आवश्य प्रयत्न करू. परंतु असे आश्वासन दारु करणाऱ्या काही लोकांना पटले नाही. त्याने मिटिंगमध्ये असेच उत्तर दिले की, आम्ही दारु करण्याचे कधीही सोडणार नाही काहीही करा आम्ही घाबरणार नाही. काही दारु करणारे कार्य-

कार्यकर्त्यांना शिवीगाळ करू लागले.

कार्यकर्त्यांने मात्र काही शिव्याचे मनावर न घेता जणू काही कानावरच हात ठेवून ऐकण्यास नाकारले असेच केले. या पहिल्या दिवसांच्या मिटिंगचे दारुबंदी विषयाचे प्रयत्न काहीसे वाया गेले आणि कार्यकर्ते नाराज होऊन आपापल्या घरी गप्पचूप झोपायला गेले. युवक जरी पहिल्या मिटिंगमध्ये नाराज झाले होते तरी देखील त्यांची हिंमत खचली नव्हती.

सगळ्यांचे ठाम मत होते की, आपण या प्रश्नाला धरून हात घातला आहे ना. हा प्रश्न तडीस लागल्याशिवाय गप्प बसायचे नाही असेच विचार प्रत्येक कार्यकर्त्यांच्या मनात होते.

ह्या मिटिंगनंतर दोन-तीन दिवसांनी गावात दुसरी मिटिंग घेतली. या मिटिंगमध्ये प्रत्येक घरोघरी जावून प्रत्येक घरातील लोकांस बोलावले. मिटिंगमध्ये चर्चेला सुरुवात झाली चर्चेमध्ये दारु करणाऱ्या व्यक्तींना कोणालाही काही विचारले नाही दारुबंदीविषयी व गावातील भानगडी व इतर प्रश्न गावातच मिटवण्यासाठी तरुण युवकांची एक आदिवासी युवक संघटना या दिवशी स्थापन करण्यात आली. अध्यक्ष नेमण्यात आला. तसेच या संघटनेच्या कमिटीमध्ये एकूण सात युवक देण्यात येवून संघटना स्थापन केली.

नंतर अशी चर्चा झाली की ही आदिवासी युवक संघटना दारु बंदी होण्यासाठी व गावातील कोणत्याही प्रश्नांच्या संदर्भात निर्णय घेतील. आता **दारुबंदीची** चांगलीच चर्चा सुरू झाली. दारू गाळणाऱ्या लोकांची दारूची भांडी (मडकी) दिसली कि ती भांडी ही स्थापन केलेल्या कमिटीचे लोक नक्कीच फोडून टाकतील. तसेच दारू गाळणाऱ्या व दारू पिऊन भांडण करणाऱ्यांवर दंडही बसवण्यात आला. या मिटिंगमध्ये गावातील दारूबंदी या विषयी एक प्रत पोलिस स्टेशनलाही देण्यात आली. पोलिस स्टेशनला या प्रश्नांसंदर्भात चर्चा केली.

दारूबंदी करणाऱ्या समितीतील युवकांचे मात्र चांगलेच लक्ष असायचे. कधी कधी एक दोन लोक गप्पचूप दुरवर जंगलात दारूचे भांडे टेवून दारू गाळायचे ( पाडायचे ). परंतु युवक मात्र त्यांचे शोध घेतच असत. एक दिवस एक माणूस गप्पचुप जंगलात जाऊन दारू पाडीत होता असा आम्हा युवकास सांगावा लागला, आम्ही गावातील सगळेच युवक त्या माणसाचा शोध घेत घेत तो माणूस दारू पाडीत होता त्या ठिकाणी गेलो. एका युवकाने विचारले आपल्या गावात दारूबंदीची मिटिंग झाली त्या मिटिंगमध्ये काय ठरले आहे? त्याने असे प्रतिउत्तर दिले की, मी विकण्यासाठी पाडीत नाही मी फक्त माझ्यापुरती पिण्यासाठी पाडतो. हे उत्तर ऐकताच, पाडीत असलेले दारूचे भांडे दोन तीन युवकांनी वर उचलून आपटले, त्याच्यावर दगड धोंडे आपटून तेथेच फोडून टाकले आणि सगळे युवक घरी आले. तो दारू पाडणारा माणूस घरी आला. संध्याकाळी मात्र कुठून तरी दारू ठोकून आला आणि कार्यकर्त्यांना शिव्या देऊ लागला.

परंतु कमिटीतील युवक काहीहो त्या माणसांस बोलले नाही. त्या दिवशीही युवकाने कानावर हात ठेवल्यासारखेच केले. गावातील दारूचे धंदे बंदच पडत चालले होते. आणि लोकांना वेळेवर मजूरीही मिळत नव्हती. त्यामुळे दरसम दारू पाडणारे लोक तरुण युवकांना चांगलेच शिव्या हासडायचे. परंतु युवकांचे धैर्य खचले नाही, दारू करणाऱ्या गावकऱ्यांना ते घाबरले नाहीत.

युवकांना खरी तर सुव्यवस्था घडवून आणायची होती, त्यामुळे शिव्या ऐकून घ्याव्या लागायची वेळ आली तर मार खाण्यास युवक तयारच होते. कारण युवकांनी हेच ठरविले होते की गावात सुव्यवस्था घडवून आणायची असेल तर काही दिवस त्रास सहन करावाच लागेल. त्रास सहन केल्याशिवाय गावात सुव्यवस्था निर्माण होणार नाही. गावात जवळ जवळ सगळ्यांचेच दारूचे धंदे बंद होत चालले. दारू पिणाऱ्यांचे प्रमाण खूपच कमी झाले. गावातील भांडणाचेही प्रमाणात फरक पडला, संध्याकाळी शांत वातावरण जाणवू लागले.

गावामध्ये आदिवासी युवक संघटनेची तिसरी मिटिंग घेतली. या मिटिंगमध्ये गावातील लोकांची एकी या विषयावर मिटिंगमध्ये चर्चा झाली. तसेच दारूबंदी झाल्यामुळे लोकांना आश्वासन दिल्याप्रमाणे रोजगार हमीची कामे मिळण्यासाठी आदिवासी युवक संघटनेतर्फे अर्ज करण्यात आला. हा अर्ज दुसऱ्या दिवशी लगेच सादर केला. अर्ज दिल्यानंतर १५ ते २० दिवसांतच रोजगार कामे निघाली.

आदिवासी युवक संघटनेच्या अर्जाचा गावातील लोकांना फायदा झाल्यामुळे लोकांचा विश्वास बसू लागला. गावामध्ये एकी घडवून आणण्यासाठी व जागृती येण्यासाठी आम्ही युवक आठवड्यातून एक दोन मिटिंग घ्यायचो. मिटिंगमध्ये जन जागृतीची गाणी गायचो गावातील लोकांना एकत्र येण्याची गोडी लागली, तसेच आदिवासीवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी एकमेकाला आधार देत असत. आता तर चांगलीच जागृती येऊन मनांतली भीती झुगारून आता अन्यायाला वाचा फोडण्यास गावकरी तयार होऊन लढण्यास सज्ज राहीले आहेत. शहापूर-मुरबाड तालुक्यातील आदिवासी आता जागा होत आहे.

## पुस्तक परीक्षण

# भारतातील गुलाम श्रमिक

**समीक्षक**

भारतातील सत्तर टक्के लोकसंख्या शेतमजूर व गरीब शेतकरी वर्गाची आहे. यातले तीनचतुर्थांशाहून जास्त लोक दारिद्र्यरेषेच्या खाली जीवन कंठतात. तसेच त्यांच्यापैकी फार मोठी संख्या अनुसूचित जातीजमातींची आहे. या दारिद्र्यात भरडल्या गेलेल्या प्रचंड मानवसमूहाचा एक हिस्सा आहे बांधिल मजुरांचा. १९७६ मध्ये बांधिल मजुरी 'रद्दबातल' करणारा कायदा झाला. दोन्ही वीस कलमी कार्यक्रमात या 'बॉंडेड लेबरर्स' चा शोध घेऊन, त्यांची निश्चिती करून, त्यांना मुक्त करून, त्यांचे पुनर्वसन करण्याबाबतचे कलम महत्वाचे म्हणून गणले गेले होते. ३१ मार्च १९८४ पर्यंत १,६६,२६६ बांधिल मजूर या कायद्याखाली निश्चित करण्यात आले व त्यापैकी ·,२६,-३९५ जणांचे पुनर्वसन करण्यात आले. पण १९७८ मध्ये गांधी पीस फाऊंडेशन व नॅशनल लेबर इन्स्टिट्यूट यांनी संयुक्तपणे केलेल्या पहाणीत आठ राज्यात २३ लाखाहून अधिक बांधिल मजूर असल्याचे आढळले. तर बंधुआ मुक्ती मोर्चाचे स्वामी अग्निवेश यांनी २ ऑगस्ट रोजी युनोसमोर केलेल्या निवेदनात देशातील बांधिल मजुरांची संख्या ६० लाख सांगितली.

प्रस्तुत पुस्तक हे या समस्येची माहिती करून घेण्यासाठी अतिशय उपयुक्त आहे. बांधिल मजुरांची पद्धत भारतात कधी व कशी उदयाला आली? भारतातील भांडवलशाहीपूर्व प्राचीन समाजव्यवस्थेचा ती वारसा आहे की वासाहतिक राजवटीचे अपत्य आहे? की सत्य या दोन्हीच्या मध्ये आहे? आपली घटना, जमीनसुधारणा कायदे, दारिद्र्यनिर्मूलन कार्यक्रम, बांधिल मजुरीविरुद्धचे कायदे व कार्यक्रम या सगळ्यांना तोंड देऊन आजही ही पद्धत का टिकून आहे? हे सर्व प्रश्न ग्रामीण भागात काम करणाऱ्यांना पदोपदी पडणारे आहेत; भारतातल्या डाव्या तसेच जनवादी आंदोलनाला हे प्रश्न हाती घेऊन सोडवण्याचे काम तातडीच्या महत्त्वाचे म्हणून अंगावर घेतलेच पाहिजे. ग्रामीण भागात जातजमातीवादी व फुटीरतावादीदेखील राजकारण नेऊन रुजवण्याचा जो प्रयत्न प्रतिगामी करत आहेत त्याला तोंड देण्याकरताही ह्या प्रश्नाची उकल झाली पाहिजे. भारतातील लोकशाही आणि एकात्मता टिकवण्याचा व जननिष्ठ आर्थिक धोरणे घेण्याचा प्रश्न आज प्रचंड शेतमजूर–गरीब शेतकरी जनसमुदायांनी जनवादी चळवळीत उतरण्याशी व शेतकी क्रांती पूर्ण करण्याशी जोडलेला आहे. हे पुस्तक या साऱ्या प्रश्नांवर प्रकाश टाकणारे आहे.

पुस्तकाच्या प्रस्तावनेत उत्सा पटनाईक यांनी या समस्येच्या सर्व पैलूंचा सारांशरूपाने परामर्श घेतला आहे. भारतात शेतमजूर वर्गाचा जन्म व घडण कशी झाली येथपासून आजच्या ग्रामीण जीवनाच्या प्रत्ययकारी चित्रणापर्यंत प्रस्तावना प्रवास करते. पुस्तकातील विवेचनाची ओळखही प्रस्तावनेत करून देण्यात आली आहे. प्रथम, मजुरांची बांधिलकी व गुलामगिरी याविषयीची परिस्थिती प्राचीन, मध्ययुगीन व वासाहतिक काळात काय होती याचे विवेचन (अनुक्रमे उमा चक्रवर्ती, सलीम किडवई व तनिका सरकार यांनी तीन लेखांत केलेले आहे. त्यानंतर पाच केस–स्टडीज्मध्ये या प्रश्नाचा त्या त्या विभागातील आविष्कार तपशीलवार व विवेचक पद्धतीने तपासलेला आहे. यात दक्षिण अर्कोट जिल्ह्यातील बांधिल मजूर, उत्तर प्रदेशातील मुझफ्फरनगरचे विट भट्टी कामगार, परगण्यातले आदिवासी, पंजाबातील स्थलांतर करून आलेले शेतमजूर व उत्तर प्रदेशातील जानसर बावरच्या मजूर स्त्रिया यांचा समावेश आहे. शेवटच्या मंजिरी दिंगवनी यांच्या लेखात प्राचीन काळापासून आजतागायत बांधिलकी व गुलामगिरीविषयक कायद्यांची साद्यंत माहिती करून देण्यात आली आहे.

'भूदास बनवला गेलेला शेतकरी समुदाय आणि जमिनीवरील मक्तेदारी स्वरूपाच्या मालकीच्या योगे त्याच्याकडून आर्थिक वरकड हिरावून शोषण करणारा जमिनदारवर्ग यांच्यातील परस्पर संबंध" हा सरंजामशाहीचा मूलभूत गाभा आहे. अशा सरंजामी संबंधांच्या भारतातील विशिष्ट आविष्कारामध्ये 'भांडवलपूर्व अर्थव्यवस्थेचा अविभाज्य भाग असणारा मालमत्ताविहीन मजुरांचा एक वर्ग' आपल्याला आढळतो (तसा तो पश्चिम युरोपात आढळत नाही.) असे उत्सा पटनाईक यांचे प्रतिपादन आहे. 'वंशपरंपरेने सेवा करण्याचे स्थान असणारे हे भूमीहीन मजूर' मोगल साम्राज्यात' जमिनदार व इतर जमिनमालकांची

खुदकश्त जमीन कसत असत.' सबंध मध्ययुगीन भारतात भांडवलपूर्व मालक–मजूर संबंध अस्तित्वात होते; दक्षिणेतही अठराव्या शतकाच्या सुरुवातीस स्थानिक जमिनदार वर्गाच्या (मिरासदार, जेन्मी इ.) जमिनी अस्पृश्य जातींचे मजूर कसत होते.

या परिस्थितीवर वसाहतवादी राजवटीच्या धोरणांचा परिणाम हा झाला की एकीकडे प्रचंड प्रमाणात कारागीर वर्ग देशोधडीला लागला व दुसरीकडे कर्जापायी गरीब शेतकरी भूमीहीन झाले. तसेच जुने पारंपारिक बांधिलकीचे प्रकार कमी होऊ लागले, पण त्यांची जागा अधिकाधिक प्रमाणात कर्जातून बांधिलकीसारख्या पैशाचा वापर करणाऱ्या बांधिलकीच्या रुपांनी (मोनेटाइज्ड फॉर्म्स ऑफ बाँडेज) घेतली. या प्रकारे कारागीर व शेतकरी उत्पादन साधनांपासून अलग व कंगाल होत गेले (पॉपरायझेशन) आणि वेतनावर मजुरी करणाऱ्या आधुनिक शेतमजूर वर्गाचा प्रमुख भाग बनले व अशा वेतनावर काम करणाऱ्यांची संख्या ग्रामीण कामकऱ्यांमध्ये वेगाने वाढली. परंतु याबरोबरीने भांडवल संचय म्हणजेच वरकडीची उत्पादक पुनर्गुंतवणूक व उत्पादनाचा विस्तार घडून न आल्याने शेतीमधला भांडवली विकास संकुचितच राहिला. वासाहतिक काळात उद्योगधंदे वाढून त्यात नोकऱ्या मिळणे देखील घडू शकत नव्हते. परिणामी भूमीहीन कंगाल शेतमजुरांच्या अफाट बेकारी व अर्ध बेकारीची समस्या निर्माण झाली.

स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेवर आलेल्या भारतीय भांडवलदार वर्गाने 'मोठ्या प्रमाणातील शासकीय गुंतवणुकीद्वारा भांडवली विकास साधण्याचा मार्ग' जाणीवपूर्वक स्वीकारला. त्यासाठी मूलगामी शेतीसंबंध सुधारणांद्वारा सरंजामी व अर्धसरंजामी संबंध मोडून काढण्याऐवजी जमिनदार वर्गाशी हातमिळवणी करण्यात आली; त्याला चुचकारून व आमिषे दाखवून भांडवली शेतीकडे वळवण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु आजसुद्धा, सगळे जमीनसुधारणा कायदे पास होऊनसुद्धा, मूठभराच्या हातातले जमिनीचे केंद्रीकरण व शेतीतील पारंपारिक भांडवलपूर्व संबंधांचे काही प्रमाणात व काही प्रकारे अस्तित्व या गोष्टी तशाच आहेत. ग्रामीण कंगालांची बेकारी तशीच आहे. ही सर्वंकष परिस्थिती बांधिल मजुरांच्या अस्तित्वाला कारण आहे.

"प्राचीन भारतातील गुलाम श्रमिक : दास व कर्मकार" या लेखात प्राचीन भारतीय समाजात गुलामगिरी व बांधिलकी कशा जन्म पावल्या व त्यांना जातिसंबंधाचे आवरण कसे प्राप्त झाले याचे माहितीपूर्ण विवेचन आहे. उमा चक्रवर्तींच्या मते बांधिल किंवा अवलंबित मजुरांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्याने भारतात गुलामगिरीची पद्धती आवश्यक ठरली नाही; परंपरागत या कर्जाची बंधने आणि अवलंबित्व यांच्यामुळे स्वतंत्र व्यक्ती व गुलाम या कोटी एकमेकीत मिसळून गेल्या होत्या. युरोपातील अभिजात गुलामगिरी (ग्रीस–रोममधली) किंवा सरंजामशाहीतील भूदासपद्धती (सर्फडम) या पद्धतींची जागा या वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनपद्धतीने भारतात घेतली होती.

"सुलतान, हिजडे आणि घरकामगार : मध्ययुगीन भारतातील बांधिलकीची नवी रुपे" या लेखात सलीम किडवई यांनी म्हटले आहे की मध्ययुगीन भारतीय इतिहासात आर्थिक व सामाजिक संबंधांच्यात मूलभूत बदल घडून आला नाही. मात्र या काळात वरिष्ठ वर्गाच्या महालांमध्ये व घरांमध्ये गुलाम बाळगण्याची पद्धत फार मोठ्या प्रमाणात वाढली; मध्ययुगाचे हे एक विशेष लक्षण म्हणता येईल. त्याचबरोबर नव्या राजकर्त्यांनी गुलामगिरीचे अगदी नवीन प्रकारसुद्धा सुरू केले. जुन्या कर्जाच्या बांधिलकीपेक्षा ही वेगळी होती; पूर्वी कर्जबाजारी गरीब शेतकरी स्वतःची जमीन व श्रम यांच्यावरील नियंत्रण पूर्णपणे गमावून बसे व ग्रामीण समाजात अधिकच दडपलेल्या अवस्थेला ती पोचत असे. परंतु आता मात्र कर्जापायी तो स्वतःच्या गावातून व कुटुंबातून उठवला जाऊन गुलामाच्या बाजारात गुरांसारखा विक्रीला काढला जाऊ लागला. घरगुलाम व त्यांचा हा बाजार यांचे विवेचन किडवई यांनी केलेले आहे.

वासाहतिक काळातील बांधिलकीवरचा तनिका सरकार यांचा लेख बांधिलकीच्या प्रवासाचा पुढचा टप्पा वर्णन करतो. औपचारिक गुलामगिरीचे ढोबळमानाने तीन प्रकारे वर्गीकरण त्यांनी केले आहे. पहिला प्रकार मुख्यतः शहरी भागातील राजेराजवाडे, सरंमजामदार व नवे व्यापारी यांच्या घरांमधील गुलाम दुसरा खेडेगावांमध्ये व लहान शहरांमध्ये श्रीमंत हिंदू वा मुसलमान घरांमधील गुलाम. तिसरा प्रकार बांधिल शेतमजूर, वेठबिगार यांचा; वरिष्ठजातींचे व बऱ्याचदा मध्यम जातींचेही बडे जमीनमालक या बांधिल मजुरांना जगायला पुरेसे धान्य मजुरी म्हणून देत व हे मजूर कर्ज किंवा इतर नाना प्रकारांनी बांधिलेले असत. इ. स. १८४३ मध्ये अधिकृतरित्या ब्रिटिश सरकारने गुलामगिरीवर बंदी घातली. परंतु वेगवेगळ्या युक्त्यांनी वरिष्ठ वर्गाकडून औपचारिक गुलामांचे रूपांतर

बांधिल मजुरांमध्ये करण्यात आले. आणि याला उपयोगी असे कायदेदेखील करण्यात आले. उदा. मळयांमधल्या मजुरांना बांधून ठेवण्याकरता उपयोगी पडणारा 'करार मोडण्याविषयीचा कायदा' १८५९ मध्ये करण्यात आला. उलट मुक्त गुलामांना पुनर्वसनासाठी जमीन देणे, शिक्षण वा रोजगार देणे यातले काहीही केले गेले नाही.

तनिका सरकार यांनी असे म्हटले आहे की गुलाम व बांधिल मजुरांच्या प्रतिकाराची वा बंडांची काहीही उदाहरणे इतिहासात आढळत नाहीत. पण तेथे त्या 'बंड' हा शब्द अत्यंत संकुचित अर्थाने वापरत असाव्या. वस्तुतः एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात शेतमजूर व गरीब शेतकरी–मुक्त व बांधिल दोन्ही–यांच्या कित्येक उत्स्फूर्त चळवळी झालेल्या आहेत. १८५५ मधले संथाळांचे बंड, १८६० मधले 'निळीचे बंड', १८७५ मधला दख्खनचा उठाव, आंध्र व बंगालमधले उठाव अशी कितीतरी याची उदाहरणे देता येतील. ब्रिटिश सत्तेच्या सामर्थ्याविरुद्ध या उठावांमध्ये प्रतिकार केला गेला व शेतमजूर–गरीब शेतकऱ्यांमधली संघटित होऊन झगडण्याची शक्ती दिसून आली.

'केस–स्टडीज्' मध्ये तामिळनाडूतल्या दक्षिण अर्कोट जिल्ह्यातील शेतमजूर व हातमाग कामगार यांच्या कर्ज–बांधिलकीचे विवेचन विद्यासागर यांच्या लेखात केलेले आहे. तर मुझफ्फरनगरमधील विट भट्टी कामगारांची तपासणी 'हरित क्रांतीच्या प्रदेशातील बांधिलकी' या लेखात सुनीत चोप्रांनी केली आहे.

पंजाबमध्ये भांडवली शेतीचा जास्तीत जास्त प्रवेश झालेला असल्याने 'ग्रामीण पंजाबातील स्थलांतरित श्रमिक' या मनजित सिंग व गोपाल अय्यर यांच्या लेखातील विश्लेषण विशेष लक्षणीय आहे. शेतीमध्ये भांडवली संबंधांचा प्रवेश जितका जास्त वा कमी असेल तितक्या प्रमाणात 'मुक्त वेतन–श्रम व्यवस्थे' बरोबरचे भांडवलपूर्व शोषणपद्धती टिकून राहतात असे त्यावरून दिसते. राज्याच्या वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये भांडवली विकास कमी (होशियारपूर जिल्हा) वा जास्त (लुधियाना जिल्हा) झाला आहे व यामुळे दोन्हींची तुलना या प्रक्रियेवर प्रकाश टाकू शकते. भारतातील शेतीत भांडवली संबंध निश्चितपणे परंतु अडखळत, अर्धवटपणे व विकृत रूपात कसे विकसित होत आहेत आणि त्याचा बांधिलकीच्या समस्येशी काय संबंध आहे हे यावरून स्पष्ट होते.

ज्योती गुप्ता यांच्या 'हिमालयातील बहुपतित्व' या लेखात स्त्रियांच्या बांधिलकीचे दर्शन घडते. 'शेतकी व्यवस्थेतील वर्गरचना, अनुसूचित जमातींची आर्थिक स्थिती व बहुपतित्वावर आधारित कुटुंबरचना आणि लग्नाच्या वेळी वधू पैशाने विकत घेण्याची चाल (ब्राइड–प्राइस) या गोष्टी एकाएकी व दुसरीकडे 'वेश्यावृत्तीद्वारा बांधिल स्त्री–मजुरांच्या होणाऱ्या शोषणाचे वैशिष्ट्यपूर्ण पैलू' यांचा विचार लेखिकेने केला आहे. स्त्रियांची बांधिलकी टिकून रहाणे व किंबहुना तीव्रतर बनणे आणि विकृत भांडवली विकासाचा व्यापक संदर्भ यांची जोड करण्याचा लेखातील प्रयत्न प्रशंसनीय आहे.

पुस्तकाच्या शेवटच्या 'कायदा व त्याच्या मर्यादा' विभागात 'न पाळलेली अभिवचने : कायदा आणि बांधिलकी' या मंजरी दिंगवनी यांच्या लेखात ब्रिटिशपूर्व काळापासून १९७६ पर्यंत करण्यात आलेल्या वेगवेगळ्या कायद्यांचा आढावा घेतला आहे. या आढाव्यातून दोन प्रश्न समोर येतात; केवळ कायदे करून बांधिलकीची पद्धती नष्ट होईल काय? १९७६ चा 'बॉंडेड लेबर सिस्टिम ॲबॉलिशन ॲक्ट' कर्ज–बांधिलकीच्या पद्धतीमागील मूळ कारणांना स्पर्शदेखील न करता ती रद्दबातल करण्याचा प्रयत्न आहे काय?

या प्रश्नांची उत्तरे उघड आहेत. अस्पृश्यता कायद्याचा खरा परिणाम किती झाला? खेड्यांच्या सामाजिक–आर्थिक, राजकीय रचनेत आमूलाग्र बदल करून ती ग्रामीण गरिबांच्या हिताची केल्याशिवाय बांधिल मजुरांचा प्रश्नसुद्धा सुटणे शक्य नाही. आणि मूठभर मालकांकडे जमीन व सत्ता यांचे झालेले केंद्रीकरण जोवर मोडून काढले जात नाही तोवर हे घडणार नाही.

महाराष्ट्रात देखील काही ठिकाणी वेठबिगारी व बांधिलकीच्या जोखडातून मजुरांना सोडवण्याचे प्रयत्न होत आहेत. या प्रयत्नांना हे मूलभूत शेतकी क्रांतीचे अवधान लाभणे महत्त्वाचे आहे.

[ चेन्स ऑफ सर्व्हिटयूड : बॉंडेज अँड स्लेव्हरी इन इंडिया / संपादन : उत्सा पटनाईक व मंजरी दिंगवनी / संगम बुक्स / नवी दिल्ली ]

( तात्पर्यवरून साभार )

# शासन निर्णय

**भारत का राजपत्र [ असाधारण सं. ५२१ ]**

भाग दोन-खंड ३-उप-खंड [ १ ]   नई दिल्ली, सोमवार, दिसम्बर २, १९८५

**" सं. आ. १२३ " अनुसूचित क्षेत्र [ महाराष्ट्र ] आदेश [ १९८५ ]**

असाधारण सं. ५२१

राष्ट्रपति भारत के संविधान की पाचवी अनुसूचि के पैरा ६ के उपपैरा [२] द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, अनुसूचित क्षेत्र [ भाग-क-राज्य ] आदेश १९५० और अनुसूचित क्षेत्र [ भाग-ख-राज्य ] आदेश १९५० को, जहां तक वे महाराष्ट्र राज्य में अब समाविष्ट क्षेत्रों से संबंधित है, विखंडित करते है और उस राज्य के राज्यपाल से परामर्श करके, निम्नलिखित आदेश करते हैं—अर्थात :—

